UNIVERSAL
LIBRARY
OU_192216
UNIVERSAL
LIBRARY

## प्रकरण १ लें

# अनुरूप नामाभिधान

दे. भ. केळकर यांचें नांव नरसिंह चिंतामण केळकर असें आहे. केळकरांना कोणीं मवाळ म्हटलें कीं ते त्याला उत्तर देतात, "काय करावें ? माझी राशीच 'मेष' पडली हो! उगीच आईबापांनीं माझें नांव नरसिंह ठेविलें!" टीकाकाराला गप्प बसविण्याच्या दृष्टीनें हें उत्तर ठीक असलें तरी प्रामाणिक बुद्धीच्या माणसाला हें कधींच मान्य करतां येणार नाहीं. तो तर केळकर-चरित्र-पट डोळ्यासमोर आणून अभिमानानें म्हणेल कीं, "धन्य आहे त्या माऊलीची कीं, जिनें नरसिंह हें नांव प्रथम उच्चारिलें नि केळकरांचें तेंच नांव ठेविलें!" कारण तें अनुरूप ठरलें, यथार्थ ठरलें.

बाकी 'नांव सोनुबाई नि हातीं कथलाचा वाळा' हें प्रसिद्धच आहे म्हणा! आणि तसा अनुभव आपल्याला पदोपदीं येतोच ना! एखाद्याला 'शिवाजी' हाक मारावी अन् तो आपला चहाच्या दुकानातून 'चॅय कप एक आणा' ओरडतो! रामा पाहावा तर तो लग्नाची बायको टाकून पाटाच्या बायकोशीं संसार करीत असतो! वाघ आडनाव पण अंधाऱ्या रात्रीं बोळांतून जातांना सोबत लागते! 'देव' असतो पण राक्षसी वर्तन करतो, 'दीनदयाळ' म्हणावें तर गरिबांना पिळून काढतो, 'अष्टपुत्रे' म्हणवितो नि निपुत्रिक मरतो, आणि भीमदेव असून डॉक्टरचीं 'बिलें' भरीतच असतो!

पण याच्या उलटहि प्रकार आपल्याला दिसतो. आमच्या सहस्त्रबुद्धयांनीं मराठीचे पहिले "पीएच्. डी." होऊन नांवाचें सार्थक केलेंच कीं नाहीं ? कविवर्य 'यशवंत' नांवाप्रमाणें यशवंतच ठरले, आणि अखिल भारताच्या 'असंतोषाचे जनक' होऊन त्या असंतुष्ट भारतीयांचें प्रचंड बल पाठीशीं घेऊन इंग्रजाशीं लढतांना लोकमान्य बलवंतरावजी हे खरे 'बलवंत' ठरले नि मरूनहि चिरंजीव झाले!

त्याच लो. टिळकांचे—म्हणजे त्यांनीं पराक्रमानें आपलें नांव सार्थ ठरविलें, अनुरूप ठरविलें त्यांचे—खरे एकमेव राजकीय वारसदार असलेले देशभक्त नरसिंह चिंतामण केळकर हे तरी निराळे कसे ठरतील ? तेहि पराक्रमानें पुरुष-सिंह—नरसिंहच ठरले. आणि हें मान्य करावयास कोणालाहि काय म्हणून

संकोच वाटावा ? कायद्याच्या ज्ञानात अग्रगण्य ठरलेले म्हणून ज्याना इंग्लंडांतील श्रेष्ठ युनिव्हर्सिटीनें 'एल्एल्. डी.' ची उच्च पदवी देऊन गौरविलें ते नेक नामदार डॉ मुकुंदरावजी जयकर ज्याना 'मानवी बुद्धीचा एक सर्वसंग्रहच' म्हणतात नि 'राजकीय लेखनाचे व्यासमुनि' म्हणून गौरवितात; ज्याना उद्देशून 'क्रॉनिकल'चे माजी सुप्रसिद्ध संपादक नि 'सेंटिनल' चे आजचे संपादक श्री. बी. जी. हॉर्निमन यांनीं पुढील उद्‌गार काढले, " वृत्तपत्रकार या नात्यानें केळकरांची योग्यता दांडगी आहे. हिंदुस्थानातील सर्वांत पहिल्या दर्जाच्या आजच्या वृत्तपत्रकारात त्याची गणना केली पाहिजे. कदाचित् ते पहिल्या प्रतीच्या विद्यमान वृत्तपत्रकारात पहिले आहेत असेंहि म्हणावें लागेल. दोन भाषांतील वृत्तपत्रें एकाच वेळी चालविणें व तींहि उत्कृष्टपणें चालवून वाचकांवर आपली छाप पाडणें ही गोष्ट सोपी नाहीं.......लो. टिळक व श्रीयुत केळकर यांजसारखे मोठे लोक हिन्दु समाजांत निपजतात हें हिन्दुस्थानचें भाग्य होय " आणि " केळकरांनीं 'केसरी'ची इभ्रत व इज्जत वाढवून लो. टिळकांचें वैशिष्ट्य राखलें...त्यांनीं लोकमान्यास अनृणी करून सोडलें...त्याच्या बुद्धीची ग्राहकता खरोखरीच विशाल आहे...१९२० ते ३२ सालपर्यंतच्या इतिहास–लेखकाला श्री. केळकराच्या नांवाचा प्रामुख्यानें उल्लेख करावाच लागेल " असा निर्वाळा ज्याच्या बाबतींत लोकनायक बापूजी अणे देतात त्या केळकरांची थोरवी कोण नाकबूल करील ?

दे. भ. अण्णासाहेब भोपटकर तर म्हणतात, "गेल्या शंभर वर्षांत बृहन्महाराष्ट्रांत जे दहा–पांच थोर पुरुष निर्माण झाले, त्यामध्यें तात्यासाहेबाची गणना कोणालाहि करावी लागेल. इतकी सरस व बहुमोल सेवा त्यानीं आपल्या राष्ट्राची, समाजाची, धर्माची व वाङ्मयाची केलेली आहे. " " लोकमान्यांच्या पाठीमागें आपल्या योग्यतेचा पुरुष महाराष्ट्रांत नाहीं. " असें महामहोपाध्याय काणे सांगतात तर " केळकर यांनीं लोकमान्याची परंपरा व धोरण हीं अखंड राखिलीं....गांधींनीं देखील केळकराचे गुण फार घेतले आहेत....पण केळकराची विद्वत्ता, रसिकता व धैर्य याबद्दल माझा आदर केवळ निरतिशय आहे. " असें सरोजिनीबाई नायडू आपल्याला बजावतात. आणि " केळकरांनीं जो निर्भय धैर्याचा झगडा केला त्याबद्दल वृत्तपत्रकार व सार्वजनिक कार्यांत लक्ष घालणारे इतर लोक यांजकडून त्यांचें अभिनंदनच होणें रास्त आहे केसरी हा आधींच मोठा वजनदार आहे हल्लींच्या निकालानें

त्याचें वजन उलट वाढेलच." असे केळकरांच्या धैर्यगुणाचे गौरव करणारे उद्गार केळकर–हायकोर्ट झगडयाचे वेळीं 'यंग इंडियां'त महात्मा गांधींनींहि काढले. स्वातंत्र्यवीर सावरकर तर म्हणतात कीं, "जुन्या काळाप्रमाणें जर महाराष्ट्रांत आज राजसूययज्ञ झाला तर अग्रपूजेचा मान श्री. तात्याराव केळकर यांनाच दिला जाईल; गुण व पराक्रम यासाठीं तो मान मिळतो." तेव्हां आपल्या देशांतील थोर लोक ज्यांच्या पराक्रमाचें वरीलप्रमाणें मनसोक्त वर्णन करतात त्या केळकरांचें 'नरसिंह' हें नांव त्याच्या आईबापांनीं 'उगीच ठेविलें' असें कसें म्हणतां येईल ?

आतां हें मात्र खरें 'कीं, पराक्रमी नि तेजस्वी जीवनाचे प्रकार संभवूं शकतात. विजेच्या जशा दोन तऱ्हा तशाच जीवनाच्या. आकाशांत गडगडाटानंतर चमकणारी, सळसळणारी नि क्षणांत लवून नष्ट होणारी पण हृदयांत भीतीचा गोळा उत्पन्न करणारी वीज कोणीं पाहिली नाहीं ? पण त्या विजेपासून दूर राहावें, लांब पळावें, तिचा संसर्ग नसावा ही मानवी इच्छा. तिच्या तेजाबद्दल, पराक्रमाबद्दल वाद नाहीं. पण...पण व्यवहाराच्या दृष्टीनें ती निरुपयोगी. याच्या उलट पाण्याच्या पोटीं निर्माण होणारीहि वीजच. पण ती सगळ्याना हवी. तिच्या साह्याय्यानें मानव वैभवशाली बनला.

कर्तृत्ववान्, तेजस्वी व पराक्रमी माणसांचें असेंच असतें. त्यांच्यापैकीं कांहींचें जीवन अल्पकाल टिकणारें पण जगाला क्षणभर दिपविणारें व चकित करणारें असतें. भगतसिंग, राजगुरु इत्यादि क्रांतिकारक अशा तऱ्हेचे होत. याच्या उलट तपेंच्या तपें लोकोद्धारासाठीं अनंत कष्ट उपसणारे, झिजणारे, बुद्धिमान् पण अखंडपणें झगडणारे तेजस्वी पुढारीहि आपल्या सुदैवानें या देशांत कांहीं थोडे नाहींत. लो. टिळक, म. गांधी, लाला लजपतराय, दासबाबू, पितापुत्र नेहरू व सुभाषबाबू हीं या दृष्टीनें केवढीं प्रचंड नावें आहेत, नाहीं ? याच यादींत दे. भ. केळकरांचा उल्लेख मोठ्या प्रामुख्यानें। नि अभिमानानें करावयास पाहिजे. कारण—

कारण उघडच आहे. केळकर–चरित्र म्हणजे सर्वस्पर्शी असा केवढा प्रचंड, भव्य नि उदात्त जीवनओघ आहे. जीवनाच्या सर्व अंगांतून पसरलेला; जागजागीं कांठच्या लोकांना, समाजांना आधार झालेला, नव्हे त्यांना जीवन सुसह्य, प्रिय नि आदर्श करावयास चैतन्य देणारा असा हा ओघ आहे. या ओघामध्यें प्रचंड व भीषण धबधबे नाहींत, पण प्रवाह असा अथांग नि सर्वव्यापी आहे

कीं, त्याची भव्यता, त्याचें गांभीर्य, त्याची निर्मलता नि पावित्र्य पाहून मन प्रसन्न होतें व वंदनाला हात जोडतें.

केळकर–चरित्राचें ओझरतें अवलोकनहि वरील म्हणणें पटवूं शकेल. दारिद्र्यांतून मार्ग काढीत काढीत केळकरबंधूंचें पुरें झालेलें शिक्षण; वकिली, मुन्सफीसारखा सुखाचा, श्रीमंतीचा नि आरामाचा राजमार्ग सोडून टिळकांना येऊन मिळण्याची प्रशंसनीय तडफ; प्लेगचा कहर गुदरला असतांहि म्हणजे रोजीं २०० ते २५० माणसें मरत असतांहि पुणें न सोडण्याचा निग्रह, एवढेंच नव्हे तर स्वयंसेवक म्हणून लोकसेवेची दाखविलेली आवड; लो. टिळकांवर राजद्रोहाबद्दल खटला झाल्यानंतर १८९७ सालीं म्हणजे वयाच्या अवघ्या २५ व्या वर्षीं केसरी व मराठा यांच्या संपादनाची हौसेनें पत्करलेली जबाबदारी; पुढे १९०८ सालीं 'दी टिळक केस' या लेखाबद्दल झालेली शिक्षा; टिळक मंडाल्यास शिक्षा भोगीत असतांना त्यांच्या गैरहजेरींत दोन्ही पत्रें टिकविण्यांत व चालविण्यांत दिसून आलेलें चातुर्य; 'तुम्ही केसरी फार चागला चालविलांत' अशी सुटून आल्यानंतर लोकमान्यांनीं दिलेली शाबासकी; होमरूल लीगचे चिटणीस म्हणून झालेली नेमणूक; गव्हर्नर विलिंग्डन यांनीं बोलविलेल्या युद्ध-परिषदेचे वेळीं स्वाभिमानासाठीं केलेला सभागृहत्याग; १९१९ मधील विलायतची कामगिरी व तेथील 'इंडिया' पत्राचें यशस्वी संपादकत्व; लोकमान्यांच्या एकसष्टाव्या वाढदिवशीं स्वयंस्फूर्तीनें अगदीं अल्पावधींत गोळा केलेला एक लक्षाचा निधी व त्यानंतर १९२० सालीं उभारलेला तीन लक्षांचा पर्सफंड; पुणें नगरपालिकेचे सतत सव्वीस वर्षें सभासद राहणें, तिचे पहिले लोकनियुक्त अध्यक्ष होणें; साहित्यसंमेलनाचें, कविसंमेलनाचें, कीर्तनपरिषदेचें, दलितोद्धार परिषदेचें, संगीत परिषदेचें, संस्थानीप्रजा-परिषदेचें व हिंदुमहासभेचें अध्यक्षपद मंडित करणें; वाङ्मयीन समृद्ध कामगिरीबद्दल साहित्यसम्राट पदवी लाभणें; मध्यवर्ती असेंब्लीमध्यें प्रचंड बहुमतानें अनेकवार निवडून येणें व डेप्युटी लीडरच्या जागेपर्यंत चढणें; लोकमान्यांच्या मृत्यूनंतर ट्रस्टी व केसरीचे संपादक म्हणून उत्कृष्ट कामगिरी करणें व तीन लक्षांची परतफेड करून गुरूला मृत्यूनंतर अनृणी करण्याचें लोकोत्तर उदाहरण घालून देणें; असहकारितेच्या प्रचंड लोंढ्यांत लोकमान्यांचे महान् शिष्यहि भराभर वाहवत चालले असतांना टिळकांचें राजकारण जगविण्यासाठीं गांधीजींशींहि ठाण मांडून निकरानें झगडणें व शेवटीं कॉंग्रेसलाहि निर्भेळ ध्येयवादापासून व्यवहारवादी

चनविणें; प्रामाणिक मतप्रतिपादनासाठीं अखंड शिव्यांची लाखोली खाणें नि मतांच्या कणखरपणामुळें व स्वतंत्रबुद्धि नि बाणेदारपणा यांमुळें कॉंग्रेसचें अध्यक्षपदहि प्रसंगीं दूर जाणें; हायकोर्टाच्या बेअदबीचा खटला स्वतः उत्कृष्ट-पणें चालविणें व त्यात ५२०० रु. चा दंड होणें; स्वतःच्या ६१ व्या वाढ-दिवस-समारंभप्रसंगीं ५०० वर संदेश येणें व 'केळकर' ग्रंथाच्या ३ आवृत्त्या निघून ५००० प्रति एका पंधरवड्यांत खलास होण्याचा विक्रम घडणें; त्या-नंतर आपण होऊन पगारी नोकरी व ट्रस्टीचा अधिकार सोडून नव्यांना वाव देणें व त्यांच्या कर्तबगारीचें चीज करण्याचें उदार धोरण स्वीकारणें; निवृत्ती-च्या वेळीं उण्यापुऱ्या अशा पन्नास संस्थांचा अध्यक्ष-उपाध्यक्ष या नात्याचा संबंध सोडणें; निवृत्तीनंतरहि आणि वयाची बहात्तरी चालू असतांनाहि अखंड लेखनाचा व वाचनाचा व्यासंग चालू ठेवणें; "आज मी अत्यंत समाधानाच्या मनस्थितींत आहें. मन शांत आहे—हात जोडले आहेत—'हांके'-ची वाट पाहत आहे," असे योग्याला शोभतीलसे आत्मसमाधानाचे उद्गार काढण्याचें भाग्य उतारवयांत लाभणें या सर्व गोष्टी इतक्या बोलक्या आहेत कीं, केळकर—चरित्राचा भरघोसपणा तर त्या सिद्ध करतीलच करतील; पण त्याबरोबरच प्रचंड उद्योग, जनतेची एकनिष्ठसेवा, त्यागमय जीवन, राजकारण-कुशलता, निष्कलंक चारित्र्य, निर्भय देशभक्ति, बुद्धीचा चौरसपणा व स्वतंत्र-पणा, विद्वत्ता, समतोल नि समंजस विचार, व्यवहारचातुर्य नि श्रेष्ठ लोक-संग्रहबुद्धि इत्यादि महान् गुणांनीं आपले चरित्रनायक कसे संपन्न आहेत हेंहि पण त्याच गोष्टी आपल्याला सहज रीतीनें पटवून देतील.

श्री. तात्यासाहेबांचें चरित्र हें असें बहुरूपी, बहुगुणी नि बहुरंगी आहे. यांपैकीं एकेक गुण वा एकेक कर्तृत्वशाखा जरी माणसाला लाभली तरी त्याला जीवनाची सार्थकता वाटते. नुसता अखिल भारतीय कीर्तीचा संपादक होणें हेंच एखाद्याला केवढें म्हणून भूषण वाटेल ! नुसता नाटककार किंवा कवि किंवा निबंधकार किंवा कादंबरीकार किंवा टीकाकार होण्यानेंच माणसें किती म्हणून फुगतात ! एखाद्या वेळेस नाना ढंग करून का होईना पण नगरपालिकेचे सभासद निवडून येण्यानेंहि माणसें चढून जातात मग अध्यक्ष झाल्यावर तर कांहीं विचारूच नका ! एखादीच संस्था काढली नि वाढविली कीं माणसें स्वतःला केवढी कर्तबगार मानतात ! अशा तऱ्हेनें जीवनांतील एकेक रंगी पदर जरी हातीं लागला तरी माणूस तोच मिरवीत सुटतो. मग

ज्यानें एकट्यानेंच वरीलप्रमाणें विविधरंगी अनेक पदर कमावून, एकत्रित करून जीवनाचा सुंदर गोफ विणला आहे त्याचें कां न कौतुक व्हावें ! एकेक रंग तर मोहक असतोच पण सप्तरंगी इंद्रधनुष्य किती रम्य, आल्हाददायक, आकर्षक नि दिव्यगुणी वाटतें, नाहीं ? एकेक फूल किती मधुर, किती गोड नि किती दिल-रमविणारें असतें, पण त्या सगळयांचा गुच्छ...अहाहा ! माणूस मोहून धरायलाच धावतो कीं !

'नरसिंह' केळकरांचें चरित्र वरील अनेक पदरी गोफाप्रमाणें, त्या दिव्य इंद्रधनुष्याप्रमाणें किंवा त्या सुवासिक गुच्छाप्रमाणें प्रेक्षणीय, आदरणीय नि शिरोधार्यहि आहे. त्यांतील एकेक पदर, एकेक रंग वा एकेक फूल आतां आपण बारकाईनें बघूं या. केळकर-चरित्राच्या भव्य नि उत्तुंग राज-प्रासादांतील एकेक दालन हिंडून, फिरून व निरखून पाहूं या.

---

## प्रकरण २ रें

# केळकर-कुल-वृत्तांत

राज्यकर्त्या इंग्रजांची इंग्लंड ही जशी विलायत तशी दोनशें वर्षांपूर्वीं राज्य करणाऱ्या कोंकणस्थांची 'विलायत' म्हणजे कोंकण. 'केळकरांना कोंकणचें वेड आहे' असें त्यांचे मित्र म्हणतात व केळकरहि कबूल करतात कीं, "मला कोंकणाबद्दल मनांतून प्रेम वाटतें—तें मी कोंकणस्थ म्हणून नव्हे तर कोंकणांतील हवा, पाणी, देखावे, सृष्टिरचना, फलसमृद्धि व शांतता यांच्यामुळें." "कोंकणांत जाऊन मनाजोगें घरठाण व आगर मिळवून त्यांत सुखानें वस्ति

जवळ आयतें बांधलेलें एक घर व ठिकाण अवचित मिळवून पुरी केली. त्या घरांत त्यांनीं अनेक सोई केल्या आहेत. मांडव घातला आहे, झोपाळा बांधला आहे. शिवाय दहा-वीस कलमी आंब्यांचीं झाडें तेथे असल्यामुळें 'नित्य सत्तेचें आंबेफळ खावयास मिळतें, व उरलेंसुरलें पुण्यास आणतां येतें.' पुण्यास अंगणांत मोटरींत बसून केळकर थेट देवगडच्या या ठिकाणीं असलेल्या मंडपांत येतात. कारण येथें "घरांतील कोणच्याहि भागांतून दिसण्याइतका जवळ समुद्र आहे. सपाट मैदान असल्यामुळें वारा दिवसभर चालतो. आणि स्वतःची कल्पना चालवून एका विहिरीजवळ मीं कांहीं चिरेबंदी ओटे बांधले आहेत, त्यांवर समुद्राकडे पाहत छायेंत उघड्या अंगावर वारा घेत तासन् तास बसतों तेव्हां ती सुखाची परमावधि अशी मला वाटते!" असें 'गतगोष्टी'त तात्यासाहेब सांगतात. असें हें केळकरांचें कोंकणप्रेम आहे.

याच कोंकणांत असलेलें ढोकमळें हें केळकर घराण्याचें मूळ गांव होय. येथून इतर शाखा निरनिराळया ठिकाणीं पांगल्या, पण आपल्या केळकरांची शाखा मात्र देवगडच्या पूर्वेस असलेल्या वानिवडें गांवीं आली अशी माहिती निश्चितपणें मिळते. या शाखेचा मूळ पुरुष वानिवडें मुक्कामीं स्थायिक कसा झाला यासंबंधीं पुढील दंतकथा गमतीची वाटेल. केळकरांपूर्वी वानिवड्यास घैसास राहत असत. त्यांच्याकडे हा मूळ पूर्वज पाहुणा म्हणून उतरला. त्याची चालचलणूक व त्याचें रूप पाहून त्याला घरजांवई करून घ्यावें असें घैसासांना वाटलें. पण पाहुण्यानें ही कल्पना अपमानास्पद म्हणून नाकारली व गांव सोडून तो निघाला. पण गांवच्या शिवेवर येतांक्षणींच त्याला फुरसें चावलें. तेव्हां तो परत फिरला नि देवीच्या देवळांत जाऊन पडला. सुदैवानें विष उतरलें. तेव्हां फुरसें चावणें हा गांव सोडून जाण्याला ईश्वरी प्रतिबंध व विष उतरणें ही गांवांत राहण्याची ईश्वरी सूचना अशी त्याची भावना झाली नि तो घैसासांचा घरजांवई बनला व त्यांची सर्व वतनवाडी मिळाल्यामुळें हा केळकरांचा मूळ पुरुष वानिवड्याचा रहिवासी आणि वतनदार बनला!

केळकर मंडळी आश्वलायन शाखीय शांडिल्य गोत्री कोंकणस्थ चित्पावन ब्राह्मण. त्यांची माहिती दोनशें वर्षांपलीकडची मिळत नाहीं. आपल्या

केळकरांच्या पंजोबांच्या पंजोबापासूनचा खालील एकशाखीय वंशवृक्ष उद्बोधक वाटेल.

- विसंभट
  - गणेश
    - विश्वनाथ
      - हरि
        - लक्ष्मण उर्फ आण्णा
          - चिंतामण
            - नारायण
            - महादेव
            - **नरसिंह**
              - काशिनाथ
              - यशवंत

**आबा** नांवाचे केळकरांचे एक चुलत आजोबा होते. स्नानसंध्या व पूजा-अभिषेक करणारे असे ते कर्मठ नि उद्योगी गृहस्थ होते. नृसिंह हे त्यांचें उपास्य दैवत असल्यामुळें त्यांनींच घराण्यांत नृसिंह-जयंतीचा प्रघात सुरू केला. या आबांच्या नृसिंहभक्तीमुळेंच केळकरांचें नांव नरसिंह ठेवलें गेलें.

**लक्ष्मण हरि उर्फ आण्णा** हे केळकरांचे सख्खे आजोबा. हे स्वभावानें गरीब व शेतकरी वळणाचे होते. घरींच शेती करण्याचा प्रघात त्या वेळीं होता. म्हणून पुरुष तर शेतांत राबतच पण बायांनाहि ऐपतीप्रमाणें शेतकाम करावें लागे. केळकरांच्या मातोश्रीनें शेतावर भाकरी नेणें व परत येतांना पाटींतून घरीं चारा आणणें हीं कामें केलीं आहेत. कुटुंब वाढूं लागलें त्या प्रमाणात कांहीं शेतीचें उत्पन्न वाढेना म्हणून देशावर येऊन कुटुंबपोषणाला मदत करावी या हेतूनें आण्णा हे भिडे यांच्या ओळखीनें मिरजेस आले व सरकार-वाड्यांत कारकुनी व शास्त्रिती करू लागले! पंक्तीला जेवून महिना दोन तीन, किंवा दरसाल देणग्यासकट ५०-७५ रुपये मिळत. त्यांतलेच थोडे ते

कोंकणांत पाठवीत! पुढें केळकरांचे वडील मिरजेस नोकरी लागल्यावर आण्णा हे कोंकणांत कायमचे जाऊन राहिले.

**चिंतोपंतदादा** हे केळकरांचे वडील. यांचा जन्म १८४० सालीं झाला. अवघ्या बाराव्या वर्षीं बावडा घाट चढून ७५ कोसांची पायीं मजल करून हे मिरजेस आले! पाय दुखूं लागले म्हणजे पाय दुमडून अंगाखालीं घेऊन बसावें नि ते मोकळे करावेत व कोठें तरी झाडाखालीं भात शिजवून खावा अशा कष्टानें त्यांनीं हा प्रवास केला! यांना शाळा कशी ती माहीतच नव्हती. मिरजेस आल्यावर सरकारवाड्यांत ते नोकरीस राहिले. तेथें पंक्तीस जेवावें, परडीभर चांगलीं ताजीं फुलें पुजेच्या वेळीं श्रीमंतांना सादर करावीं व पागेंतील कारकुनाजवळ अक्षर लिहावें व गणिताची तयारी करावी असा त्यांचा क्रम असे. हेंच काय तें त्यांचें शिक्षण! पण उपजत बुद्धिमत्तेमुळें ते दुसरावर्ग मॅजिस्ट्रेटच्याहि हुद्यापर्यंत चढले! पंक्तीला जेवणापासून सुरवात, पुढें कारकुनी फडांत तीन रुपयांची नोकरी, नंतर तिनाचे पांच, पांचाचे आठ, आठाचे बारा आणि बाराचे सोळा होऊन ते मोडनिंबास अव्वल कारकून म्हणून गेले. **याच मोडनिंबास अवघ्या दोन खणी बिऱ्हाडांत दि. २४ ऑगस्ट १८७२ रोजीं आपल्या चरित्रनायकाचा जन्म झाला.** येथून मिरजेस फौजदार, पुनः मोडनिंबला मामलेदार नतर परत मिरजेला पंचावन्न रुपयांवर खासगी कारभारी अशी बढती होत गेली. कारभाऱ्याची नोकरी त्यांना जिकिरीची नि मोठया चिंतेची वाटे. कारण " या वेळीं पन्नाशी उलटून गेलेली. संसार वाढलेला. तीन मुलांचें कॉलेजांतील शिक्षण सुरू असलेलें. अशा वेळीं यजमानांची लहर बिघडून नोकरी गेली तर काय करावें, अशी त्यांना चिंता वाटे. परंतु एकंदरीनें या नोकरींत फारसा वाईट अनुभव आला नाहीं. उलट १८८८ सालीं वडील बंधु नाना यांचा बी. ए. परीक्षेचा शिक्षणक्रम खर्चास पैसा नाहीं म्हणून थांबविण्याची वेळ आली असतां, यजमानांनीं त्यांना बोलावून 'मुलाचें शिक्षण पुरें करा. मी मदत देतों' असें म्हणून २५० रु. एकरकमेनें त्यांना देण्याचा हुकूम केला." पण १८९१ सालीं केळकर बी. ए. झाल्यावर, वयाचीं पंचावन्न वर्षें भरलीं नसतांनाहि व यजमान आणखी राहा म्हणत असतांहि प्रकृतीची सबब सांगून त्यांनीं नोकरी सोडली व ते साताऱ्यास गेले. त्यांना पोटगीदाखल म्हणून १५ रुपये पेन्शन देण्यांत आलें!

चिंतोपंतदादा हे निमगोरे, बांध्यानें स्थूल पण किंचित् ठेंगणे असे होते. त्यांचा दैनिक कार्यक्रम इतका नियमबद्ध असे कीं, खरोखर त्यावरून घड्याळ-हि लावावें ! स्वतःच्या चैनीवर एक पैहि त्यांनीं कधीं खर्च केली नाहीं. त्यांचा पोषाक अगदीं साधा असे. त्यांनी चोळणा, विजार, बूट हे साऱ्या जन्मांत कधींहि घातले नाहींत. केळकर म्हणतात, " ही त्यांची या गोष्टीची नावड मजमध्यें उतरलेली दिसते ! " दादांचा स्वभाव व त्यांचें फौजदारीचें काम यांजमध्यें फारच विरोध होता. त्यांच्या तोंडात शिवी अगदीं कमी व रागहि थोडा. घरची त्यांची वागणूक तर अत्यंत निरुपद्रवी असे.

**मातुश्री यशोदाबाई:** यांचें माहेरचें नांव काशीबाई भिडे. खाडीच्या कांठावर उभे राहून सासरच्यांनीं मारलेली हांक माहेरी ऐकूं जाई इतकीं माहेर-सासरचीं घरें जवळजवळ होतीं ! आठव्या वर्षी यांचें लग्न झालें व विसाव्या वर्षी या देशावर कायमच्या राहण्यास आल्या. केळकर लिहितात, 'तिचा स्वभाव अत्यंत कष्टाळू व मनमिळाऊ. यामुळें ती सर्व सास्वांना प्रिय असे. कोणाहि दीरनणंदांचें आणि तिचें भांडण झालें नाहीं.' यांना तीन मुलगे नि एक मुलगी अशीं चार अपत्यें झालीं.

मोडनिंबास व पुढें मिरजेससुद्धां केळकराच्या मातुश्रींना अनंत कष्ट उपसावे लागले ! मदतीला कोणी म्हणून नाहीं आणि वडिलाना पगार तर फक्त रु. १२ ! त्यांतून सालीना कोंकणांत पंचवीस ते पन्नास रुपये पाठवावे लागत ! " दोन तीन खणांचें घर. तीन मुलें. धुणेंपाणी सर्व वेशीबाहेर ओढ्यावर व्हावयाचें. सर्वांत लहान मुलाला म्हणजे मला ओढ्यावर नेण्यासारखें नाहीं म्हणून पाळण्यांत ठेवून घराला बाहेरून कुलूप घालून जावयाचें. मग तें आंत रडलें किंवा काय झालें इकडे लक्ष देऊन काय करणार ? डोळे येण्याचें दुखणें तिला मधून मधून होई. शिवाय गळ्याच्या घाटीला व्रण झाला होता तें दुखणें कायमचें होतें. खाणें म्हटलें म्हणजे राळ्याचा भात, जोंधळ्याच्या कण्या, व ज्वारीची भाकरी. तांदुळाचा भात केव्हां केला केव्हां नाहीं अशी स्थिति मोडनिंबला असतांना होती ! "

पुढें मिरजेसहि हीच परिस्थिति. कष्टांत म्हणून कांहीं कमी नाहीं. मिरजेचे पाण्याचे हाल तर कुप्रसिद्धच आहेत. गोड्या पाण्यासाठीं सार्वजनिक हौद नि घरीं आडाचें पाणी खोल व खारें. हौदांत वर्षांतून सहा महिने घागर भरण्याची मारामार तर घरचे आड उन्हाळ्यांत आटून जायचे ! मग काय खर्चाच्या व

धुण्याच्या पाण्याकरितांहि बाहेर जावें लागे. केळकर म्हणतात, "यामुळें आईला अतिशय श्रम पडत. या पाण्याच्या कामांत मात्र आम्हां मुलांकडून तिला थोडीशी मदत होई. शेजारचीं मुलें व आम्ही मिळून हातगाड्यावर घागरी, तांबे व कळश्या घेऊन हौदाचें गोडें पाणी भरून आणीत असूं. पुढें पुण्यास आमचें स्वतःचें घर झालें तें मिरजेच्या घरापेक्षां पुष्कळच मोठें. पण विशेषतः या घरीं चहूंकडे पाण्याच्या नळ्या फिरविण्यांत आल्या. तेव्हां त्या सोईचा मातोश्रीला झालेला आनंद अवर्णनीय ठरला. ती म्हणे, "तात्या, तुझ्या घरांत जिकडे जावें तिकडे, नुसता 'कान पिळल्या' बरोबर हातावर पाण्याची धार धरण्याकरितां अष्टौप्रहर नोकर जसे कांहीं उभे आहेत!"

यांची वृत्ति धर्मशील असल्यामुळें मुलांनीं 'व्रतें केलीं' तेव्हां त्यांना जन्माचें सार्थक झालेंसें वाटलें. एकंदरींत या माऊलीची प्रकृति फार चांगली म्हणूनच तिला मुलांकरितां इतके कष्ट करतां आले. पण त्या कष्टाचें परम चीज झाल्याचें खालील धन्योद्गारावरून कोणाच्याहि लक्षांत येईल. तात्यासाहेब लिहितात, "ती १९२६ सालीं—८३ वर्षांची होऊन—वारली. यामुळें तिला माझा सर्व प्रकारचा उत्कर्ष पाहावयास सांपडला. माझ्या गळ्यांत पडलेल्या पुष्पहारांचा सडा घरीं अंगणांत येऊन पडला म्हणजे 'थांब, तो केर मलाच काढूं दे' असें ती सुनांना म्हणे, व डोळ्यांत आनंदाश्रु आणी!"

हा प्रसंग, हें दोन्ही पक्षीं लाभलेलें भाग्य, ही पुण्याई किती लोभनीय! किती अमर हें दृश्य! माझ्या डोळ्यांपुढें ती माता हा 'केर' काढतांनाच सदैव दिसते नि कां कुणास ठाऊक डोळेहि नकळत आंसवतात, भरून येतात!

**सर्वांत वडील बंधु नाना:** नारायण चिंतामण यांचा जन्म १८६६ सालीं कोंकणांत झाला. मोडनिंबला मराठी पांचवीच्या पुढे शिक्षणाची सोय नसल्यामुळें व परठिकाणीं शिक्षणासाठीं ठेवण्याची ऐपत नसल्यामुळें यांना पांचवींतच दोन वर्षें तोच तो अभ्यास करून एक वर्ष फुकट घालवावें लागलें! पण पुढेंहि कांहीं मार्ग निघेना तेव्हां मधुकरी मागून सोलापुरास राहावें असा निश्चय डोळ्यांतील पाणी खळत नसतांहि, वडिलांनीं केला नि सोलापूरचें प्रस्थानहि ठेविलें! पण इतक्यांत वडिलांची बदलीच मिरजेला झाली नि नानांची मधुकरी टळली!

मिरजेस नानांचा जम चांगलाच बसला नि ते १८८४ सालीं मॅट्रिक झाले व १८८८ मध्यें डेक्कन कॉलेजमधून बी. ए. झाले. वकिल होण्याची हौस

असून व एल्एल्. बी. ची एक टर्म भरली असूनहि त्यांना प्रपंचाची ओढ म्हणून तो नाद सोडावा लागला व रामदुर्गला ४० रुपयांवर हेडमास्तरची नोकरी पत्करावी लागली. पुढें सातारा, पुणें व धुळें येथें त्यांची नोकरी झाली व धुळ्यास असतांनाच १९०४ सालीं ते विषमज्वरानें वारले !

सर्व ठिकाणीं नाना हे विद्यार्थ्यांत व सहकाऱ्यांत फार प्रिय असत. चांगलें शिकवीत तसेंच विद्यार्थ्यांची आस्थापूर्वक चौकशी करून त्यांना मार्गदर्शन करीत व प्रसंगीं वार देऊन, फी भरूनहि साहाय्य करीत. त्याचप्रमाणें सार्वजनिक कार्यांतहि ते लक्ष घालीत असल्यामुळें गांवकऱ्यांतहि त्यांना मोठी मान्यता मिळे. जुन्या मराठी कवींचें काव्य व त्याचें संशोधन याचा त्यांना फार नाद असे. सुप्रसिद्ध 'काव्यसंग्रह' मासिकाचे ते संपादक होते. पुण्यास असतांना भोरच्या तेव्हांच्या युवराजांचे म्हणजे हल्लींच्या अधिपतींचे—श्रीमंत बाबासाहेब पंतसचिवांचे ते दोनवर्षेपर्यंत 'ट्यूटर' म्हणजे खाजगी शिक्षक होते.

नानांच्यामुळेंच केळकरांना 'केसरी'च्या वाचनाचा नाद लागला. त्यांच्यामुळेंच ते निबंध लिहून साताऱ्याच्या वाङ्मयचर्चा-मंडळांत वाचूं लागले. केळकरांनीं वकील व्हावें किंवा स्वतंत्र राहून एखादा खाजगी उद्योग करावा पण सरकारी नोकरींत शिरूं नये हीहि त्यांचीच हौस. केळकर म्हणतात, "आपल्या घरीं एक भाऊ तरी एल्एल्. बी. व्हावा अशी हौस नाना यांनीं धरली, आणि मग ती माझ्या शिक्षणाचे पैसे आपल्या पगारांतून देऊन त्यांना भागवावी लागली....पुढें मी वकिली सोडून पुण्यास येऊन संपादकाच्या धंद्यांत शिरलों, तेव्हांहि त्याला मना न करितां नानांनीं उलट माझें चीजच केलें." सारांश, नानांच्यामुळें केळकर वकील झाले व म्हणूनच टिळकांच्याकडे येऊं शकले व थोर पदवीला पोहोंचले.

**दुसरे वडील बंधु महादेव चिंतामण उर्फ आप्पासाहेब:**—हे १८६८ सालीं कोंकणांत जन्मले. १८८९ सालीं हे बी. ए. झाले व भौतिक शास्त्र या विषयांत पहिले येऊन २५० रुपयांची शिष्यवृत्ति मिळविली. अहमदाबाद कॉलेजमध्यें संस्कृतची 'लेक्चररशिप' मिळाली असतां ती सोडून व ७५ रुपयांची सायन्सच्या शिक्षकाची नोकरी सांगून आली असतांहि ती नाकारून हे रेव्हिन्यू-खात्यांत ३० रुपयांवर लागले!

कारकुनीपासून फर्स्टग्रेड मामलेदारीपर्यंत ते भराभर चढले. १९०९-१० चे सुमारास ते डे. कलेक्टरहि व्हावयाचे पण त्यांचे बंधु तात्यासाहेब हे केसरी—मराठ्याचे संपादक म्हणून सरकारच्या पूर्ण अवकृपेस पात्र झाल्यामुळें त्यांना ती वरची जागा सरकारनें मुद्दाम होऊन दिली नाहीं! अशा वेळीं त्यांनीं सरकारला दिलेलें उत्तर बाणेदारपणाचें आहे. त्यांनीं लिहिलें, "आम्ही एका आईबापाचे मुलगे सख्खे भाऊभाऊ. हें नातें आम्ही तोडूं म्हटलें तरी तुटणार नाहीं व मी तें तोडूं इच्छितहि नाहीं." शेवटीं एका कलेक्टरच्या खटपटीमुळें व विशेषतः यांचें काम चोख असल्यामुळें यांना वरची जागा मिळाली पण पेन्शनीच्या रकमेंत ५०–७५ रुपयांची कायमची नुकसानी झाली ती झालीच! आजच्या पिढींतील सुप्रसिद्ध लेखिका नि विदुषी सौ. **गिरिजाबाई केळकर** ह्या यांच्याच पत्नी होत.

**केळकरांच्या पत्नी सौ. दुर्गाबाईः**—या एका शाळा मास्तराच्या कन्यका शेजारीं शेजारीं राहिल्यामुळें पेंडसे—केळकर घराण्यात निर्माण झालेल्या घरोब्यापोटीं याचा विवाह तात्यासाहेबाशीं सुमारें ५७ वर्षांपूर्वी झाला. या लहानपणीं शाळेंत गेलेल्या नसल्या तरी प्रौढपणीं यांनीं साक्षारता संपादन केली. या लोकमान्यांच्या अत्यंत अभिमानी असून त्यांच्या स्मृतिदिनीं तळेगांवच्या बांगड्या आणून सुवासिनींना वाटीत असतात. केळकर तर यांना घरचा 'बिशप' म्हणजे धर्माध्यक्ष म्हणतात आणि यांच्याशीं केलेले घरांतील धर्माचरणासंबंधाचे तह राष्ट्राराष्ट्रांतील तहापेक्षां अधिक विश्वासानें पाळतात! तात्यासाहेब श्रद्धाळू नसतांहि असें म्हणतात कीं, "माझा जो उत्कर्ष झाला आणि कौटुंबिक सुस्थिति लाभली तिला कारण माझी बायको आहे. अशा कामीं पायगुण म्हणतात तो खरा असेल तर तो तिचा आहे अशी माझी भावना आहे खरी."

श्री. **काशिनाथपंत** व श्री. **यशवंतराव** हे तात्यासाहेबांचे चिरंजीव आणि सुप्रसिद्ध डॉ. **कमलाबाई देशपांडे** या कन्यका. काशिनाथपंत हे टिळक विद्यापीठाचे बी. ए. असून हायकोर्ट प्लीडरची परीक्षा त्यांनीं दिलेली आहे. यशवंतराव हे कवि व मार्मिक इतिहासज्ञ आहेत. डॉ. कमलाबाई या परदेशीं जाऊन पीएच्. डी. होऊन आलेल्या असून कर्वे विश्वविद्यालयांत प्रिन्सिपॉलच्या पदापर्यंत चढल्या होत्या. नुकत्याच त्या वरील संस्थेंतून निवृत्त झाल्या आहेत. लेखिका म्हणून त्या प्रसिद्ध आहेतच.

सर्वांत वडील बंधु नाना, स्वतः केळकर, त्यांचीं मुलें, त्यांच्या वहिनी, त्यांचे चुलतबंधु प्रा. द. के. केळकर, त्यांचे पुतणे व त्यांचे नातु श्रीधर देशपांडे ही सगळीच मंडळी नामवंत लेखक म्हणून महाराष्ट्रांत प्रसिद्ध आहेत. जिथें सगळ्या महाराष्ट्रानें या कुटुंबाचा अभिमान बाळगिला आहे तिथें या कुटुंबियांना किती किती धन्यता वाटत असेल, नाहीं ! आणि ती यथार्थच नव्हे काय ?

---

## प्रकरण ३ रें
## बालपण व शिक्षण

श्री. नरसिंह चिंतामण उर्फ तात्यासाहेब केळकर यांचा जन्म शके १७९४ श्रावण वद्य षष्ठी उजाडता रविवार या दिवशीं पहाटे झाला. इंग्रजी तारीख २४ ऑगस्ट सन १८७२ ही होती. पंढरपूरपासून पंधरा-सोळा मैलांवर असलेलें मोडनिंब नांवाचें लहानसें खेडें हें यांचें जन्मस्थान.

मोडनिंबला एक लहानसा ज्योतिषी होता. त्यानें केळकरांचें टिपण तयार केलें व त्यावर "महानक्षत्रं मुखे पतितं. तस्यफलं विद्वान् भवति. शरीरस्य आरोग्यं भवति" असा शेरा लिहिला. केळकर ज्योतिषावर विश्वास ठेवणारे नाहींत तरीहि ते कबूल करतात कीं, "या खेडवळ ज्योतिषाचें हें भविष्य खरें ठरलें असें माझ्या सर्व आयुष्यांतील चरित्रावरून यथार्थपणें म्हणतां येण्यासारखें आहे."

केळकरांना मूळाक्षरांची ओळख शब्दशः 'धुळाक्षरां'तूनच झाली. लाकडी फळीवर विटकरांची धूळ पसरून तीवर मोळयानें—लाकडी खिळ्यानें—अक्षरें लिहावयाचीं अशीं तीं शब्दशः धुळाक्षरें होतीं. शाळेंतला एक कोपरा जसा या विटकरांच्या धुळीनें लाल झालेला असे तसा दुसरा कोपराहि लालच असे पण तो पंतोजीनें तंबाकू खाऊन मारलेल्या पिचक्यांनीं ! हरिपंतोजी हे केळकरांना धूळपाटीचें शिक्षण देणारे एक गांवठी शिक्षक होते. हे जसे रागीट

तसे मारकटहि होते. ते बसकुरावर बसल्या बसल्याच आपली छडी जमिनी-वर इतक्या जोरानें आपटीत कीं, तीमुळें धूळ उडे. पण जेव्हां या छडीचा उपयोग पाठीवर होई तेव्हां कपड्यांच्या आंतून वळहि उमटत! उभें करणें, ऊठबशा काढावयास लावणें, खुर्ची देणें व घोडीवर चढविणें हे शिक्षेचे सर्व प्रकार अमलांत येत असत. इतके कीं, आईबाप शाळेंत येऊन मुलांदेखतां हरिपंतोजींशीं हमरीतुमरी करीत! मग अशा शिक्षकाची थट्टा करण्याकरिता मुलांनीं 'हरिपंतोजी चकमक डेरा–कानांत बोटं साडे तेरा.' असें यमक जुळ-विलें असल्यास नवल तें काय? मात्र पंतोजीला ऐकूं न जाईल इतक्या बेतानें मुलें आपापसांत तें म्हणत हें काय सांगायला पाहिजे?

पूर्वींच्या या गांवठी शाळांना सरकारी मदत नसे. मुलांना ठरीव फी नसे. पौर्णिमा-अमावास्येला एकेक पैसा व सुपारी आणि सणाला आणखी कांहीं तरी नेऊन गुरूच्यापुढें ठेवण्याची रीत असे. हें जें कांहीं मिळे यावर पंतोजीहि संतुष्ट होत!

सातव्या वर्षीं केळकर हे मिरजेस सरकारी शाळेंत जाऊं लागले. शाळेची इमारत दगडी, त्यामुळें घराच्या मानानें ती श्रीमंत वाटे. बाकें तेव्हां नव्हतीं. मुलांनीं बसकुरें म्हणजे गोणपाटाचे तुकडे घरून न्यावयाचे. शाळेंत जातांना पाटी, पेन्सिली, पुस्तकें इत्यादि वस्तू नेण्यासाठीं 'बंग्या' म्हणजे पिशव्या असत. त्या गळयांत अडकावून शाळेंत जावयाचें. पायांत घालण्यासाठीं जोडे नसत व बूट, वहाणा तर तेव्हां नव्हत्याच. फराळाचे डबे नसत व क्रीडां-गणहि नसे. मधल्या सुट्टींत थंडा फराळ करून मुलें रस्त्यावरच खेळत. गाय-नाचें शिक्षण नसलें तरी 'परवाचा' मात्र चालीवर म्हटला जात असे.

केळकर मराठी दुसरींत असतांना मुंबईचे गव्हर्नर, सर रिचर्ड टेंपल, हे एकदां मिरजेस आले होते. केळकरांची व त्यांच्या मित्रांची समजूत अशी कीं, गव्हर्नराच्या टोपीवर खऱ्या सोन्याचा मोठा चांद लावलेला असतो! म्हणून त्यांनीं व त्यांच्या मित्रांनीं सांपडेल तेथें फटींतून तोंड बाहेर काढून तो चाद दिसतो का हें पाहिलें, पण निराशाच झाली. आणि ती इतकी कीं, त्यांच्या आगमनाप्रीत्यर्थ वाटलेला खाऊहि त्यांना गोड लागला नाहीं!

बाळशास्त्री पंडित या नांवाचे एक डेप्युटी इन्स्पेक्टर होते. ते पुरे साडेसहा फूट उंच, गोरेगोमटे नि भव्य असत. परीक्षेला आलेले त्यांना पाहिले कीं मुलांना त्यांची किती म्हणून दहशत वाटे! हे परीक्षक जितके उंच तितके केळकरांचे

दुसऱ्या इयत्तेचे शिक्षक चिंतोपंत ओगले हे ठेंगणे असत. केळकर लिहितात, " हे चिंतोपंत परीक्षकाच्या मागें उभें राहून मुलांना उत्तरें सुचविण्याची खटपट खरोखरीच करीत; पण पुढें राक्षस व मागें ठेंगू यामुळें त्यांचे बहुतेक प्रयत्न फुकट जात! एकदां हेडमास्तर वर्गावर येऊन त्यांनीं मुलांदेखत चिंतोपंतांची खरड काढली; तेव्हां चिंतोपंत खरोखरीच रडूं लागले. तेव्हां 'मास्तरहि रडतात कीं!' असें आम्ही आपापसांत आश्चर्यानें बोलल्याचें मला चांगलें स्मरतें."

मराठी शाळेंत व पुढें इंग्रजी चार-पांच इयत्तेपर्यंतहि बक्षीस-समारंभाच्या प्रसंगीं केळकर संभाषणांत भाग घेत. वर्गांत नंबर पहिला किंवा दुसरा. दिसण्यांत तरतरीत नि भाषा शुद्ध यामुळें त्यांच्याकडे वरिष्ठप्रतीच्या पात्रांचीं कामें येत. कॅन्यूट व अलेक्झांडर या राजांचीं कामें त्यांनीं सुंदर केली. मात्र " कपाळाला गंध. डोक्यावर जरीची टोपी, व हातांत रुप्याच्या मुठीची काठी येवढ्या सामुग्रीवर " ते राजा होत!

केळकरांचे वडील मिरजेस फौजदार असतांना तिथला टाऊन हॉल बांधला गेला. त्या टाऊन हॉलच्या आवारांत हवीं तितकी फुलें असत. तीं तोडून नेण्याची परवानगी केळकरांना मिळाली होती. कारण त्यांचे वडीलच फौजदार होते. केळकर म्हणतात कीं, " महिनाभर फुलांचा पुडा घरीं पूजेला नेऊन मीं वडिलांकडून चार आणे मिळविले, व त्या पैशांतून रंगी-बेरंगी टाकांचे हात व कागद अशी, जन्मांतील, स्वकष्टार्जित पैशानें स्वतःच्या मालकीची पहिली खरेदी केली!"

**हायस्कूल शिक्षणः**—इंग्रजी पहिली इयत्ता घरीं शिकून केळकर एकदमच दुसरींत बसले. चौथ्या इयत्तेपासून त्यांना पहिला दुसरा नंबर मिळूं लागला, तो सातव्या इयत्तेच्या टर्मिनलपर्यंत. ते लिहितात कीं, " गणित, भूमिति व इंग्रजी व्याकरण या गोष्टींची मीं नेहमीं हेळसांड केली; व अंकगणित तर मला मुळींच येत नसे. बीजगणितांतच जरूरीचे ते माझे सर्व मार्क भरून निघत. पण भाषाविषय जे इतिहास, संस्कृत, इंग्रजी व मराठी या चार विषयांत अधिक मार्क मिळून जात यामुळें नंबर वर टिके....प्रिलिमिनरींत इंग्रजी व्याकरणाच्या पेपरवर शून्य मार्क पाहूनहि निबंधाच्या व भाषांतराच्या जोरावर मला परीक्षेस पाठविण्यांत आलें. व्याकरण व गणित यांजवरील बहिष्कार मीं अद्यापि इमानानें पाळला आहे!"



विद्यार्थी केळकर, सन १८९६



श्रीयुत न. चिं. केळकर, १८९८

केळकरांच्या मास्तर वर्गापैकीं "पानसरे हे थट्टेबाज, फणसळकर हे ऐटबाज, खरे शास्त्रीबोवा हे रसिक, गोगटे हे ताठर, कानिटकर हे कुचक्या स्वभावाचे, जावडेकर हे तिडतिडे आणि अत्रे हे रुबाबदार असत. खरेशास्त्री यांचा तास मुलांना फार प्रिय असे. ते रागावले म्हणजे मुलांना सडकून मारीत; पण कांहीं तरी चांगली कोटी, नवी माहिती, सरस कविता किंवा सुरस गोष्ट यांचा लाभ झाल्याशिवाय तास जात नसे. इंग्रजी सातव्या इयत्तेंत त्यांनीं एकदा मुलां-कडून संस्कृत श्लोक करवून घेतले. त्यांत पहिला नंबर त्यांनीं मला दिला व 'सामान्य बी. ए. मनुष्य असे श्लोक करूं शकणार नाहीं,' असें त्यांनीं वर्गात बोलून दाखविले. पण व्याकरणाच्या बाबतींत मजविषयीं ते निराश होत."

रसेल नांवाचा शाळाखात्याचा इन्स्पेक्टर असे तो वर्गात व शाळेंतहि न येतां फाटकाशींच सारवट ( मेणे ) गाडींत बसूनच शाळा तपासल्याचा शेरा लिही ! काणे इन्स्पेक्टर मात्र वर्गावर जाऊन खरी परीक्षा घेत. त्यांनीं एकदां एका वाक्याचा अर्थ केळकरांना विचारला. त्यांनीं सांगितला, पण काणे यानीं तो चूक म्हटला. त्यासरशी केळकर म्हणाले, " मास्तरानीं शाळेंत सांगितला तसाच मीं बरोबर सांगितला आहे. " हें ऐकून मास्तर कावरे बावरे झाले ! पण काणे शहाणे ते हळूंच म्हणाले, " अरे बाळ, मास्तरांनीं सांगितलें असें म्हणूं नये. आपण चुकलों म्हणावें; व मास्तरांची अब्रू राखावी." आणि मागाहून मास्तरांजवळ म्हणाले, " हा मुलगा धीट दिसतो. हा कोणाचा ? "

पुण्याच्या मुलाच्या मानानें मिरजेचीं मुलें सर्व प्रकारें मागासलेलीं होतीं. वर्तमानपत्रें वाचण्याचा नाद कमीच आणि वर्तमानपत्रेंहि फारशी नव्हतींच. गांव-च्या पांच-चार कपाटें असलेल्या मुख्य लायब्ररींतून अरेबियन नाइट्सचे पांच-पांचशें पानाचे तीन मोठाले ग्रंथ केळकरांना वाचावयास मिळत. अर्थात् त्यांतच त्यांना तल्लीन व्हावें लागे ! सामान्य ज्ञान वाढविण्याचीं इतर साधनें नसत. फक्त जुन्या पद्धतीचे 'स्टोरी टेलर' एक दोनदां शाळेंत आल्याचें व त्याच-प्रमाणें सहा वर्षात फक्त दोनच व्याख्याते मिरजेस आल्याचें केळकर सांग-तात. पुराणाला भाविक श्रोता म्हणून नव्हे तर इतिहासभक्त म्हणून जाणें, भागवतांतील गोष्टी ऐकणें पांडवप्रताप व गुरुचरित्र यांसारख्या पोथ्या वाचणें या गोष्टी लहानपणीं केळकर करीत असत. ते घोड्यावरहि बसत असत.

केळकरांची मुंज आठव्या वर्षीं झाली आणि लग्न १५ व्या वर्षीं झालें.

लग्नाचा मुलगा म्हणून परीक्षेला बसण्याचा एकदां प्रसंग आला त्या वेळीं " टोपी घालून मांडी मोडून पुस्ती काढून दाखवायला भावी श्वशुरापुढें बसावें लागलें. परीक्षेचा हा एकच पेपर मला होता व मी त्यांत पास झालों असें मला जागच्याजागीं सांगण्यांत आलें. सर्वच परीक्षांचे निकाल घरबसल्या असे तडकाफडकी लागले तर किती चांगलें होईल ! " पण लग्न कांहीं या वरील परीक्षकाच्या मुलीशीं झालें नाहीं. तें झालें मोरोपंत पेंडसे यांच्या मुलीशीं आणि तेंहि परीक्षा न देतां !

१८८८ सालीं मॅट्रिक परीक्षेच्या आधींच दीड–पावणेदोन महिने केळकर पुण्यास अभ्यासाकरितां येऊन राहिले. बेळगाव जवळ असूनहि पुण्याचा ओढा म्हणून व पुण्यास परीक्षा देणें ही गोष्ट त्यांना 'ऐटी'ची वाटे म्हणून ते मुद्दाम पुण्यास आले. पुण्यास ही परीक्षा विश्रामबागवाड्यांत झाली. लेखी व तोंडी परीक्षा संपवून ते मिरजेस गेले. तेथें परीक्षा पास झाल्याची तार हायस्कुलांत आली. " निकाल ऐकण्याकरितां आम्ही मुलें चार तास आधीं हायस्कुलांत जाऊन बसलों होतों. ते चार तास चार युगाप्रमाणें गेल्याचें स्मरतें."

**कॉलेज-शिक्षणः**—मॅट्रिक झाल्यावर केळकर १८८९ च्या जानेवारीपासून एप्रिलपर्यंत फर्ग्युसन कॉलेजमध्यें पी. ई. च्या वर्गांत होते. त्या वेळीं हें कॉलेज या एका वर्गापुरतेंच होतें म्हणून त्याला एक दालन पुरेसें होई. शनवारांतील गद्रे यांच्या वाड्यांत हें कॉलेज भरे. इमारत जरी फारशी स्फूर्तिदायक नव्हती तरी शिकविणारे शिक्षक मात्र स्फूर्तिदायक होते. " वा. शि. आपटे यांचें शिकविणें मोठें टापटिपीचें असें. ते विद्यार्थ्यांना नेमकीं उपयोगी पडतील अशींच टिपणें देत असत. (नामदार) गोखले यांना नुसती मिसरूड फुटूं लागली असून त्यांचा गौरवर्ण, कोंवळा चेहरा, व विनयशीलता यांचा परिणाम मुलांच्या मनावर अनुकूल होई. वर्गांतील मुलांत मूल म्हणून शोभून जाण्यासारखे असतां ते प्रोफेसर होऊन मुलांस शिकवितात याचें विद्यार्थ्यांना मोठें कौतुक वाटे. (लो०) टिळक हेहि वर्गांत अत्यंत मितभाषणी असून विषय सोडून अवांतर शब्दहि बोलत नसत. वस्तऱ्याच्या धारेप्रमाणें त्यांच्या बुद्धीची तीव्रता, हजरजबाबीपणांत व कोणत्याहि शंकेचें बरोबर निराकरण करण्यांत विद्यार्थ्यांना दिसून येई. (सुधारक) आगरकरांच्या वर्गांत मात्र विद्यार्थ्यांना घरीं बसल्यासारखें वाटे. त्यांचा चेहरा प्रशांत असून त्यांच्या तोंडावर हंसरेपणाची स्वाभाविक झांक असे. त्यांना दम्याचा विकार असल्याकारणानें

शिकवितांना वरचेवर खोकला येई. त्यांचें शिकविणें विद्यार्थ्यांना पटण्यासारखें पण पाल्हाळिक असे. तात्पर्य, कॉलेजातील प्रत्येक शिक्षकाची पद्धत वेगळी असली तरी विषयज्ञानाच्या दृष्टीनें प्रत्येकजण विद्वान् व प्रोफेसरीच्या कामाला योग्य असाच होता."

१८८९ च्या मे महिन्यांत केळकर कोल्हापुरास राजाराम कॉलेजांत दाखल झाले. 'कृष्णाजी भिकाजी गोखले स्कॉलरशिप' मिळाल्यामुळेंच त्यांना तेथें जावें लागलें. तेथें त्यांचें पुढील दीड वर्ष गेलें. येथें मात्र कॉलेजची इमारत भव्य नि एकूण सर्व प्रकार बडेजावीचा होता. प्रोफेसर वर्गांत विष्णुआण्णा विजापूरकर व बाळाजी प्रभाकर मोडक हे प्रमुख होते. प्रो. विजापूरकर हे प्रेमळ, विनयशील, उद्योगप्रिय नि निष्कपटी होते. त्यामुळें मुलांची त्यांच्या ठिकाणीं फार निष्ठा असे. तळेगांवास येऊन राष्ट्रीय शिक्षणासाठीं समर्थ विद्यालय काढून खटपट करणारे म्हणून पुढें हे प्रसिद्धीस आले. प्रो. मोडक हे भौतिकशास्त्र चांगलें शिकवीत. ते शास्त्रीय वस्तूंचीं प्रदर्शनें भरवीत. या प्रदर्शनांत स्वयंसेवक म्हणून केळकर भाग घेत असत.

यानंतर केळकर पुण्याच्या डेक्कन कॉलेजांत आले व तेथूनच ते १८९१ सालीं बी. ए. ची परीक्षा उत्तीर्ण झाले. डेक्कन कॉलेज आज नाहीं. तें कांहीं वर्षांपूर्वी सरकारनेंच बंद केलें. पण जेव्हां होतें तेव्हां मात्र तें श्रीमंती डामडौला-बद्दल, चैनीबद्दल व ऐश्वर्याबद्दलच जास्त प्रसिद्ध होतें. आईबाप मुलांना 'नवरदेवा' प्रमाणें वागवीत. पण आपल्या केळकरांचे आईबाप पडले गरीब. त्यामुळें ते या श्रीमंत कॉलेजांत गरीब अशाच पद्धतीनें राहात.

खाण्यापिण्याच्या संबंधानें या कॉलेज-क्लबांतील व्यवस्था बरीच मित-व्ययाची असे. दरमाणशीं महिना तेरा-चौदा रुपये खर्च येई. नेहमींचें जेवण चांगलें सुग्रास असें. मधलें खाणें नसें. चहाचा प्रसार मुळींच नव्हता. स्टोव्ह अद्याप दृष्टीसहि पडला नव्हता. अवांतर खुराक म्हणून ताजें दूध असें. खेळून घाम काढून झाला म्हणजे गवळ्याकडे जाऊन ताजें निरसें दूध प्यावयाचें हाच पुष्कळांचा क्रम असे. त्या धारोष्ण व सकस दुधाच्या गोडीची आठवण केळकरांच्या जिभेला अजून होते. त्या वेळीं विड्या ओढणारे विद्यार्थी सहसा नसत. राजवाडे मात्र याला अपवाद होते. मद्याच्या व्यसनाचा बोभाटा मात्र तुरळक ऐकूं येई!

पोषाख-पद्धति साधीच होती. कॉलर व नेकटाय बहुधा नसत. कोणी ऐट

सगळी रात्र विचारांत जागून काढली. एम्. ए. कीं एल्एल्. बी. कीं नोकरी असा हा विचार होता. वडिलांचें म्हणणें नोकरी धरावी, वडील बंधु नानांचे म्हणणें एल्एल्. बी. व्हावें तर केळकरांच्या मनांतून एम्. ए. कडे जावें असें होतें. शेवटीं नानांचें म्हणणें मान्य झालें व केळकर वकिलीच्या अभ्यासासाठीं मुंबईस रवाना झाले. तेथे डेक्कन कॉलेजमधील कांहीं स्नेहीहि आले होते. तेव्हां १०-५ आसामींनीं मिळून क्लब केला नि स्वतःचा आचारी ठेवून जेवण्या-खाण्याची व्यवस्था केली. सुप्रसिद्ध श्रीपाद कृष्ण कोल्हटकर हे तात्यासाहेबांच्या बरोबर डेक्कन कॉलेजांतहि होते व या क्लबांतहि होते.

पहिल्या एलएल. बी. ची परीक्षा केळकर नापास झाले. कारण त्या सालचे परीक्षक चिमणलाल सेटलवाड व नार्मन मॅक्लाऊड यांनीं भलतेंच प्रमाण मनाशीं धरलें व त्यामुळें त्या सालीं एक चतुर्थांश किंवा एक पंचमांश इतकींच मुलें पास झालीं ! पण निराश न होतां याचा वचपा पुढील वर्षी तीच परीक्षा पहिल्या वर्गांत उत्तीर्ण होऊन व रु. ५० चें बक्षीस मिळवून त्यांनीं काढला. दुसऱ्या एल्एल्. बी. चा अभ्यास अवघे नऊ-दहा महिनेच करून ते उत्तीर्ण झाले, एवढेंच नव्हे तर दोन-तीन विषयांत चागले गुणहि त्यांनीं मिळविले. अगोदरच टर्म्स भरलेल्या असल्यामुळें या दुसऱ्या एल्एल्. बी. चा अभ्यास त्यांनीं साताऱ्यासच केला. नुसता अभ्यासच नव्हे तर शिक्षकाची नोकरीहि तीन महिने केली. तीन तासाच्या कामाला तीस रुपये पगार मिळत होता.

केळकर वकील झाले. पण एक गोष्ट लक्षांत येण्यासारखी आहे आणि ती ही कीं, 'मुलाचे पाय पाळण्यांत दिसतात' हें जें कांहीं म्हणतात तें कांहीं येथें दिसलें नाहीं. केळकर पुढें एवढे नामवंत होतील किंवा 'लोकप्रिय व लोक-मान्यप्रियहि' होतील याची त्यांची त्यांनासुद्धां कल्पना नव्हती. मग बरो-बरीचे मित्र "केळकर, तुम्ही इतके पुढें सरसावाल असें आम्हांला तेव्हां स्वप्नांतहि वाटलें नाहीं," असें म्हणत असतील तर त्यांत काय आश्चर्य !

पहिल्या वर्गांत उत्तीर्ण होणारे व शिष्यवृत्त्या मिळविणारे केळकरांच्या वेळचे विद्यार्थी आज कोठल्या कोठें जाऊन पडले. त्यांचें नांवहि महाराष्ट्राला माहीत नाहीं. याच्या उलट केळकर लिहितात, "मी एल्एल्. बी. तर झालोंच, पण वकिली सोडून केसरी-मराठासारख्या पत्रांचा संपादक झालों, तें काम अनेक वर्षे अखंड करूं शकलों, त्या कामांत यश संपादलें, तें काम करीत असता अनेक प्रकारचे वाङ्मयविषयक ग्रंथ लिहून साहित्यिक या नात्यानें बरेंच

नांव कमावलें, आणि एका विवक्षित पक्षाचें राजकारण बरींच वर्षे करून अखेर महाराष्ट्राचें पुढारीपण मिळविलें. एवढेंच नव्हे तर हिंदुस्थानच्या इतर प्रांतांतूनहि थोडीबहुत मान्यता मिळविली. व्यक्तिशः आणि सार्वजनिक दृष्टया हें जें बहुमानास्पद स्थान मला मिळालें, त्याविषयीं माझ्या बरोबरीच्या व माझ्या पिढींतल्या इतर अनेक लोकांना मोठें आश्चर्य वाटतें. कारण विद्यार्थी-दशेंत मी कोणत्याहि प्रकारचा नांवलौकिक मिळविला नव्हता."

सामान्य दर्जाचे विद्यार्थीच बहुसंख्य असतात. "आपल्यासारखे केळकरहि सामान्यच विद्यार्थी होते, पण ते केवढ्या थोर पदवीला चढले! अणुएवढ्या बींतून केवढा विस्तीर्ण, असंख्यांना छायासुख देणारा, मार्गदर्शक नि आल्हाद-दायक वटवृक्ष अवतीर्ण झाला! मग आपल्यालाहि केवढा भविष्यकाळ आहे. मग चला, पुढे चला, 'रुकना तेरा काम नहीं" असें जर ते विद्यार्थी म्हणूं लागले व केळकर चरित्राचा पुढील भाग वाचण्यास अधीर झाले तर त्यांत नवल तें काय?

---

## प्रकरण ४ थें

# लोकमान्यांचे मातबर सहकारी

साधा एल्एल्. बी. वकील लोकमान्यांचा मातबर सहकारी कसा बनला ही उद्बोधक घटना आपल्याला आतां यापुढें पाहावयाची आहे.

केळकर १८९४ सालीं वकील झाले व साताऱ्यास वकिली करूं लागले. वकील म्हटला कीं त्याच्या डोक्यावर पागोटें पाहिजेच म्हणून वडिलांनीं पुढें केलेलें 'घरचें एक जुनें ठेवणींतलें कुचटलेलें पागोटें' फाडून, गुलाबी डूब देऊन बांधवून घेतलें नि तेंच अवजड होतें तरी डोक्यावर कसें तरी घालून यांनीं वकिली सुरू केली. वकिली करण्याची हौस नसल्यानें व ती बेताचीच चालत असल्यानें मुनसफीच्या नोकरीची खटपट चालू होती व अक्कलकोटास शंभर रुपयांवर मुनसफी मिळतहि होती. पण संस्थानांतील अनिश्चित आयुष्य-क्रमाची भीति कांहीं मित्रांनीं व्यक्त केल्यामुळें केळकरांनीं तिकडे नकार लिहून कळविला.

मात्र पुण्यास येण्यापूर्वी हा २३ वर्षांचा तरुण वकील साताऱ्यास आपली छाप निश्चित निर्माण करूं शकला. पुण्यास भरलेल्या राष्ट्रीय सभेला सातारचा प्रतिनिधी म्हणून जाण्याचा मान मिळणें, भर कोर्टामध्यें न्यायाधीश किंकेड यांच्याशीं भाषांतरावरून खटका उडणें व सातारा युनिअन क्लबचा 'टेनिस चँपिअन' असणें या गोष्टींमुळें त्यांनीं सातारकरांचें लक्ष आपल्याकडे वेधून घेतलें होतें. साताऱ्याची सुदर हवा, गृहसौख्य, मित्रसहवास व लोकप्रियता यामुळें केळकर साताऱ्यास रमूं लागले होते; पण दैवाला त्यांना पुणेकर बनवायचें होतें ना! म्हणूनच जणूं कांहीं मिरजेस जाणाऱ्या टिळकांची व सातारचे वकील गोविंदराव रानडे यांची आगगाडींत गांठ पडली व टिळकांनीं "एखादा एल्एल् बी. माणूस लॉ क्लास शिकविण्यास व "मराठ्यां"त इंग्रजी लिहिण्यास मला पाहिजे आहे, बघा एखादा." असें रानड्यांना म्हटल्या-बरोबर "ठीक आहे. बघतों एखादा" असें रानडे बोलले व परत आल्यावर "केळकर, बोला. तुमच्याकारिता काम आणलें आहे. करितां का ?" असा प्रश्न त्यांनीं केळकरांना वकिलांच्या खोलींतच विचारला. मग त्यांनीं टिळकांचें म्हणणें सांगितलें. तें ऐकल्यावर केळकर म्हणाले, "लिहा टिळकांना मी काम पत्करतों म्हणून." सातारच्या मुक्कामांत लेखक, व्याख्याता, कवि व खेळाडू म्हणून केळकरांनी वडील पिढीचा 'एक होतकरू वकील' म्हणून अनुकूल ग्रह बनविला असल्यामुळें सगळ्यांनीं त्यांना उत्तेजनच दिलें व रानड्यांनीं टिळकांना कळविलें कीं, "केळकर यायला तयार आहेत." लवकरच 'केळकरांना ताबडतोब पाठवा' अशी तार आल्याबरोबर घरीं विचारण्या-सवरण्याची वाट न पाहतां केळकर सरळ उठून पुण्यास आले व अशा रीतीनें अकल्पितपणें पुणेंकर झाले !

पण केळकर पुण्याला आले ते केवळ नोकरीच्या नात्यानें नव्हे तर टिळकांनीं रानड्यांना लिहिलेल्या पत्रांत म्हटल्याप्रमाणें, "अखेरच्या दिवसांत मित्रत्वा-च्या नात्यानें काम करून मदत करणारा स्नेही" म्हणून आले. "सार्वजनिक आयुष्यांत जो मला कधींहि सोडून जाणार नाहीं असा सहकारी मित्र व कार्यकर्ता मला मिळाल्यास हवा आहे" असें टिळकांनीं म्हटल्यामुळें केळकर पुण्यास १७ मार्च १८९६ रोजीं आले व केसरी-मराठा संस्थेंत दाखल झाले.

आरंभीं 'लॉ क्लास'चे दोन तास घेऊन 'मराठ्यां'त लिहिणें हेंच काम केळकराना करावें लागे. पुढें प्लेगमुळें व टिळकांवरील खटल्यामुळें क्लास बंद

पडला. मग 'मराठ्या'कडे केळकरांना अधिक वेळ देतां येऊं लागला. ते आपला सर्व वेळ वाचनांत व लिहिण्यांत घालवीत. 'मराठा' पत्राच्या भारतीय महत्त्वामुळें त्यांना मोठें जपून लिहावें लागे. विचारसरणीच्या दृष्टीनें केळकरांचें लिहिणें टिळकांना नेहमींच पटे असें नाहीं; पण भाषा-पद्धति मात्र त्यांना मान्य होई. १८९६ च्या शेवटीं प्लेगमुळें केळकर तीन महिने साताऱ्यास गेले होते व तेथून ते 'मराठ्या'साठीं नियमितपणें मजकूर पाठवीत असत. १८९७ च्या मार्चअखेर प्लेग कमी पडला व त्यानंतर शिवाजी-उत्सव, गणपति-उत्सव हे फार जोरानें साजरे झाले. पण प्लेगचें दुःख व रँडशाहीचा\ जुलूम यांना अनुलक्षून केसरी-मराठ्यांत एकसारखे जहाल व कडक लेख येत राहिल्यामुळें टिळकांवर सरकारचा दांत होतांच. त्यांत पुण्यांत गणेशखिंडीच्या रस्त्यांत रँडचा खून झाल्याबरोबर सरकारनें ताबडतोब टिळकांवर राजद्रोहाचा पहिला खटला भरला !

पण हा वेळ पावेतों टिळक म्हणजे कांहीं लहान सहान आसामी राहिले नव्हते. कौन्सिलमध्यें निवडून येऊन ते नामदार टिळक बनले होते. तसेंच दुष्काळांत 'फॅमिन कोडा'चा आधार घेऊन शेतकऱ्यांना सरकारकडे साऱ्याची सूट व तहकुबी यांची मागणी करायला केसरींतून शिकवून, शिवाजी–उत्सव व गणपति–उत्सव यांच्यामार्फत जागृति करून, हिंदु–मुसलमान दंग्यासंबंधीं हिंदूंना सावध करून टिळक व त्यांचा 'केसरी' हे दोघेहि एकसारखे लोकमान्य व लोकप्रिय होत चालले होते. त्यामुळें या राजद्रोहाच्या पहिल्या खटल्यानें महाराष्ट्रच नव्हे तर अखिल भारत हादरलें व सहानुभूति दाखवून नि साहाय्यक निधी घेऊन प्रांतन् प्रांत खडे झाले. पण अशा तऱ्हेच्या खटल्याचा हा पहिलाच प्रसंग असल्यामुळें सर्वत्र भीतीचें नि निराशेचें वातावरणच अधिक पसरलें. केळकर म्हणतात कीं, "मी व खाडिलकर हे दोघेहि नवीनच असल्यामुळें आम्ही सहजच थोडेंसें गांगरून गेलों."

१४ सप्टेंबर १८९७ रोजीं लो. टिळकांना शिक्षा झाली ! आतां 'केसरी'चे व 'मराठ्या'चे संपादक कोण होणार असा प्रश्न उत्पन्न झाला. टिळकांनीं जेव्हां जबाबदार सल्लागारांमार्फत निरोप पाठविला कीं, 'केळकरांनींच दोन्ही पत्रांचें डिक्लेरेशन करावें,' तेव्हां केळकरांना फारच आश्चर्य वाटलें, पण आनंदहि झाला. केळकर हे एल्एल. बी. खाडिलकरांच्या अगोदर सात आठ महिने संपादकमंडळावर आलेले म्हणून मानानें वडील, 'मराठ्या'त इंग्रजी लिहि-

ण्याचा सराव असलेले नि सावधगिरीनें लिहिणारे म्हणून जसे ते निवडले गेले तसेंच दोन पत्रांवर दोन माणसें नेमून प्रसंगीं सरकारला दोन्ही एकदम बळी देणें हें परवडणारें नव्हतें म्हणूनहि टिळकांनीं एकच नांव आणि तें केळकरांचेंच पसंत केलें. पण आता कांहीं या पत्राचें संपादकत्व म्हणजे सुखाची बाब राहिलेली नव्हती. तें त्यागाचे, कष्टाचें, धैर्याचें नि चातुर्याचें स्थान बनलें होतें. भोंवतीं संकटाचें, भीतीचें वातावरण असतांनाहि हें स्थान नाकारण्याचा नादानपणा करण्याइतके केळकर भेकड ठरले नाहींत ही केवढी अभिमानाची गोष्ट आहे !

'केसरी'चा संपादक होणें, 'मराठ्या'चा संपादक होणें व तेंहि एकाच वेळीं होणें हा केवढा मान ! या वेळीं "केसरी" हा तर खरोखरच केसरीच्या इतमामानें महाराष्ट्रांत वावरूं लागला होता. मतप्रसार करणें व सरकारविरोधी लोकमत व्यक्त करणें हें केसरीचें कुलव्रत बनलें होतें. याच्याच जोडीला विद्या, कला, शास्त्र व संशोधन यांचे पाट येऊन मिळाल्यानें केसरीचें पात्र रुंदावत चाललें होतें. थोडक्यांत केसरी म्हणजे लोक व लोक म्हणजे केसरी असें ऐश्वर्य त्याला प्राप्त झालें होतें. केळकर अवघ्या पंचविसाव्या वर्षीच या ऐश्वर्याचे धनी झाले ! आणि तेंहि केसरीचें संपादकत्व म्हणजे सतीचें वाण झालें असतांना ! सरकारी हिंस्र नजर 'केसरी'वर रोखली गेली असतांना केळकर संपादक म्हणून पुढें आले याबद्दल जनतेला केवढी धन्यता वाटली !

अशा अकल्पितपणें केळकरांचा केसरीशीं संपादकीय संबंध जडला आणि परमेश्वरकृपेनें तो केसरी व केळकर या दोघांनाहि फलदायक नि यशदायक ठरला. अधलीं मधलीं कांही वर्षें सोडलीं तर केळकर हे केसरीचे २५ वर्षें व मराठ्याचे २० वर्षें संपादक होते व एकूण ४१ वर्षें त्यांनीं संस्थेत नोकरी बजावली ! एवढ्या अवधींत एकाच वेळीं दोन्ही पत्रांचेहि ते जवळ जवळ १० वर्षें संपादक होते. म्हणजे दोन्ही भाषेंतील हीं पत्रें एकाच वेळीं चालविण्याचा विक्रमहि त्यांनीं करून दाखविला.

केळकरांच्या या दीर्घकालीन तपस्येचें खालील मुद्द्यांना धरून सिंहावलोकन करतां येईल. (१) केळकर व टिळकांवरील पहिला राजद्रोहाचा खटला, (२) दुसरा राजद्रोहाचा खटला, व टिळकांच्या सहवासांत राहून त्यांनीं केलेली कामगिरी.

## १ टिळकांवरील पहिला राजद्रोहाचा खटला. ( १८९७ )

प्लेगच्या वेळच्या जुलूमशाही कारभारामुळे प्लेग–अधिकारी रँड याचा खून झाला व त्यामुळें सरकार चिडलें. चिडलेल्या सरकारनें राग काढण्यासाठीं टिळकांवर खटला भरला नि त्यांना दीड वर्षांची सक्त मजुरीची शिक्षा ठोठावली. अशा प्रसंगीं केळकर निष्ठापूर्वक पुढें आले व त्यांनीं दोन्ही पत्रांचें संपादकत्व आनंदानें पत्करलें. पण जबाबदारीच्या या पहिल्या कामांत त्यांना आरंभींच जबरदस्त तडाखा बसला. त्याचा प्रकार असा. सतत सतरा वर्षें ज्या छापखान्यांत केसरी व मराठा हीं पत्रें छापलीं जात होती त्या आर्यभूषण छापखान्याचे मालक रा. हरिपंत गोखले यांनीं 'यापुढें केसरी-मराठा पत्रें आर्यभूषणमध्यें छापणार नाहीं' असें बिनदिक्कतपणें सांगितलें ! सर्वत्र भीतीचें वातावरण पसरलें होतें. ज्यांना टिळकांनींच पुण्यास आणून आर्यभूषणचे मॅनेजर व भागीदार केलें होतें त्या गोखल्यांनींच जेथें ऐन संकटाच्या वेळीं दगा दिला नि कृतघ्नपणा दाखविला तेथें दुसरा कोण पुढें येणार ? आणि वेळ तर अवघा तीन दिवसांचा ! पण टिळकांचें दैवच असें बलवत्तर कीं, त्यांना जशीं संकटें आलीं तशीं साहाय्यक माणसेंहि मिळत गेलीं. या वेळेला रविवार पेठेंतला 'विठ्ठलप्रेस'चा एक पेन्शनर मालक पुढें आला व त्यानें हीं दोन्ही पत्रें छापण्याची जबाबदारी पत्करली ! पण गर्दींत गर्दी करूनहि केळकरांच्या नांवाचें 'डिक्लेरेशन' शनिवारपर्यंत होऊं शकलें नाहीं. त्यामुळें १९ सप्टेंबर रविवारचा अंक २० सप्टेंबरला निघाला. तारखेची व वाराची चलबिचल झालेला असा हा मराठ्याचा एकच अंक १९३९ पर्यंतच्या अठ्ठावन वर्षांत निघाला ! पण अंक आठवड्याच्या आठवड्याला निघाला, खंड पडला नाहीं यामुळें टिळकांची अपकीर्ति टळली व लोक म्हणूं लागले, "पहा, टिळकांचें काम हें असें आहे ! तुरुंगांत गेले तरी त्यांच्या वर्तमानपत्रांना भंग नाहीं... टिळकांच्या हाताखालीं असिस्टंट म्हणून दीड वर्षें शिक्षण घेतल्याचें केळकर–खाडिलकरांनीं चीज केलें."

आपल्या संपादकत्वाखालीं निघालेल्या 'मराठ्या'च्या पहिल्याच म्हणजे ता. २० सप्टेंबरच्या अंकांत केळकरांनीं 'दी थॉट ऑफ दी अवर' हा लेख लिहिला. या लेखातील समयोचित गंभीरवृत्तीचा अनेक वर्तमानपत्रांनीं उल्लेख करून शाबासकी दिली. मद्रासच्या 'हिंदु' पत्रानें तर लेखच्या लेख उद्धृत करून केळकरांचें अभिनंदन केलें. त्याचप्रमाणें त्याच मराठ्याच्या अंकांत केळकरांनीं

न्यायमूर्ति स्ट्राची यांच्या ज्यूरीपुढील वाह्यात् भाषणावर निर्भय व जोरदार टीका केली होती. त्याचेहि उतारे इतर वर्तमानपत्रांनीं घेतले होते. सारांश, या लेखांनीं केळकरांना चांगलीच प्रसिद्धि व कीर्ति मिळाली मोठमोठे लोक म्हणूं लागले, "रीयली आर् यू मि. एन् सी. केळकर ? शुअर्ली–यू कॅरी ए व्हेरी बिग हेड ऑन व्हेरी यंग शोल्डर्स." "मि. केळकर हू कंडक्टेड दी 'मराठा' वुइथ कान्स्पिक्युअस ॲबिलिटी इन् मि. टिळक्स ॲबसेन्स..." ✓

याच वेळेला टिळकांचे भाचे व केसरीचे नवे मॅनेजर श्री धोंडोपंत विद्वांस यांनीं आर्यभूषण छापखान्यांतून केसरी–मराठा पत्रांचीं रजिस्टरें, वह्या वगैरे आणविल्या व विंचूरकरांच्या वाड्यांतील एका लहानशा पडवींत खरोखरच दोन देवदारी खोकी मांडून केसरीचें ऑफिस थाटले ! ही या वेळची केसरीची स्थिति व आजची केसरीची स्थिति यांतील महदंतर आश्चर्यकारक व कौतुकास्पद आहे. केळकर लिहितात, "दोन देवदारी खोक्यांनीं केसरीचें ऑफिस सुरू करणाऱ्या धोंडोपंतांना, १९३० च्या ऑगस्टच्या पहिल्या तारखेला तीन लक्ष रुपयांच्या ट्रस्ट–डीडवर सही करतांना गहिंवरून येऊन जन्माचें सार्थक झालें असें वाटल्यास त्यांत काय आश्चर्य !"

१८९७ सालीं संपादक झाल्यावर प्लेगचा कहर, म्हणजे रोजीं दोन-अडीचशें-पर्यंत मृत्युसंख्या चालू असतांनाहि केळकर प्लेगची आपत्ति टाळण्याकरितां म्हणून एक दिवसहि कधीं पुण्याच्याबाहेर राहिले नाहींत. उलट कोठल्याहि संकटांना न डगमगतां टिळक-कार्य आपल्या ऐपतीप्रमाणें पुढें रेटायचें हेंच ब्रीद अखंडपणें त्यांनीं पाळलें. ते त्याच सालीं उमरावतीस भरलेल्या राष्ट्रीय सभेस उपस्थित होते. टिळकांना राजद्रोहाबद्दल शिक्षा झाल्यामुळें त्यांची तसबीर त्या सभेंत लागूं शकली नाहीं व त्यांच्याबद्दल सहानुभूति दाखविणारा नि सरकारचा निषेध करणारा ठरावसुद्धा होऊं शकला नाहीं ! याच वेळीं बंगालचे पुढारी मोतीलाल व सुरेंद्रनाथ आणि पं. मालवीय व 'हिंदु'चे संपादक जी. सुब्रह्मण्य अय्यर वगैरे पुढाऱ्यांची व केळकरांची ओळख झाली. याच उमरावतीच्या राष्ट्रीय सभेंत "प्रांतिक गव्हर्नर हे सिव्हिलियन असावेत कीं विलायतेहून आणावे" या विषयावर केळकरांनीं आयुष्यांतील, राष्ट्रीय सभेंतील व इंग्रजींतील पहिलें भाषण केलें. केळकर म्हणतात, "नव्या उमेदीच्या भरांत मी न अडखळतां तें भाषण केलें."

टिळकांच्या गैरहजेरींतला हा काल केळकरांच्या बाबतींत मोठा कसोटीचा ठरला यांत शंकाच नाहीं. प्लेगचें संकट; प्लेगच्या वेळीं स्वयंसेवक होणें, व मवाळ पक्षांतील लोकांशीं सुजनतेनें वागणें, व केसरींत अद्वातद्वा न लिहिणें यावरून श्री. खाडिलकरांशीं चाललेली धुसफूस; प्रेस कमिट्यामार्फत सुरू झालेला सरकारी कांच; डि. मॅजिस्ट्रेट यांच्याशी झालेल्या मुलाखती; 'विठ्ठल प्रेस'ला लागलेली आग व त्यामुळें पत्रें छापण्याच्या मार्गांत उत्पन्न झालेलें नवें विघ्न; द्रवीडबंधूंचा खून व तो करणाऱ्या चाफेकर व रानडे यांच्यासंबंधीं केसरी-मराठ्यानें लिहिलेलीं 'दिलदार, धैर्यवान् व मर्द' इत्यादि विशेषणें; आणि त्यासाठीं इंग्रजी पत्रांनीं केलेली आडवी तिडवी टीका, या सर्व गोष्टी २६ वर्षांच्या तरुण केळकरांना गांगरून टाकण्यास पुरेशा होत्या; पण केळकर या दिव्यातून यशस्वीपणें पार पडले.

वरील गोष्टींपैकीं दोन तीन गोष्टीचा थोडा अधिक खुलासा करणें आवश्यक आहे. या वेळीं आणि या वयांतच केळकरांची लोकसंग्रहाची नि लोकसेवेची वृत्ति कशी तीव्रतेनें जागृत होती हें दिसून आलें. तार–मास्तरांचा प्रश्न हातीं घेणें व त्यांना संपाच्या वेळीं सहाय्य करणें; प्लेगच्या दिवसांत स्वयंसेवक बनून अधिकाऱ्यांशीं, लोकांच्या सुखसोयीसाठीं सहकार्य करणें व पुण्याच्या आसपास क्लार्क व पायपर या सोजिरांच्या हातून शिकारीच्या वेळीं गोळी लागून मेलेल्या अर्जुनाची बाजू घेऊन मराठ्यांत त्यासंबंधीं कडाडून टीका करून त्याची बाजू धसास लावणें या सर्वच गोष्टी अशा होत्या कीं, त्यामुळें केळकरांचा धैर्य-गुण नि कर्तव्यनिष्ठा हीं आपोआपच सिद्ध झालीं.

'पायपर केस'च्या बाबतींत केळकरांची तीन डि. मॅजिस्ट्रेटशीं बरीच खणाखणी आणि तीहि तोंडावर प्रत्यक्ष मुलाखतींतच झाली. त्यांतल्या त्यांत 'लॅब' साहेबांची तर या 'नरसिंहा'नें मराठ्यांत 'दी एडिटर अँड दी मॅजिस्ट्रेट' हा लेख लिहून फारच भंबेरी उडविली! आणि हिंदुस्थानच्या चव्हाट्यावर त्यांची अब्रू चांगलीच बाहेर काढली!

कमिशनर वुडबर्न यांनीं केळकरांना असेंच एकदां मुलाखतीला बोलाविलें होतें. या मुलाखतीच्या वेळीं केळकर कधींहि दबून किंवा भित्रेपणानें वागले नाहींत. ते अधिकारी, राज्यकर्ते असतील तसा मीहि संपादक आहे अशी स्वाभिमानी वृत्ति कायम ठेवून ते सगळ्यांशीं बरोबरीच्या नात्यानें कसें वागत

वा बोलत व प्रसंगीं त्यांच्यावर युक्तिवादानें कशी मात करीत हें 'गत गोष्टीं'तील त्यांच्या मुलाखती वाचल्यास सहज कळून येईल.

याच वुडबर्न कमिशनरनें मुलाखतींत बोलतां बोलतां केळकरांना एक गमतीचा प्रश्न विचारला. केळकरांनीं एक वर्षभर प्लेग–व्हॉलंटियरचें काम चांगल्या तऱ्हेनें केलें असल्यामुळें त्यांचें नांव वर कळविलें गेलें होतें. ही गोष्ट केळकरांना सांगून व त्यांचें अभिनंदन करून साहेब हळूच म्हणाले, " तुम्हाला एखादी पदवी देण्यासंबंधानें मी सरकारला लिहिलें तर तुमची कांहीं हरकत आहे काय ? " त्यावर केळकर म्हणाले, " नको. कृपा करून तसें कांहीं करूं नका." ते म्हणाले, " मग तुमच्या कामगिरीबद्दल गुणग्रहणदर्शक असें कांहीं करावेंसें सरकारला वाटलें तर त्यांनीं काय करावें ? " थोडेंसें गोंधळल्यानंतर केळकरांनीं लगेच पुढील लोकहितकारक उत्तर दिलें. ते म्हणाले, " आम्ही लोक प्लेग–व्हॉलंटियर झालों ते गांवच्या नागरिकांच्या हिताच्या दृष्टीनें. कर्तव्य म्हणून. तेव्हां या सर्व स्वयंसेवकांचे गुण सरकार घेतें हें त्याना दाखवावयाचें तर शहर म्युनिसिपॅलिटीवरील प्लेगच्या खर्चाचा बोजा सरकारनें कमी करावा, व म्युनिसिपालिटीवर असलेल्या सरकारनियुक्त सभासदांची संख्या पूर्वींइतकीच ठेवावी. ती आठानीं वाढविणार असें म्हणतात तर वाढवूं नये. " साहेबाना· या उत्तराचें आश्चर्यच वाटलें. त्यांनीं हाताखालच्या अधिकाऱ्याजवळ बोलून दाखविले कीं, " केळकरांनीं माझ्या एका प्रश्नाला अपेक्षेबाहेर उत्तर दिलें."

असो. यापुढें कांहीं दिवसांनीं लो. टिळक ५१ आठवड्यांची सक्त मजुरीची कैद भोगून सहा सप्टेंबर १८९८ रोजीं रात्रीं सुटले. कांहीं महिन्यांच्या विश्रांतीनंतर ४ जुलै १८९९ पासून टिळकांनीं केसरी पुन्हां हातीं घेतला. त्या अंकांतील अग्रलेखाचा " पुनश्च हरिःॐ " हा मथळाच इतका असामान्य होता कीं, त्यानेंच जणूं काय वाचकांना " टिळक पुनः संपादक झाले अं ! " अशी आनंदाची बातमी दिली !

या अंकांत टिळकांनीं गैरहजेरींत वर्तमानपत्रें चालविणाऱ्या मदतनिसांचे अत्यंत मनःपूर्वक आभार तर मानलेच, पण इतर अनेक मित्रांनीं व केसरीच्या हितचिंतकांनीं पत्रें पाठवून केळकरांची, त्यांच्या या वर्षांतील नेटाच्या व हिंमतीच्या कामगिरीबद्दल मनसोक्त प्रशंसा केली. एका मित्रानें लिहिलें कीं,

" कॉलेजात असतां तुमच्या पात्रतेविषयीं व बुद्धिमत्तेविषयीं आम्हां मित्र-मंडळींची जी कल्पना होती ती तुम्हीं कांहींच्या काहीं बदलून टाकली आहे! आणि तुम्ही आम्हा सर्वांना मागें टाकून पुढें गेलां व अधिक योग्यतेचे ठरलां यांत शंका नाहीं. तुम्ही अभावितपणें एकदम उदयास आलां आहां. "

१८९९ सालीं टिळकांनीं जरी केसरी आपल्या हातांत घेतला तरी मराठा हा त्यांनीं केळकरांच्याचकडे ठेवला. यापुढील काळात म्हणजे १९०८ सालीं टिळकांवर राजद्रोहाचा दुसरा खटला होईपर्यंत केळकरांनीं टिळकांच्याबरोबर अनेक राष्ट्रीय चळवळी केल्या नि राष्ट्रकार्य पुढें रेटण्याचा प्रयत्न केला. या अवधींत 'ताईमहाराज केस' वगभंगाविरुद्धची चळवळ, स्वदेशी व बहिष्कार यांचा प्रसार, सुरत-कॉंग्रेस, रायगड-उत्सव, निरनिराळ्या परिषदा, पैसाफंड, ग्रंथकार-संमेलन, पुणें म्युनिसिपालिटीतील कामगिरी, व मद्यपान-निषेधक चळवळ इत्यादि गोष्टी केळकरांनीं मोठ्या धडाडीनें व प्रतिष्ठेनें केल्या. केळकर इंग्रजी लेखनांतहि बहाद्दर होते. त्यांनीं मराठा फारच उत्कृष्टपणें चालविला. त्यांच्या भाषेबद्दल व लेखन-कौशल्याबद्दल त्यांचे प्रतिस्पर्धीहि त्यांची मनःपूर्वक स्तुति करीत. "तुम्हीं टिळकांपेक्षांहि 'मराठा' चागला चालविला आहे" व " चिंतामणी यांचा विषयाचा अभ्यास जास्ती पण केळकरांची भाषा अधिक चांगली." हे नामदार गोखले याचे प्रशंसोद्गार अभिमान वाटण्यासारखेच आहेत.

केळकर जरी टिळकांचे 'असिस्टंट' होते व त्यांचें टिळकांशीं जरी शिष्यत्वाचें नातें होतें तरी त्यांनीं आपल्या मतांचा आग्रह कधींहि सोडला नाहीं किंवा टिळकांशीं अंधभक्तीनें ते कधींहि वागले नाहींत. रा. शंकरराव लवाटे लिहितात कीं, " बळवंतराव हे सुधारकांचे विरोधी व नरसोपंत हे त्यांचे पक्षपाती अशी स्थिति होती, हें सर्वांना माहीत होते; व बळवंतराव तर ओळखून होतेच. तथापि केळकरांची सुजनता, काम करण्याची तडफ, निष्ठेनें व कष्टपूर्वक कार्य करण्याची हातोटी आणि योग्यता हे अनन्यसामान्य गुण बळवंतरावांनीं अगदीं पूर्णपणें जाणले असल्यामुळें व असा साहाय्यक आपणांस किती जरूरीनें जोडून ठेवणें प्राप्त आहे हें ते पूर्णपणें ओळखून असल्यामुळें, नरसोपंतांच्या स्वतंत्र वृत्तीचा ते समावेश करून घेत असत. इंग्रजसरकाररूपी कर्दनकाळाशींहि बेधडक मुसंडी देणारे बळवंतराव आपल्या हाताखालीं असलेल्या नरसोपंतांशीं

नमतें घेत असत." अशी ही स्वतंत्र नि बाणेदार केळकरी वृत्ति असे. जी टिळकांशीं वागतांना तीच पुढें गांधींशीं वागतांना व तीच जन्मभर इंग्रजांशीं वागतांना त्यांनीं कायम राखिली.

याच वृत्तीमुळें व कांहीं मतभेदामुळें नोकरीचा राजीनामाहि त्यांनीं टिळकांच्याकडे दोन तीन वेळां पाठविला होता. दर वेळेला टिळक तो नाकारीत एवढेंच नव्हे तर मोठ्या कळवळ्यानें केळकरांना लिहीत कीं, "तुमचें आमचें सहकार्य सुटावें व तुम्हीं आमच्यांतून जावें ही गोष्ट मला अत्यंत दुःखकर वाटेल. कारण तुमचा प्रेमळ स्वभाव, व स्वार्थत्यागाने तुम्हीं स्वतःला आणलेली किंमत किंवा महत्त्व यांची मला पूर्ण जाणीव आहे." विशेषतः मंडालेहून लिहिलेल्या पत्रांतील पुढील ओळी हृदयाचा ठाव घेणाऱ्या आहेत. टिळक लिहितात, "तुम्हीं आम्हांला व आमच्या संस्थेला सोडून जाऊं नये. याविषयीं तुम्हांला ईश्वराचीच शपथ आहे! तुम्हीं सोडून जाणें याहून अधिक दुःखद गोष्ट मला दुसरी वाटत नाहीं. .... आतां माझ्या जागीं तुम्ही क्रमानें आला आहां..." असो. केळकरांचें असें हें मोल टिळकांना वाटत होतें! हें निर्मळ प्रेम केळकरांनीं आपल्या थोर गुणांनीं मिळविलें यात शंकाच नाहीं.

## २ लो. टिळकांवरील दुसरा राजद्रोहाचा खटला.

१९०८ च्या जून महिन्याच्या शेवटच्या आठवड्यांत टिळकांवर राजद्रोहाचा दुसरा खटला भरण्यात आला. जुलैच्या शेवटच्या आठवड्यांत त्यांना सहा वर्षें हद्दपारीची शिक्षा झाली. १८९७ च्या खटल्याच्यामागें प्लेगच्या अधिकाऱ्यांचा जुलूम, दुष्काळपीडेनें गांजलेल्यांचीं दुःखें व रँडचा खून अशी पार्श्वभूमि होती तर कर्झनशाहीचे दुष्परिणाम, बंगालच्या फाळणीनें असंतोषाची भरलेली शीग व त्याचे देशभर उमटलेले पडसाद आणि बंगाल्यांत घडलेले बॉंबगोळ्यांचे अत्याचार अशी या खटल्याच्या मागें पार्श्वभूमि होती. दोन्ही खटल्यांचे मागें मुख्य निर्णायक गोष्ट म्हणजे त्यापूर्वी झालेले खूनच होत यांत शंका नाहीं. पण या दुसऱ्या खेपेस शिक्षा मात्र जबर झाली आणि इतरहि विघ्नें निर्माण झालीं. हा खटला चालविण्याला नामांकित असा हिंदी वकील किंवा बॅरिस्टरहि पुढें आला नाहीं. लोकांची वर्गणी देण्याचीहि छाती होईना तेव्हां टिळकांनीं स्वतःच खटला चालविला! नाहीं म्हणायला तरुण पिढीपैकीं बॅ. बॅप्टिस्टा वगैरेंनीं टिळकांना साहाय्य करण्याचें थोडेंसें धैर्य दाखविलें यात

मात्र शंका नाहीं. टिळकांनीं खटला स्वतःच चालविण्याचें आणखी एक कारण होतें. तें असें कीं, कोणी मोठा बॅरिस्टर बाहेरून आणण्याइतके पैसे त्यांच्या-जवळ नव्हते! मवाळ-जहाल भांडणामुळें मवाळ पक्षीयांची सहानुभूतिहि या वेळीं त्यांना मिळाली नाहीं. खटल्याची दहशत इतकी बसली होती कीं, खटला चालू असतां टिळकांचे कागदपत्र छापून देण्याला सुद्धां कोणी पुढें येईना! एवढेंच नव्हे तर टिळकांच्या घरीं मुलगी देणें किंवा त्यांच्या घरची मुलगी करणें या गोष्टीलाहि लोक मागें घेऊं लागले!

अशा आपत्तींत केळकर किती तत्परतेनें व तडफेनें वागले हें पाहण्यासारखें आहे. खटल्याची हकीकत लोकांना कळावी म्हणून एक दैनिक या वेळीं काढावें यासाठीं ते मुंबईभर हिंड हिंड हिंडले, पण व्यर्थ. कोणी छापखाने-वालाच पुढें आला नाहीं. शेवटीं ती कल्पना त्यांना सोडून द्यावी लागली! पुढें केळकरांनीं टिळकांच्या इच्छेप्रमाणें अवध्या दोन महिन्यांत साडेचारशें पानांचें 'टिळक केस' नांवाचें पुस्तक प्रसिद्ध केलें, पण तें सरकारनें लगेच जप्त केलें! केळकरांनीं कशी तरी जपून ठेवलेली एक प्रत पुढें टिळक सुटून आल्यावर त्यांना दिली. तेव्हां एवढें मोठें पुस्तक अशा अडचणींच्या दिवसांत इतक्या लवकर केळकर काढूं शकले याबद्दल लोकमान्यांनीं केळकरांना मोकळ्या मनानें शाबासकी दिली. या कार्यकुशलतेचा त्यांच्या मनावर कायमचा परिणाम घडला. त्यामुळेंच पुढें 'केस फॉर इंडियन होमरूल' हें पुस्तकहि काढण्याचें काम टिळकांनीं केळकरांच्याकडे सोपविलें व तें त्यांनीं असेंच तडाख्यानें पार पाडलें.

१९०८ च्या खटल्याच्या निकालावर विलायतेंत अपील करण्यांत आलें होतें. यासाठीं खापर्डे व दादासाहेब करंदीकर हे विलायतेस गेले होते. या दोघांचा खर्च नि अपिलाचा खर्च भागण्यासारखा नव्हता म्हणून केळकर-खाडिलकरांनीं लोकांना केसरींतून साहाय्यासाठीं जाहीर विनंति केली होती. पण पुरेशी वर्गणी न जमल्यामुळें केसरीला स्वतःची बरीच रक्कम घालावी लागली. ही रक्कम घातल्यानें केसरी शब्दशः निर्धन झाला व कर्जहि झालें! दडपशाहीमुळें 'आमचा केसरीचा अंक बंद करा' अशीं पत्रें येऊं लागलीं. केळकर लिहितात, " जितकें मिळवावें तितकें खर्चावें, नाहीं तेव्हां मिळेल

तेथून कर्ज काढावें, अशा हलाखीच्या स्थितींत आम्हाला दिवस काढावे लागले!"

या खटल्याच्या निमित्तानें केळकरांना मात्र एक जबरदस्त तडाखा बसला; तो म्हणजे त्यांच्यावरच झालेला खटला व त्यांतून निर्माण झालेली शिक्षा. केळकर हे 'मराठ्या'चे संपादक होते. त्यांनीं न्या. दावर यांनीं टिळकांना शिक्षा देतांना जे कांहीं अपमानकारक उद्गार काढले त्यावर व सहा वर्षे दिलेल्या काळेपाण्याच्या शिक्षेवर 'मराठ्यां'त खरपूस तोंडसुख घेतलें. तो लेख खरोखर इतका चांगला वठला होता कीं, खुद्द नामदार शास्त्री यांनीं तो वाचून असे उद्गार काढले कीं, " यांतला एक शब्दहि बदलणें म्हणजे तें पाप करण्यासारखें होईल!" पण सरकारला हें मत कसे मान्य होणार? सरकारला त्यांत बदनामी वाटली व त्यांनीं केळकरांवर खटला भरून त्यांना चौदा दिवसांची कैद, बाराशें रुपये दंड, व चौदा दिवसांनंतरहि योग्य शब्दांनीं माफी मागेपर्यंत बिनमुदतीची कैद अशी शिक्षा फर्माविली.

" जेवणास लोखंडी थाळी व पाणी पिण्याला लोखंडाचें पात्र, एक कांबळें अंथरायला व एक पांघरायला, खालवर ढेकणांनीं भरून गेलेली तुरुंगांतील खोली व बसल्या बसल्या मिळेल ती झोंप घेऊन रात्र काढणें " इत्यादि 'ऐश्वर्य' चौदा दिवसपर्यंत भोगून, पण त्यांतल्या त्यांत 'शेक्स्पियर' वाचून काढून ते मुदतीनंतर माफी लिहून देऊन मोकळे झाले! वर्षांनुवर्षे तुरुंगांत खितपत पडण्यापेक्षां हाच मार्ग योग्य असा सल्ला प्रमुख लोकांनीं केसरींत पत्र प्रसिद्ध करून दिला होता व केळकरांच्या व्यवहारबुद्धीलाहि तो पटला. कारण, कोर्टाच्या या निकालावर अपील नव्हतें.

असो लो. टिळकांना या खेपेस काळयापाण्याची शिक्षा झाल्यामुळें वक्ते व लेखक यांना या वेळीं चांगलीच जरब बसली. सरकारी दडपशाहीचा वरवंटा वेगानें फिरूं लागला; संस्था बंद पाडल्या गेल्या; गुप्त-पोलिसांचा सुळसुळाट माजला; राष्ट्रीय सभा रोडावली व अरविंदबाबू पांडेचरीला निघून गेले. सर्वत्र एक प्रकारची उदासीनता व निष्क्रियता आली. केसरी चालविणें हें काम फारच बिकट होऊं लागलें. तेव्हां अवांतर विषय घेऊन पण राष्ट्रप्रेमी वृत्ति वाढविणारें लिखाण लिहून केळकरांनीं टिळक-परंपरा चालू ठेवली. आयर्लंडच्या इतिहासावरील लेखमाला व 'संस्कृत विद्येचें पुनरुज्जीवन' ही लेखमाला या दोन्ही वाङ्मयदृष्ट्या व राष्ट्रीयदृष्ट्या मोठ्या लोकप्रिय ठरल्या.

आतां म्हणजे १९१० त केळकर पुनः केसरी व मराठा या दोन्हींचे संपादक होते. आणि टिळक सुटून येईपर्यंत त्यांचें एकच ध्येय ठरलें होतें. तें म्हणजे टिळकांनीं पुढारी म्हणून घालून दिलेला मार्ग–पंथ–रुळविणें, त्यांचें तत्त्वज्ञान जनतेच्या पचनीं पाडणें व त्याची निगा राखणें हें होय. लो. टिळकांनीं राजकीय तत्त्वज्ञानाची गंगा या देशांत अवतीर्ण केली ही गोष्ट खरी, पण ती वायां जाऊं न देतां सगळीकडे फिरवून, सामान्यांच्या आवाक्यांत आणून, तिच्या कांठीं राष्ट्रप्रेमाचीं पिकें काढवून जनतेला ती उपकारक नि पूजनीय करण्याची कामगिरी टिळकांच्या हयातींत, अनुपस्थितींत नि त्यांच्या मृत्यूनंतरहि केळकरांनींच लेखनद्वारा केली असाच प्रामाणिक अभिप्राय कोणालाहि द्यावा लागेल.

१९१४ सालीं लो. टिळक मंडाल्याहून सुटून आले. दोन दिवसपर्यंत तारा, पत्रें व गांठीभेटी यांचा भर होता. पुढें एक दिवस टिळक केळकरांना म्हणाले, " मी खरोखर तुम्हांला सांगतों कीं, जो जो मला भेटला त्यानें तुम्ही केसरी फार चांगला चालविला असेंच मला सांगितलें. कोणींहि तक्रार सांगितली नाहीं किंवा कागाळी केली नाहीं. " लोकहि प्रांजलपणें म्हणूं लागले कीं, " टिळकांच्या गैरहजरींत प्रेस ॲक्टसारख्या संकटांतून निभावून केळकरांनीं केसरी जिवंत ठेवला, इतकेंच नव्हे तर धोरण बिघडवूं न देतां लेखननैपुण्याच्या दृष्टीनेंहि उत्तम चालविला." अशा तऱ्हेनें या दुसऱ्या संकटप्रसंगींहि केळकर सर्वतोपरी कसोटीला उतरले नि टिळकाचे खरे साहाय्यक व मित्र म्हणून प्रसिद्धीस आले.

खालीं केल्यानें पोताच्या ज्वाळा जशा उफाळतात· त्याच्रप्रमाणें संकटांत सांपडल्यानें शूराच्या तेजस्वी वृत्ति उफाळतात, अधिक पेटतात. लो. टिळकांचेंहि असेंच।झालें. सरकारी शिक्षा झाल्या, काळें पाणी झालें, पण यत्किंचितहि न नमतां टिळक दर खेपेला दुप्पट जोमानें उडी घेऊन चळवळ निर्माण करीत व ती भरवेगानें चालवीत. १९१४ सालीं सुटल्यानंतर त्यांच्यावर सरकारनें प्रथम बंधनें घातलीं होतीं, पण महायुद्ध सुरू झाल्यावर तीं बंधनें सरकारनें ढिलीं केलीं. टिळकांनींहि लगेच प्राप्त परिस्थितीचा व महायुद्धाचा फायदा घेण्याच्या दृष्टीनें चळवळ सुरू केली. घटना दुरुस्त करून घेऊन राष्ट्रीय सभेंत स्वपक्ष घुसविणें किंवा तें न जमल्यास आपली निराळी चळवळ करणें हें मुख्य ध्येय त्यांच्यापुढें होतें. स्वपक्षीय मंडळी एकत्रित

आणण्यासाठीं व प्रचारासाठीं त्यांनीं जिल्हा-परिषदा व प्रांतिक-परिषदा भरविण्याची चळवळ घडवून आणली नि ती चांगली यशस्वी झाली. अर्थात् या चळवळींत अनेक तऱ्हेचीं सूत्रें केळकरांनाच हालवावीं लागत. पुणें-परिषदेचे चिटणीस; नाशिकला भरलेल्या प्रांतिक-परिषदेच्या वेळीं अध्यक्ष शास्त्री यांचे साहाय्यक, नगर जिल्हा, सोलापूर जिल्हा व सोलापूर प्रांतिक इत्यादि परिषदांचें कर्तृत्ववान् अध्यक्ष या विविध नात्यांनीं केळकरांनीं केलेली कामगिरी प्रशंसनीय ठरली. सोलापूर–परिषदेच्या शेवटीं डॉ. बेझंटबाई केळकरांच्या जवळ गेल्या नि म्हणाल्या, " तुम्हीं आपले काम फार चांगलें केलेंत व कामाचा उरक फार चांगला दाखविला." त्याच वेळी सर नारायण चंदावरकर यांनींहि पुढील गौरवाचे उद्गार काढले. ते म्हणाले, " मि. केळकर, तुम्हीं आज अध्यक्षाचें काम व एकंदर परिषदेचें काम इतकें चांगलें केलें कीं, त्यावरून, उद्यां आम्ही लोक स्वराज्य चालविण्यास पात्र आहों कीं नाहीं असें कोणीं मला विचारल्यास मी या परिषदेचें उदाहरण देऊन म्हणेन कीं, होय, आम्ही स्वराज्याला पात्र आहों. " येथें हें ध्यानांत ठेवावयास पाहिजे कीं, बेझंटबाई व चंदावरकर हे टिळकपक्षाचे विरोधी होते.

२८ एप्रिल १९१६ रोजीं बेळगांवास टिळकांनीं होमरूल लीग स्थापन केली व केळकरांच्या गैरहजेरींतच त्यांना त्या लीगचे चिटणीस नेमलें. या वेळीं केसरीचे संपादक, टिळकांचे साहाय्यक व वरील स्वराज्यसंघाचे चिटणीस म्हणून केळकरांचा जसा महाराष्ट्रभर लौकिक झाला तसाच वरील कारणांसाठीं व 'मराठा' पत्राचे संपादक म्हणूनहि सर्व हिंदुस्थानांत त्यांचा गाजावाजा झालेला होता.

१९१७ च्या नोव्हेंबरांत हिंदुस्थानचे त्या वेळचे स्टेट सेक्रेटरी मॉंटेग्यू हे जेव्हां हिंदुस्थानांत आले होते तेव्हां त्यांच्याकडे स्वराज्य-संघातर्फे जें शिष्टमंडळ दिल्लीस पाठविलें त्यांत लो. टिळक, डॉ. मुंजे व खापर्डे यांच्याबरोबर केळकरहि होते. या प्रसंगीं भारतमंत्र्याला सादर केली गेलेली कैफियत स्वतः केळकरांनींच तयार केलेली होती. याच सुमारास केळकरांचें संपादकीय लेखन-कौशल्य व त्यांचें इंग्रजी विषयावरील प्रभुत्व पुनः एकदां सिद्ध झालें. त्यांनीं अगदीं थोडया अवधींत " दी केस फॉर इंडियन होमरूल " हें इंग्रजी पुस्तक रात्रीचा दिवस करून लिहून व छापूनहि काढलें नि टिळकांची शाबासकी मिळविली या पुस्तकाच्या प्रति इकडे व विलायतेस ठळक लोकांकडे पाठविण्यांत आल्या

अशा तऱ्हेनें केळकरांच्या कार्यांत नि उपयुक्ततेंत कणाकणांनीं भरच पडत होती. पण टिळकांच्या ६१ व्या वाढदिवसाच्या निमित्तानें पुढाकार घेऊन त्यांनीं जो अल्पावधींत एक लक्षाचा निधि जमविला नि लो. टिळकांना समारंभानें अर्पण केला त्यामुळें तर त्यांचें वजन व त्यांची लोकप्रियता अधिकच वाढली. त्यांच्या या कर्तृत्वाबद्दल त्यांच्या मित्रांनीं त्यांचा सत्कार करून त्यांना एक सोन्याची अंगठी व पुष्पहार अर्पण केला.

१९१८ मध्यें कॉंग्रेस व होमरूल-लीग यांतर्फे विलायतेला जाणाऱ्या शिष्टमंडळाचे चिटणीस म्हणूनहि केळकरच निवडले गेले. टिळक हे चिरोलवर केलेल्या फिर्यादीसाठीं अगोदरच विलायतेला निघून गेले होते. तेथून त्यांची केळकरांना लवकर येण्याविषयीं घाई चालली होती म्हणून केसरी व मराठा या दोन्ही पत्रांचें संपादकत्व कांहीं काळपर्यंत सोडून ते विलायतेस रवाना झाले. तेथें टिळकांचे सेक्रेटरी म्हणून व 'इंडिया' पत्राचे संपादक म्हणूनच ते काम करीत. तेथें संपादकाचें काम त्यांनीं इतकें चोख नि कष्टपूर्वक केलें कीं, शेवटीं निरोप देतांना ब्रिटिश कॉंग्रेस कमिटीनें व या पत्राकरितां नेमलेल्या कमिटीनें त्यांना आठवण म्हणून एक रुप्याचें तबक नजर केलें.

अशा तऱ्हेनें १९१४ ते १९१८ या चार वर्षांत केळकर हे केसरी-मराठ्याचे संपादक म्हणूनच नव्हे तर टिळकांचे 'प्रायव्हेट सेक्रेटरी,' 'पोलिटिकल सेक्रेटरी' व प्रांतिक पुढारी म्हणूनहि प्रसिद्धीस आले होते.

लोकमान्यांच्या मातबर सहकाऱ्याला शोभेशी आणखी एक घटना नमूद करण्यासारखी आहे. ती अशी: विलायतेंत 'चिरोल केस' मध्यें टिळकांना अपयश आलें होतें व विलक्षण खर्चाचा बोजा झालेला होता. या आपत्प्रसंगीं लो. टिळकांना तीन लक्षांचा निधी अर्पण करावा अशी कल्पना निघाली व ती केळकरांनीं पुढाकार घेऊन पार पाडली. १९२० मेअखेर टिळकांना हा निधी मोठ्या समारंभानें व कृतज्ञताबुद्धीनें अर्पण करण्यांत आला. या प्रसंगीं उत्तर देतांना लो. टिळक सद्‌गदित होऊन म्हणाले, "तीन लक्ष रुपये देऊन देशानें मला विकत घेतलें." टिळकांनीं "पर्स-फंडा"ची रक्कम स्वतःला व केसरीला कर्जासारखी मानली व ती फेडण्याचाहि त्यांचा संकल्प होता; पण पुढें दोन-सव्वादोन महिन्यांतच त्यांना मृत्यु आला व ती त्यांची इच्छा तशीच राहून गेली! त्यांची ही इच्छा पुढें केसरीच्या साहाय्यानें केळकरांनीं कशी पुरी केली याची उदात्त कथा नंतर आपण वाचूंच.

*

# प्रकरण ५ वें

# अधिकाराचा कांटेरी मुगुट

" आतां माझ्या जागीं तुम्ही क्रमानें आलां आहां."

—लो० टिळक

लो० टिळक १ ऑगस्ट १९२० रोजीं निवर्तले! महाराष्ट्राच्या व पर्यायानें अखिल भारताच्या इतिहासांत ही मोठी दुर्दैवी घटना ठरली. विशेषतः केसरी, केळकर व टिळकपक्ष यांना तर खरोखर शब्दशः आकाश फाटल्यासारखेंच झालें! अशाहि स्थितींत केळकरांना स्वतःवर पडलेल्या जबाबदारीची किती तीव्र जाणीव होती याची कल्पना त्यांच्याच पुढील शब्दांवरून येईल. टिळकांच्या स्मशानयात्रेलाहि न थांबतां केळकर तांतडीनें पुण्यास आले. याचें कारण सांगतांना ते लिहितात, " केसरीचा संपादक होण्याची खरी जबाबदारी काय हें साऱ्या जन्मांत त्या वेळीं मला जितकें जाणवलें तितकें एरवी केव्हांहि जाणवलें नव्हतें. आणि म्हणून या जबाबदारीच्या जाणिवेनें त्या दुःखाचाहि मला विसर पाडून कार्यप्रवृत्त केलें!...केसरींत टिळकांविषयीं अग्रलेख सामान्य प्रतीचा किंवा अपुरा आला तर माझ्या संपादकत्वाची सगळी अब्रू जाणार व लोक 'केसरी' प्रसंगाला जागला नाहीं अशीं नांवें ठेवणार. हा आरोप टाळण्यासाठीं व वाचकांना मनासारखा मृत्युलेख वाचण्यास मिळावा यासाठीं कर्तव्यबुद्धीनें मी आमच्या मंडळींतून उठलों व पुण्यास निघून आलों. यामुळें केसरींत दहा कॉलमचा अग्रलेख व दहा कॉलम इतर माहिती वगैरे घालून मंगळवारीं सकाळीं वेळ न चुकतां 'केसरी' वाचकाच्या हातीं मला देतां आला."

लोकमान्यांच्या मृत्यूनंतर तात्यासाहेब केळकरांचें व्यक्तिमत्त्व हें खरेंखुरें पणाला लागलें यांत शंकाच नाहीं. टिळकांच्या नंतर केसरीचे संपादक, ट्रस्टी आणि महाराष्ट्राचे पुढारी केळकरच झाले. २१ ऑगस्ट १९०९ रोजीं टिळकांनीं मंडालेहून केळकरांना लिहिलें होतें कीं, " आतां माझ्या जागीं तुम्ही क्रमानें आलां आहां. तुमची कार्यकुशलता, तुमचा अनुभव, आणि तुमचा चांगुलपणा या गुणांमुळें तुम्ही त्या सर्व अडचणींतून निभावून जाल याविषयीं

मला खात्री वाटते." ही लोकमान्यांची आशीर्वादात्मक भविष्यवाणी त्या वेळीं नि पुढें या वेळींहि खरी ठरली. जबाबदारीबरोबर संकटेंहि आलीं. वारसदारीच्या मुगुटाबरोबर तीक्ष्ण काटेही आले. केळकरांनीं तरीहि शीर मागें घेतलें नाहीं. लढणें, झगडणें हाच टिळकबाणा त्यांनीं चालू ठेवला.

संकटें मात्र एकाकीं येत नसतात, सख्या-सोयऱ्यांना, इष्ट-मित्रांनाहि बरोबर आणतात हें जें कांहीं म्हणतात तें या वेळींहि केळकरांच्या प्रत्ययाला आलें. केळकर या वेळीं शब्दशः चतुर्विध संकटांनीं वेढले गेले होते. टिळक-पुत्रांनीं निर्मिलेला जाच; कांहीं स्वपक्षीय गुरुबंधूंनीं आरंभिलेला द्रोह; गांधीवाद व सरकारी अवकृपा अशा या चार बिकट प्रश्नांना केळकरांना तोंड द्यावें लागलें. या सगळ्यांवर तात्यासाहेबांनीं कशी मात केली, केसरी कसा वांचविला, त्याला वैभवशाली नि समृद्ध कसा केला, व टिळकतत्त्व कसें विजयी करून सोडलें ही सर्व कथा मोठ्या पराक्रमाची आणि अभिमानाची गणली जाईल यांत शंकाच नाहीं.

## ( १ ) टिळक-पुत्रांवर दावा

लोकमान्यांच्या पुत्रांवर दावा नि तो केळकरांना करावा लागला. किती विचित्र घटना, नाहीं! पण केळकरांना हें कटु कर्तव्य करावें लागलें. या प्रकरणाचा खालील इतिहास पाहिला म्हणजे केळकरांना या बाबतींत किती मनस्ताप नि यातना सहन कराव्या लागल्या याची कोणालाहि सहज कल्पना येईल.

टिळक वारले आणि आरंभीं तरी त्यांच्या कोलंबो येथील घाईत तयार केलेल्या मृत्युपत्राप्रमाणें सर्व कांहीं मार्गाला लागल्यासारखें वाटलें. त्या मृत्युपत्रान्वयें निम्मा गायकवाड वाडा, उरलेल्या निम्म्या वाड्याचें भाडें, सिंहगडचा बंगला, टिळकांचे सर्व ग्रंथ व त्याच्या प्रति, विम्याचे पैसे, दाग-दागिने, लातूरची गिरणी व जगन्नाथमहाराज यांजकडून एकरकमेनें वसूल झालेले कर्जाचे पैसे इतकी मालमत्ता टिळक-पुत्रांना मिळाली. या मालमत्तेची किंमत सुमारें अडीच-तीन लाख तरी होती.

त्या मृत्युपत्राप्रमाणें केसरी-मराठ्याचा 'ट्रस्ट' निर्माण होऊन केळकर हे संपादक व ट्रस्टी आणि धोंडोपंत विद्वांस हे व्यवस्थापक नि ट्रस्टी असे नेमले

गेले. आरंभीं आरंभीं कांहीं दिवस तरी टिळकांचे मुलगे व ट्रस्टी यांचे संबंध शांततेचे होते. पण पुढें दुर्दैवानें मुलांची दृष्टि फिरली!

लोकमान्यांना मुलगे दोन. रामभाऊ व श्रीधरपंत. वडिलांचे पश्चात् लवकरच त्यांनीं शिक्षणक्रम आखडता घेतला. दोघांचाहि स्वभाव भारी खर्चिक असल्याकारणानें मिळालेल्या मिळकतीला ओहोटी लागली. पुढें पैशाची अडचण भासूं लागल्यावर त्यांची दृष्टि केसरी-ट्रस्टकडे वळली व त्यांना वाटूं लागलें कीं, हें बरें घबाड आहे. त्यांत शिरकाव मिळविण्यासाठीं त्यांनीं तेव्हांपासून केसरीवर व ट्रस्टींवर बिनदिक्कत हत्यार उपसलें! विश्वस्तांवर वाटेल तसे आरोप करण्यास सुरवात केली. एवढेंच नव्हे तर विश्वस्ताबरोबर आपल्या मेव्हण्यांनाहि भरडण्यास कमी केलें नाहीं! कायदेशीर अशी सर्व वांटणी मिळाली असतांनाहि त्यांनीं अधिकाची अन्याय्य हाव धरली व कुरापती काढण्यास सुरुवात केली. प्रत्यक्ष आडदांडपणाहि आरंभिला. रामभाऊ तर छापखान्याचें काम चालू असतांना बेधडक कारखान्यांत जाई व कामगारांना अडथळा करी, फाडतोड करी. एवढेंच नव्हे तर "आम्ही ट्रस्टींना मारून काढूं" अशा धमक्याहि देई. इतर वेळीं ट्रस्टींच्या भागांतील अंगणांत वाटेल ते ढीग टाकावेत, माल रचावा, चुन्याच्या घाणीसारखीं कामें काढावीं, भय्याला वाटेल ते हुकूम करावेत व त्याचें सामान उचलून फेकून द्यावें अशा गोष्टी होऊं लागल्या! यांत केसरीचे वैरी व केळकरांचा उत्कर्ष न पाहवणारे यांनीं त्यांना अधिकाधिक साथ दिली. "तुम्हांला केळकर–विद्वांस यांनीं व तुमच्या मेहुण्यांनींहि फसविलें" असे प्रतिपक्षी चिडवीत व त्यामुळें तर ते जास्तच बेफाटपणें वागत!

ट्रस्टी म्हणून केळकर-विद्वांस यांना मोठा पेंच पडला. रामभाऊंच्या आडदांडपणाला कारखान्यांतील पांचपन्नास माणसांच्या साहाय्यानें आडदांडपणानें उत्तर देतां येण्यासारखें होतें. पण जग काय म्हणेल हा धाक त्यांनीं बाळगिला. पण छापखान्यांत अडथळा आणल्यास जबाबदारी व कर्तव्य कसें पार पाडावें? तेव्हां नाइलाज म्हणून मोठ्या कष्टानें विश्वस्तांनीं कोर्टांत फिर्याद मांडली! बरें, हा अपवाद टाळण्यासाठीं टिळक पुत्रांच्या लीला चालू दिल्या असत्या व भीतीनें कर्तव्य टाळून हक्क सोडले असते तर आज केसरी-संस्थेचें काय झालें असतें याची कल्पनाच न केलेली बरी! आणि पुनः टिळक-इच्छेचा अपमान नि भ्याडपणा पदरीं घेऊन जन्म काढावा लागला असता.

केळकर-विद्वांस हे करायला कांहीं कच्च्या गुरूचे चेले नव्हते. टिळक-पुत्र झाले म्हणून काय झालें? कर्तव्याच्या, पवित्र जबाबदारीच्या, देशकार्याच्या मार्गांत येणाऱ्यांना प्रतिरोधावयाचेंच व टिळकपरंपरा टिकवावयाचीच या निश्चयानें त्यांनीं लोकापवादाला न भितां न्याय मिळविण्याचें ठरविलें व कोर्टाचा मार्ग धरला!

टिळक-पुत्र लायक असते तर संपादकीय बाजूला त्यांना केवढा वाव होता. पित्याच्या पुण्याईवर ते एकदम केवढे उंच झाले असते! आणि महाराष्ट्राला तो सोन्याचा दिवस वाटला असता. पण ते टिळकांच्या, आपल्या, नि देशाच्या भाग्यांत नव्हतें. पुण्यश्लोक वडिलांनीं वेळींच वर्तमानपत्रांच्या कामांत लक्ष घालण्याविषयीं सुचविलें असतां चिरंजिवांनीं उत्तर दिलें कीं, "आम्हांला केसरी नको. आम्हांला त्या छापखान्याच्या भानगडींत पडण्याची इच्छा नाहीं....आम्हांला तुमच्यासारखे लोकमान्य व्हावयाचें नाहीं!" आणि बिचारे अविचारी व तापट तर इतके कीं, त्यांपैकीं एकानें—श्रीधरपंतानें-तर आत्महत्याच केली! अशांशीं विश्वस्तांची गांठ पडली. मग त्यांना कोर्टाचा आश्रय घ्यावा लागला व दाव्याचा निकाल लागेपर्यंत विलक्षण मानसिक यातना सोसाव्या लागल्या यांत आश्चर्य तें काय!

असो. शेवटीं पुणें फर्स्ट क्लास कोर्टांत दाव्याचा निकाल सर्वस्वीं विश्वस्तांना अनुकूल असाच झाला. त्यांनीं मागणी केल्याप्रमाणें बहुतेक ताकिदी टिळक-पुत्रांना कोर्टाकडून दिल्या गेल्या. विश्वस्तांचा खर्चेहि कोर्टानें देवविला. या निकालावर मुलांनीं मुंबई हायकोर्टाकडे अपील केलें, पण त्यांतहि त्यांना अपयशच आलें. कोर्टानें प्रत्येक कागदपत्राची छाननी करून ते सर्व शाबीत ठरविलें. ट्रस्टींनीं खोटे कागद केले हा आरोप सर्वस्वीं निराधार व निर्मूल ठरविला. आणि न्या. ब्रूमफील्ड यांनीं तर स्पष्ट लिहिलें कीं, "ट्रस्टींनीं मुलांना त्रास दिला किंवा छळ केला हा आक्षेप खोटा असून उलट मुलांनींच ट्रस्टींना पद्धतशीर रीतीनें व मनांत एक प्रकारचें धोरण ठरवून चिमटे काढकाढून ट्रस्टींचाच छळ केला." केळकर लिहितात, "न्यायमूर्तींच्या या एका वाक्यानें आठ-नऊ वर्षें भोगलेल्या आमच्या दुःखाचा परिहार झाला असें वाटलें."

या दाव्यासंबंधीं लिहितांना ट्रस्टींचे वकील श्री. अण्णासाहेब भोपटकर म्हणतात कीं, "लोकमान्यांच्या चिरंजिवांवर दावा करण्याचा प्रसंग यावा याबद्दल ट्रस्टींना तर मरणःप्राय दुःख वाटत होतें! परंतु करतात काय बिचारे!

एक तर दावा करून ट्रस्टचें जतन तरी करावें, नाही तर स्वस्थ बसून डोळ्यां-देखत ट्रस्टचा नाश खुशाल होऊं द्यावा, अशा अत्यंत बिकट पेंचांत ट्रस्टी सांपडलेले होते. परंतु अखेर स्वकर्तव्याला जागून त्यांनीं योग्य त्या मार्गाचाच अवलंब केला, याबद्दल टिळकभक्त त्यांना केव्हांहि दुवा दिल्याशिवाय खचित राहणार नाहींत...त्यांनीं या प्रसंगीं दाखविलेल्या मनोधैर्याबद्दल कोणीहि निःपक्षपाती मनुष्य केव्हांहि त्यांचें कौतुकच करीत राहील!"

अशा रीतीनें या दुःखद प्रसंगांतून विश्वस्त पार पडले व १९३० पासून त्यांचा अधिकार निर्वेधपणें चालू झाला.

## (२) गुरुबंधूंचा पक्षद्रोह

१९२० सालीं लो. टिळक मुंबईस वारले. त्या वेळीं टिळकांचे प्रमुख अनुयायी सरदारगृहांत एके ठिकाणीं दारें लावून चर्चा करीत बसले. त्यांत त्यांनीं असे ठरविलें कीं, केळकरांना केसरीचे सर्वाधिकारी व महाराष्ट्राचे पुढारी म्हणून मानावें. टिळकांच्या मृत्यूनंतर कांहीं काळपर्यंत ही जूट राहिली. आरंभीं आरंभीं मुंजे, अणे, केळकर, चिंतामणराव वैद्य, खाडिलकर, शिवरामपंत परांजपे, बेळवी, गंगाधरराव देशपांडे व कौजलगी इतकीं माणसें एक विचाराचीं होतीं. परस्परांविषयीं आदरभावहि त्या वेळीं चांगला होता.

पण महाराष्ट्राला दुहीचा शाप सोडीत नाहीं ना! हींच माणसें पुढें आपापल्या स्वभावाप्रमाणें व प्रवृत्तीप्रमाणें पांगलीं गेलीं. यांपैकीं परांजपे, खाडिलकर व देशपांडे ही पुढारी मडळी सरळ गांधीपक्षांत सामील झाली व आपणच जन्मभर शिकविलेल्या तत्त्वांविरुद्ध प्रचार करूं लागली.

या तिघांचें वर्णन करतांना **गतगोष्टींत** केळकर लिहितात कीं, "देशपांडे यांनीं लवकरच अहिंसेची जपमाळ येवढी मोठी हातांत घेतली, आणि तो जप ते एवढ्या मोठ्यानें करूं लागले कीं, जणुं कांहीं हिंसेच्या तत्त्वांची व यांची उभ्या जन्मांत कधीं ओळखच नव्हती!...दोन वर्षांपूर्वींचे परांजपे दोन वर्षां-नंतर कोणाला ओळखेनासे झाले. आणि हिंसेच्या प्रतिपादनाकरितां ज्यांचें सर्व वाङ्मय सरकारजमा झालें, तेच परांजपे जाहीर सभांतून अहिंसात्मक शांततापूर्ण अशा असहकारितेच्या विशेषणावर जोर दिल्यानें वक्तृत्वांत फिके आणि जाणत्या लोकांत हास्यास्पद होऊन राहिले...अवतारसमाप्तीनंतरचा कृष्ण तशी शिवरामपंत परांजप्यांची स्थिति झाली. त्यांचें कर्तृत्व पूर्वी केवळ

माझ्यासारख्या प्रतिपक्ष्याची नालस्ती करण्यांत दिसून आलें. पुढेंहि त्यांनीं मजवर तोंड टाकण्यास कमी केलें नाहीं. कृष्णाजीपंत खाडिलकर हे मात्र अधिक दैववान्. कारण नवा गुरु भेटला कीं त्याला सदेह आत्मसमर्पण करण्याची शक्ति त्यांच्यामध्यें जबर होती. देशाच्या दृष्टीनेंच काय, पण स्वतःच्या व्यवसायाच्या दृष्टीनेंहि, ज्या वेळीं जो डाव रंगेल तो रंगवावा अशी वृत्ति त्यांना प्रकट करतां आली! आज टिळक काय, उद्यां गांधी काय, आपल्याला तोशीस न पोंचली म्हणजे झालें. बाकी टिळकांकडून मिळविलेली इतर विद्या आणि केसरींतून प्रगट केलेलें जहालपण हें त्यांनीं सर्व गांधींच्या चरणीं वाहिलें. हिंसेची तोंडानें उघड निंदा करणारे व प्रायश्चित्त म्हणून या निंदेची शिक्षा भोगणारे हे तीन तापसी राष्ट्रीय व्याघ्र गांधींनीं निर्माण केलेल्या अहिंसेचें लेबल लावलेल्या पिंजऱ्यांत पडलेले पाहून, १९०८–१९०९ सालचीं आठवण असलेलें ब्रिटिश सरकार मनांत काय म्हणत असेल याची कल्पना कोणालाहि करतां येईल!"

## (३) गांधीवाद किंवा असहकारितेचा डोंगर

लोकमान्यांच्या पश्चात् त्यांच्या राजकीय तत्त्वज्ञानावर आलेलें सगळ्यांत मोठें गंडांतर जर कोणतें असेल तर तें गांधीवादाचेंच होय. आणि तें नाहींसें करून गांधीवादाला टिळक-तत्त्वाची म्हणजे व्यवहारवादाची जोड देण्याची उभ्या भारतांत जर कसोशीनें कोणीं खटपट केली असेल तर ती दे. भ. तात्यासाहेब केळकरांनींच होय! यासाठीं त्यांनीं अनंत कष्ट सोसले, शिव्याशाप खाल्ले, उपेक्षा, अवहेलना सहन केली, पण माघार घेतली नाहीं! म. गांधी म्हणजे केवढे जबरदस्त पुढारी! आपल्या त्यागानें, तपश्चर्येनें नि साधुत्वानें जगन्मान्य बनलेले असे महात्माच! त्यांच्याशीं गांठ होती. मोठमोठाले वीर त्यांच्यापुढें गडगडले, शरण गेले नि बुद्धिवाद बाजूला ठेवून अंधभक्त बनले. जन्मभर दिलेल्या शिकवणीच्या विरुद्ध हे भक्त जेव्हा आपले आपणच व्याख्यानें देऊं लागले तेव्हां माणसें चकितच झालीं!

गांधीजींच्या तत्त्वज्ञानानें अखिल भारत व्यापून टाकलें. अध्यात्मवादच्च मुळीं त्यांनीं राजकारणांत आणला. आणि अध्यात्माला हिंदु मन कसें भुलतें हें जगप्रसिद्धच आहे. असहकारितेचा महापूर आलेला असतांना नि त्या पुरांत नवे व जुनेसुद्धां डोळ्यांदेखत वाहत जात असतांना टिळकतत्त्वाची अमोल

ठेव उराशीं घट्ट धरून व येणाऱ्या लाटा बाजूला ढकलून वर्षानुवर्षे तें तत्त्व जगविण्यासाठीं जर कोणी महापुरुष या देशात ठामपणें उभा राहिला असेल तर ते केळकरच होत! श्रद्धाळूपणा नि बुद्धिप्रामाण्य यांची ती प्रचंड झुंज होती. केळकरांनीं मोठ्या हिंमतीनें नि एकाकीपणानें तो लढा चालविला व शेवटीं वनवासांत गेलेला टिळक-तत्त्वज्ञानाचा राम चौदा वर्षांनीं पुनः राज-कारणाच्या अयोध्येंत आणून सोडला.!

(४) **सरकारी अवकृपाः**—लोकमान्यांच्या हयातींत केसरी व केळकर हे सरकारशीं जसे झुंजले तसेंच त्यांना पुढेंहि झुंजावें लागलें. सरकारी छळाला तोंड देत देत राष्ट्रसेवा करणें व राष्ट्रीय जागृति घडवून आणणें हें केसरीचें कुलव्रतच होऊन बसलें आहे. केळकरांनीं हेंच व्रत चालू ठेवलें. १८९७ सालीं व पुढें १९०८ सालीं सरकारी अवकृपेचे वडगे पाठीवर बसत असतांहि केसरीनें सरकार-विरोधाचें धोरण जें एकदां स्वीकारलें तें पुढेंहि अखंडपणें चालू ठेवलें. सरकारी रोषाची पर्वा न करतां लोकांची बाजू निर्भयपणें मांडणें हें काम १९२० नंतरहि केळकरांनीं कसें निष्ठेनें व निरलसपणें केलें हें वॉकर-खटला, सोलापूर-प्रकरण व सायमन-कमिशन-बहिष्कार इत्यादींच्या माहिती-वरून सहज लक्षांत येईल.

१९२४ सालची गोष्ट त्या वर्षीं केळकरांच्यावर हायकोर्टाच्या बेअदबीचा दुसरा खटला झाला. त्याची हकीकत अशी. पुण्याजवळील लोहगांवीं कांहीं सोजीर लोक शिकारीला गेले असतां त्यांची व गांवकऱ्यांची बाचाबाची झाली. तींत वॉकर या शिपायाच्या हातून सुटलेली बंदुकीची गोळी एका गांवकऱ्याला लागली नि तो त्यामुळें ठार झाला! वॉकरवर खटला झाला, पण सेशन कोर्टांत युरोपियन पंचांनीं त्याला निर्दोषी ठरविला! सेशनच्या न्याया-धीशांना हा निकाल अमान्य वाटल्यामुळें त्यांनीं खटला वर हायकोर्टाकडे पाठविला. पण हायकोर्टानेंहि त्या वॉकरला निर्दोषी म्हणून सोडून दिला! या निकालावर केसरीनें पुढीलप्रमाणें टीका केलीः "हा खटला काळ्या-गोऱ्यांचा असून गोऱ्या माणसांचें पारडें जड ठरावें व काळ्या माणसांचें हलकें ठरावें यांत काय आश्चर्य!" या टीकेमुळें केळकरांवर खटला होऊन ८ ऑगस्ट १९२४ रोजीं हायकोर्टानें त्यांना दोषी ठरविलें व एकूण ५२०० रु. दंड केला.

या खटल्यातील विशेष गोष्ट ही कीं, हा खटला वकील न देतां स्वतः केळकरानींच चालविला; आणि तो इतका उत्कृष्ट रीतीनें व निर्भयपणें चालविला कीं, सर्व भारतीय संपादकांनीं व पुढाऱ्यांनीं त्यांचें त्याबद्दल मनःपूर्वक अभिनंदन नि कौतुकच केलें. केळकरांचा निर्भयपणा व स्पष्टवक्तेपणा त्यांच्या न्यायाधिशापुढील उद्‌गारावरून सहज लक्षांत येईल. ते कोर्टाला उद्देशून म्हणाले, "सामान्य मनुष्याचे सामान्य दोष न्यायाधिशांतहि असतात असें मानणें गैर नाहीं; व टीकाकारांच्या टीकेपेक्षां आपल्या चुकीच्या निकालांनींच आपण हा विश्वास ढळण्यास अधिक कारणीभूत होतों हें त्यांनीं लक्षांत ठेवावें. ज्यावर मीं टीका केली त्या निकालाइतका चुकीचा, सर्वस्वीं अयोग्य, असा निकाल देऊन, वरती लोकांचा विश्वास ढळूं नये म्हणून बेअदबीचा खटला करण्यांत येतो, त्यानें काय साधणार? लोकांचा विश्वास ढळला तो निकाल ऐकून परस्परच ढळला. मीं या बाबतींत टीका करून फक्त लोकमत प्रगट केलें." आपल्या कोर्टांतील शेवटच्या भाषणांत तर त्यांनीं असेंहि बजावलें कीं, "तें माझें मत कायम आहे व बदलणें शक्य नाहीं. असलें मत प्रगट करणें यानेंहि बेअदबी होते म्हणून तें प्रगट करण्याची मला परवानगी नाहीं म्हणाल, तर आपण न्यायबुद्धीनें या प्रकरणीं जी शिक्षा योग्य म्हणून ठरवून द्याल ती मी आनंदानें सोशीन." यावर कोर्टानें ५२०० रु. दंड ठोठावला हें वर सांगितलेंच आहे.

दे. भ. तात्यासाहेबांनीं हा खटला संपादक म्हणून हायकोर्टांत लढविला व तोहि न्यायमूर्तींच्या मानानें आपण कशांतहि कमी नाहीं, संपादक हाहि तितकाच जबाबदार नि श्रेष्ठ माणूस असतो अशा समान भूमिकेवरून लढविला व हिंदी वृत्तपत्रकाराचा दर्जा वाढविला याबद्दल त्यांचें अनेक सभांतून नि वृत्तपत्रांतून अभिनंदन झालें. मुंबई मुक्कामीं भरलेल्या सभेंत बॅ. जयकर म्हणाले, "न. चिं. केळकर यांना मी फार दिवसांपासून जाणतों व त्यांच्या अनेक गुणविशेषांबद्दल मला फारच प्रेम आणि कौतुक वाटतें...लोकदृष्टीला मागेंच राहावयाचें, पण आपलें कर्तव्य चोख व निर्भय रीतीनें करावयाचें अशी त्यांची रीत आहे...आजकाल अठ्ठावीस वर्षें केसरी-मराठा पत्राचें काम ते अत्यंत जबाबदारीनें व चातुर्यानें सांभाळीत आहेत." त्याच सभेंत सौ. सरोजिनीबाई नायडू म्हणाल्या, "या खटल्यांत केळकरांनीं जी धडाडी आणि जें धैर्य दाखविलें, व जें लोकसेवेचें थोर काम बजावलें त्याबद्दल त्यांचें

अभिनंदन मी मोठ्या आनंदानें करतें. केळकर यांनीं लोकमान्यांची परंपरा व धोरण हीं अखंड राखिलीं." पुण्याच्या सभेंत श्री. न. वि. गाडगीळ म्हणाले, "श्री. तात्यासाहेब यांनीं न्यायमूर्तीशीं समानतेची पूर्ण जाणीव ठेवून आपलें काम चालविलें. इतक्या निर्भीडपणें एखाद्या नामांकित वकिलालाहि काम चालवितां आलें नसतें." याचप्रमाणें बेळगांव, कल्याण इत्यादि ठिकाणींहि अभिनंदनाच्या जाहीर सभा झाल्या. अनेक वृत्तपत्रकारांनींहि आपापल्या वर्तमानपत्रांतून या निर्भय लढयाबद्दल अभिनंदन केलें व गांधीजींनींहि आपल्या 'यंग इंडिया' मध्यें केळकरांबद्दल गौरवपर उद्गार काढले.

आतांपर्यंत वर केलेल्या वर्णनावरून केळकर अधिकारपदावर येतांक्षणीं चतुर्विध संकटांनीं वेढले गेले असतांहि, कसे धीटपणें लढले, व संकटें आलीं असतां तीं पायांखालीं घालून वर ताठ उभें राहण्याचें टिळक-तत्त्व त्यांनीं कसें सिद्ध केलें हें सहज लक्षांत आलें असेल. याच निर्भयवृत्तीसाठीं त्यांना लोकमान्यांचे पट्ट शिष्य म्हणून जर महाराष्ट्रानें संबोधिलें नि गौरविलें तर तें योग्यच नव्हे काय !

---

## प्रकरण ६ वें

# संपादकांचा राजा

**"हिंदुस्थानांतील सर्वांत पहिल्या दर्जाच्या आजच्या वृत्तपत्रकारांत केळकरांची गणना केली पाहिजे. कदाचित् ते पहिल्या प्रतीच्या विद्यमान वृत्तपत्रकारांत पहिले आहेत असेंहि म्हणावें लागेल."**

—बी. जी. हॉर्निमन. ( १९३२ )

नवयुगप्रवर्तक विष्णुशास्त्री चिपळूणकर, सुधारकांचे अग्रणी आगरकर व कै. लो. टिळक या थोर महात्म्यांप्रमाणेंच सरकारी नोकरी नि वकिली यांचा मोह सोडून दे. भ. केळकर हे ऐन पंचविशींत, वरील थोरांच्याच पाऊलावर पाऊल टाकून, वृत्तपत्रव्यवसायांत शिरले. त्या काळीं संपादक होणें व

त्यांतल्या त्यांत लो. टिळकांचा सहकारी होणें हें केवळ सतीचें वाण होतें. पण तेंच भाग्य समजून केळकर पुढें आले व या व्यवसायांत शिरून स्वदेश, स्वधर्म नि स्वभाषा यांची चिरकाल टिकणारी उन्नति करून स्वतःला व देशाला त्यांनीं धन्य केलें.

आपल्याकडील वृत्तपत्रसृष्टींत 'प्रचारयुग' चालू असतांना केळकरांनीं या व्यवसायांत पदार्पण केलें. सरकारी प्रचार हाणून पाडून त्या ठिकाणी देशप्रेम, धर्मप्रेम व स्वभाषाप्रेम निर्माण करावयाचें होतें. स्वाभिमानशून्यता घालवून आत्मविश्वास व कर्तृत्व उत्पन्न करावयाचें होतें. यासाठीं शिकवण देणारीं माणसेंहि त्याच गुणांनीं संपन्न असावीं लागतात. निष्ठा, त्याग, कष्टाची हौस निर्भयता, विद्वत्ता, व्यासंग, शुद्ध चारित्र्य व जनसेवेची आवड या सद्गुणांच्या भांडवलावरच हा राष्ट्रोद्धाराचा व्यापार करतां येतो हें केळकर-चरित्रावरून पूर्णपणें लक्षांत येण्यासारखें आहे. मवाली, भ्रष्ट, पोटार्थी नि दुष्ट यांचें या क्षेत्रांतील पदार्पण हें राष्ट्रविघातक कसें ठरतें हें आज आपल्याभोंवतीं आपण कांहीं प्रमाणांत पाहतोंच आहोंत. आणि म्हणूनच खरा हाडाचा संपादक कसा असावा लागतो याचा आदर्शच केळकरांच्या रूपानें आपल्यापुढे मांडण्याचा प्रयत्न करतों.

'केसरी' म्हणजे लोक व लोक म्हणचे 'केसरी' असें अद्वैत लोकमान्य टिळकांनीं निर्माण केलें. अर्थातच लोकमत व्यक्त करणें हें केसरीचें ब्रीद ठरून गेलें. तें मतप्रदर्शनाचें कार्य करीत असतांना कोणाच्याहि रागालोभाची त्यानें पर्वा केली नाहीं. निर्भयपणें त्यानें सरकारशीं जसें अनेकवार झुंज केलें तसेंच प्रतिकूल नि भ्रांत लोकमताशींहि त्यानें झगडावयास कमी केलें नाहीं. यासाठीं लागणारी निर्भयता नि निस्पृहता केळकरांच्या ठिकाणीं पूर्णत्वानें असल्याचें अनेक वेळां निदर्शनास आलें आहे. निरनिराळ्या 'डिस्ट्रिक्ट मॅजिस्ट्रेटस्शीं' झालेले त्यांचे झगडे, कमिशनरच्या लघळपणाला त्यांनीं दिलेलें बाणेदार उत्तर, हायकोर्टींतील त्यांचा गाजलेला खटला,त्यांचें मध्यवर्ती विधिमंडळांतील कार्य, स्वहिताचा लोभ बाजूला सारून स्वतंत्रवृत्तीनें गांधींवादाशीं झालेला त्यांचा भारतीय कीर्तीचा लढा व आपलें कार्य मनाप्रमाणें पुरें झाल्याबरोबर अधिकारपदावरून आपण होऊन निवृत्त होण्याचा उदारपणा या सर्व गोष्टी केळकरांच्या ठिकाणचे वरील उज्ज्वल गुणच नाहीं का दाखवीत ?

प्रखर बुद्धिमता, ज्ञानलोभ व व्यासंग यांचें विलक्षण साहचर्य केळकरांच्या ठिकाणीं आढळून येतें. संपादक म्हणून त्यांना विविध विषयांचा अभ्यास करणें भाग होतें. राजकारण, अर्थशास्त्र, भाषाशास्त्र, समाजशास्त्र, इतिहास, तत्त्वज्ञान व शिक्षणशास्त्र या विविध शास्त्रांच्या अभ्यासाला लागणारी तीव्र बुद्धिमत्ता जशी त्यांच्याजवळ आहे, तसाच प्रचंड ज्ञानलोभ नि त्याच्या तृप्तीसाठीं लागणारा व्यासंग हेहि त्यांजपाशीं अमर्याद आहेत. ज्ञानार्जनाची ही तीव्र लालसा व ज्ञानदानाची ही संपादकीय कामगिरी यांमुळें केळकरांनीं 'केसरी'चें पात्र रुंदच रुंद करून त्यांतून विद्या, कला, शास्त्र व संशोधन यांचे पाटच पाट वाहविले. लोकांची भूक वाढविली आणि ती पुरी करण्यासाठीं "केसरी" वाढविला, आणि संपादकीय दर्जाहि त्याबरोबर उंचावत नेला. देशाची उन्नति म्हणजे सर्व क्षेत्रांतील उन्नति. व्यापार, उद्योगधंदे, लष्करी शिक्षण, संशोधन, वाङ्मय, कला नि आरोग्य या विविध अंगांनीं देश जेव्हां प्रगत होईल तेव्हांच त्याचा उद्धार होईल ही व्यापकदृष्टि त्यांनीं महाराष्ट्राला देऊन लोकसंग्रह शिकविला. साधनानाम् अनेकता ही 'केसरी'ची शिकवण तर सुविख्यातच आहे. ही शिकवण द्यावयाची म्हणजे ती देणाराची तयारीहि तशीच दांडगी असावी लागते, आणि ही तयारी वरील गुणांशिवाय म्हणजे बुद्धिमत्ता, ज्ञानलोभ व व्यासंग यांशिवाय कशी शक्य आहे ?

स्वाभिमान, स्वतंत्रवृत्ति व मतांची खंबिरी यांशिवाय नामवंत संपादक होऊं शकेल काय ? मानी संपादकाचे हे गुण म्हणजे केवळ प्राणच होत. केळकरांनीं प्राणापलीकडे या गुणांची जपणूक केलेली आहे. गव्हर्नर, व्हॉइसरॉय, संस्थानिक व पुढारी यांच्यांशीं वागतांना ते कसे स्वाभिमानपूर्वक बोलत व चालत याची सुंदर नि मनोरंजक माहिती 'गतगोष्टींत' वाचावयास सांपडतेच. पण त्यांतल्या त्यांत या बड्या लोकांशीं बोलतांना दिसून येणारी त्यांची स्वतंत्रवृत्ति, त्यांची बुद्धीची चमक व प्रतिपक्ष्यावर कुरघोडी करणारें त्यांचें वादकौशल्य हीं पाहून मन प्रसन्न होतें. या दृष्टीनें "कांहीं 'बड्या' लोकांशीं संबंध" हें गतगोष्टींतील प्रकरण फार वाचनीय आहे.

अधिकाऱ्यांशीं ते स्वतंत्रपणें व अभिमानानें वागत यांत कांहीं तितकेंसें नवल नाहीं. पण आपल्या स्वतंत्र मतांबद्दल ते जेव्हां लोकमान्यांशीं झगडत नि प्रसंगीं राजीनामाहि देण्याची तयारी दाखवीत तेव्हां त्यांच्या स्वतंत्रवृत्तीचें

व स्वाभिमानाचें खरोखर टिळकांनाहि कौतुक वाटल्याशिवाय राहिलें नसेल. " लोकमान्यांचे मातबर सहकारी " या प्रकरणांत श्री. लवाटे यांची दिलेली आठवण या दृष्टीनें पुनः एकदां अवश्य वाचण्यासारखी आहे. मतांच्या खंबिरी-शिवाय माणसाला ताठपणा हा येणारच नाहीं. आत्मविश्वासाच्या पोटीं ती खंबिरी निर्माण होते. अंधश्रद्धेचा अभाव, बुद्धिप्रामाण्य, आत्मविश्वास व मतांची खंबिरी या गुणांच्या जोरावर त्यांनीं गांधीजींच्या महात्मेपणाचाहि मुलाहिजा राखिला नाहीं. तर चौफेर हल्ले चढवून व गांधीवादाचें अव्यवहार्य स्वरूप देशापुढें स्पष्टपणें मांडून त्यांनीं बुद्धिवंतांना शुद्धीवर आणलें व गांधीवाद निर्जीव करून सोडला !

पुष्कळ लिहावयास व वाचावयास मिळेल म्हणून केळकर 'केसरीं' त आले असें म्हटलें जातें. त्याचा अर्थ एवढाच करावयाचा कीं, तात्यासाहेब हे हाडाचे साहित्यिक आहेत. त्यांच्यांतील वाङ्मयगुणाला केसरीमुळें वाव मिळाला कीं त्यांच्या या गुणामुळें 'केसरी' महत्पदाला चढला हें सांगणें जरी कठीण असलें तरी या उपजत गुणामुळें महाराष्ट्राला एक थोर साहित्यसम्राट् लाभला हें मात्र खरें. केळकर हे स्वयंसिद्ध आहेत. " आमच्या तात्यांना कोणीं शिकविलें आहे ? ते आपले आपणच तयार होत गेले आहेत." हे लोकमान्यांचे उद्गार म्हणजे केळकरांच्या प्रतिभेची, त्यांच्या वाङ्मयगुणाची नि या कार्यातील त्यांच्या निष्ठेची केवळ प्रशंसाच नव्हे काय ?

केव्हां काय शिकवावयाचे हें जसें संपादकाला जाणावें लागतें तसेंच तें कसें शिकवावें, कसें आकर्षक करावें व तें कसें सोपेपणानें वाचकांच्या गळीं उतरवावें हेंहि पण त्याला माहिती असावेंच लागतें. केळकर या बाबतींत केवळ उस्ता-दच आहेत. नवे नवे विचार प्रसवणारी प्रतिभा, तिच्या जोडीला अखंड वाचन व मनन यामुळें त्यांच्या लिहिण्यांत विचारसौष्ठव, सूक्ष्मविवेचकशक्ति व परस्पर विरोधी विचारांचा समन्वय घालण्याची रीत इत्यादि गुण प्रामुख्यानें दिसून येतात. स्वदेशप्रेम व संस्कृतीची आवड यांच्या प्रकर्षामुळें त्यांचें लिहिणें पाखंडी नाहीं, उच्छृंखल नाहीं, आततायीपणाचें नाहीं तर तें सुसंस्कृत, भारदस्त, प्रमाणबद्ध, औचित्यपूर्ण, नियमित व मोहक असतें. तें मोहक असण्याचें खरें कारण म्हणजे केळकर हे ललित-लेखनाचे महारथि आहेत. उघडा बोडका विचार न मांडतां तो पल्लवीत करून, बहरून मांडावा; रसासहित कोणताहि

प्रसंग वाचकांपुढें हुबेहूब निर्माण करावा. व उपमा-अलंकारांनीं आपलें लिहिणें सजवावें, नटवावें; याच्याच जोडीला सुसंस्कृत विनोदाची नियमित पखरण इतस्ततः घालावी यामुळें त्यांचें लिहिणें मोठें मनोहर, रूपसुंदर नि भव्य होतें यांत शंकाच नाहीं. अशा तऱ्हेचें लिहिणें अंकामागून अंक नि वर्षानुवर्षें अखंडपणें चालू होतें. तें त्यांचें विविध, विपुल आणि गुणसंपन्न लेखन पाहून बहुधान्य प्रसवणाऱ्या धरित्रीमातेचीच आठवण होते. प्रतिवर्षी भूमाता राशीच्या राशी देते नि त्या आपल्याला 'दौलतीचे दिव्य ठेवे' वाटतातच कीं नाहीं ?

देशभक्त केळकर जसे भाषाप्रभु आहेत, निर्भय आहेत, ज्ञानी व व्यासंगी आहेत तसेच ते माणुसकीच्या गुणांनींहि पण संपन्न आहेत. क्रांतिकारकांच्या अपेष्टांनीं हळहळणाऱ्या त्यांच्या हृदयाला सोलापूरच्या लष्करी कायद्यानें अनंत वेदना व्हाव्यात हें सहाजिकच होय. वॉकर-खटल्यांत त्यांनीं खेडुताची बाजू घेऊन उभें ठाकावें हें योग्यच वाटतें. त्यांचें मायाळू हृदय प्लेगच्या दिवसांतदेखील देशबांधवांना साहाय्य करतांना आपण पाहिलें. ते जसे कनवाळू व कष्टाळू आहेत तसेच ते न्यायी व उमद्या स्वभावाचेहि आहेत. प्रतिस्पर्ध्यावरहि आपल्या हातून अन्याय होऊं नये हें ते प्रथम पाहतील व चुकून झालाच तर त्याबद्दल ते वाईट वाटून घेतील इतका सुजनपणा त्यांच्या ठिकाणीं आहे. प्रतिपक्षांशीं भांडतांना अगदीं सडेतोडपणें आणि प्रसंगीं कठोरपणेंहि ते बुद्धिवाद करतील; पण मित्रत्वाला त्यामुळें ते कधींहि बाध येऊं देणार नाहींत. लोकनायक बापूजी अण्यांशीं त्यांचे झगडे होऊनहि ते दोघे परमस्नेही आहेतच की नाहीं ? त्यांचा स्वभावच मोठा उमदा नि दिलदार आहे. तेवढ्यापुरतेंच भांडण भांडायचें. त्याचा डंख वर्षानुवर्षें मनांत धरायचा नाहीं. अनुदार, दुष्ट, कुढी नि घातकी वृत्ति जर त्यांनीं ठेविली असती तर त्यांना एवढा अफाट नि विस्तृत लोकसंग्रह करतांच आला नसता. निवृत्तीच्या वेळीं ५०–५५ संस्थांशीं त्यांचा जिव्हाळ्याचा संबंध होता. स्वतःच्या सामर्थ्यावर लक्षालक्षांचे निधी त्यांनीं हां हां म्हणतां जमविले. ही पुण्याई, हा लोकप्रेमाचा ठेवा त्यांना स्वतःच्या स्वभावगुणांवरच कमावितां आला यांत तिलमात्र संशय नाहीं.

केसरी संस्थेंत केळकरांची ४१ वर्षें नोकरी झाली. त्या अवधींत ते २५ वर्षें 'केसरी'चे व २० वर्षें 'मराठ्या'चे संपादक होते. येथें ही गोष्ट मुद्दाम नमूद

करण्यासारखी आहे कीं, वर्षानुवर्षें एकाच वेळीं दोन्ही भाषांत वृत्तपत्रें चालविण्याची बहादुरी केळकरांशिवाय महाराष्ट्रांत तरी आजवर कोणीहि करूं शकला नाहीं. ती पत्रें वर्षन् वर्ष, जबाबदारीनें व उत्कृष्टपणें चालविणें हे दिव्य होतें. आणि तें दिव्य केळकरच करूं शकले. हें केळकरांचें सामर्थ्य व त्यांचें इंग्रजी भाषेवरील प्रभुत्व ओळखूनच लो. टिळकांनीं त्यांना विलायतेस नेलें व तेथें 'इंडिया' पत्राचें संपादकत्व त्यांच्याकडेच दिलें. केळकरांचें हें वृत्तपत्रीय कर्तृत्व पाहून श्री. हॉर्निमन म्हणतात, "लो. टिळक व श्रीयुत केळकर यांच्यासारखे मोठे लोक हिंदु समाजांत निपजतात हें हिंदुस्थानचें भाग्य होय."

सहकाऱ्यांशीं व हाताखालील माणसांशीं प्रेमळपणानें आणि एकोप्यानें वागून संस्था नांवारूपाला कशी आणावी, नव्हे, ती आदर्शवत् कशी करून सोडावी हेंहि केळकरांनीं आपल्या ४१ वर्षांच्या दीर्घ सेवाकालांत उत्कृष्टपणें दाखविलें. महाराष्ट्रांत संस्था निघतात व कशाबशा टिकतातहि, पण त्या जोसावत नाहींत याचें खरें कारण वरचीं माणसें केळकरांसारखीं उदार, कर्मयोगी व प्रेमळ नसतात, तर तीं अहंमन्य, स्वार्थी नि गुणी जनांचा अपमान करणारीं असतात. कार्यापेक्षां स्वप्रतिष्ठेला जपणारीं असतात. त्या करंट्यांनीं 'गतगोष्टी'तून 'माझी ६१ व्या वर्षाची ज्युबिली' या प्रकरणांतून केसरी संस्थेतर्फे झालेल्या समारंभाची हकीकत अवश्य वाचून पाहावी. म्हणजे कर्तृत्व व नेतृत्व कसें असावें हें चांगलें समजेल.

या समारंभाच्या प्रसंगीं श्री. धोंडोपंत विद्वांस अध्यक्षस्थानीं होते. ते आपल्या भाषणांत म्हणाले, "आज केळकरांना मानपत्र अर्पण करणें म्हणजे एक प्रकारें डाव्या हातानें उजव्या हाताला मानपत्र देण्यासारखेंच आहे. तथापि या दोन्ही डाव्या-उजव्या हातांनीं टिळकांच्या हयातींत व त्यानंतरहि एकोप्यानें व गोडीनें सारखीं ३६ वर्षें एकत्र काम केलें. अनेक सुखदुःखांचे प्रसंग अनुभविले, खस्ता खाल्ल्या, निंदा व स्तुति हीं दोन्हीहि समान मानून व आपल्याला ही केसरी-संस्था टिकवावयाची आहे असें समजून नेटानें व निर्धारानें काम केलें." उत्तरादाखल भाषण करतांना केळकर म्हणाले...केसरी संस्थेंतील आपण माणसें म्हणजे व्यापक अर्थानें कुटुंबच आहोंत....टिळकांनीं १८९१ सालीं केसरी घेतला तो कर्जासह घेतला. त्या वेळीं केसरीला स्वतःचें ऑफिस अगर छापखाना...हीं कांहींच नव्हतीं.... १८९६ सालीं मी केसरीला येऊन मिळालों त्या वेळीं केसरी कर्जांतच होता.

अर्ध्या खणांत न पुसलेली; किंवा न रंधलेली तीन देवदारी खोकीं मांडून बाबांनीं कामाला सुरवात केली. ही केसरीच्या पहिल्या ऑफिसची स्थिति. १९०१ सालीं ताईमहाराजांचा खटला निघाला. त्या वेळीं तर टिळक कर्जांत बुडूनच गेले होते....१९१२ सालीं जामिनकी मागण्यांत आली तेव्हां बाबांनीं व मी स्वतःच्या विम्याच्या पॉलिसी गहाण टाकून त्यांच्या तारणावर पांच हजार रुपये भरण्याचें ठरविलें....चिरोल खटल्यानें तर टिळकांना तीन लक्ष रुपयांचें कर्ज झालें; व आम्हीं त्यांना पर्स देण्याची कल्पना काढून व खटपट करून लोकांकडून हे तीन लाख रुपये जमवून टिळकांना दिले नसते तर आज केसरी संस्था ही आकंठ कर्जांत बुडून राहती....१९२० सालीं टिळक वारल्यानंतर वर्गणीदारांची संख्या थोडी फार घटली; नाहीं असें नाहीं. तथापि २५ ते ३० हजारांचे दरम्यान आजहि केसरीचे अंक आम्ही काढतों. ...टिळकांनंतर १०-१२ वर्षांत आम्हीं केसरी संस्था टिकवली इतकेंच नव्हे, तर काटकसरीनें वागून व शिल्लक टाकून तीन लाख रुपयांचा ट्रस्ट परवां करून लोकांनीं चिरोल-केसकरितां 'कर्ज' म्हणून दिलेली रक्कम महाराष्ट्रास परत दिली...टिळकाना लोकांनीं तीन लाख रुपये दिले ते आम्हीं परत केले. अहंकारबुद्धीनें नव्हे तर उपकार स्मरून कृतज्ञताबुद्धीनें...मीं व बाबांनीं (विद्वांसांनीं) या संस्थेंत एकसारखें ३६ वर्षें काम केलें...बाबा खालच्या ऑफिसचे मालक व मी वरच्या ऑफिसचा मालक; तथापि उभ्या ३६ वर्षांत आमचें एकदांहि भांडण होण्याचा प्रसंग आला नाहीं हें मी अभिमानानें सांगतों...मनुष्य लहान झाला म्हणून त्यालाहि दर्जा असतो ही गोष्ट माझ्या सदैव ध्यानांत असते. आज ३६ वर्षांत एकाहि नोकराला मी एकदांहि अपशब्द बोललों नाहीं असें मी सांगूं शकतों....परद्रव्याच्या अपहाराच्या एका पैशाचाहि डाग या ३६ वर्षांत मला लागला नाही हें मी जाहीर रीतीनें सांगतों....केसरीनें प्रथम कर्जांत जीवन काढलें, पण पुढें स्वावलंबनानें व निस्पृहपणानें त्यानें आपलें जीवितकार्य कंठलें....निर्लोभी राहूनच त्यानें अनेक चांगल्या गोष्टी केल्या. जामिनक्या भराव्या लागल्या असतांहि किंवा आगीनें नुकसान झालें असतांहि त्यानें कोणापुढें देणगीसाठीं हात पसरला नाहीं. उलट आलेल्या देणग्या साभार परत केल्या. संस्थानिकांची बाजू घेऊन सरकारशीं लढत असूनहि त्यानें एकाहि दरबारकडून पैचीहि अपेक्षा केली नाहीं. तर उलट सार्वजनिक कार्याला वेळोवेळीं ५०-६० हजारांच्या

देणग्या दिल्या....संस्थेसाठीं आम्ही सुंदर इमारती बांधू शकलों. याशिवाय यंत्रखरेदी, अतिथिगृह, ग्रंथालय, नोकरांचे पगार, त्यांची पगारवाढ, प्रॉव्हिडंडफंड, रजेचे नियम इत्यादि गोष्टी करून आम्हीं नोकरवर्गाचें समाधान राखिलें असा विश्वास वाटतो.—सारांश, 'जोडूनिया धन उत्तम व्यवहारें। उदार विचारें वेंच करी' ही तुकोबाची उक्ति खरी करण्याचा केसरीनें अव्याहत प्रयत्न केला....

मंगळवार उजाडला व केसरी वेळच्या वेळीं निघाला नाहीं असा प्रसंग गेल्या ५० वर्षांत एकदांहि आला नाहीं.... वरच्या वर्गानें खालच्या मंडळींशीं स्नेह ठेविला व सर्वांनीं संस्थेचा अभिमान धरला तरच संस्था टिकेल." केळकरांच्या विस्तृत भाषणांतून महत्त्वाचींच वाक्यें तेवढीं येथें दिलीं आहेत. त्यावरून त्यांचा सुस्वभाव, त्यांची कार्यनिष्ठा, त्यांची चिकाटी व त्यांचें संस्थाचालक या नात्याचें कर्तृत्व हे सर्व गुण दिसून येतील.

त्यांच्या गुरुभक्तीचाहि मुद्दाम उल्लेख करावयास पाहिजे. गुरूचें मोठें नांव नुसतें सांगत फिरावें किंवा त्याच्या मृत्यूनंतर अघळपघळ शोक करावा म्हणजे आपली गुरुभक्ति खरी, असली नादान कल्पना त्यांची कधींच नव्हती तर गुरूचें कार्य पुढें चालविणें व त्याच्या शिकवणीला, त्याच्या तत्त्वज्ञानाला अमरपद मिळवून देणें म्हणजे खरी गुरुभक्ति होय असें त्यांचें मत त्यानीं कृतींनीं सिद्ध केलें आहे. निंदा, अपमान, केसरी बंद करण्याच्या चळवळी, गांधीवाद व सरकारी आघात या सर्वांतून केसरी संस्थेची नौका त्यांनीं कौशल्यानें व यशस्वीपणानें बाहेर काढली. अन् ती समृद्ध व सामर्थ्यसंपन्न करून बाहेर काढली. लो. टिळकांचे सर्व लेख छापून काढले. त्यांचें हजारों पानांचें प्रचंड चरित्र लिहून काढलें. टिळक-स्मारक-मंदिर उभारलें व पुण्यनगरीला टिळकपुतळ्यानें शोभा आणिली. पण त्यांचें सर्वांत मोठें कार्य म्हणजे गुरूला ऋणमुक्त करणें हें होय. कायदेशीर कांहीं एक जबाबदारी नसतांना केवळ नैतिक दृष्ट्या, गुरूंनीं कष्टानें स्वीकारलेला पण महाराष्ट्रानें प्रेमानें अर्पिलेला निधी, 'कर्ज' समजून तो परत करणें व त्यांतहि गुरूचें तत्त्वज्ञान टिकावें व टिळकशिकवण अखंड दिली जावी या पद्धतीनें तो विश्वस्तांच्या स्वाधीन करणें या सर्वच गोष्टी गुरुभक्तीच्या व अलोट कर्तव्यनिष्ठेच्याच निदर्शक नव्हेत काय? देणारांनीं कर्ज म्हणून दिली नसतांनाहि तीन लक्षांची रक्कम कर्ज मानावयाची व

ती फेडून गुरूंच्या आत्म्याला समाधान द्यावयाचें ही रीत अपूर्व तर खरीच, पण वृत्तपत्रांच्या इतिहासांतहि एकमेवच ठरेल असें वाटतें.

१९३१ च्या ३ जानेवारीला केसरीला ५० वर्षें पुरीं होत होतीं. त्या निमित्तानें केळकरांनीं १०८ पानांचा ज्युबिली-अंक काढून 'केसरीच्या हल्लींच्या सेवकांनीं कृतज्ञताबुद्धीनें खांद्यावरून पूर्वीच्या सेवकांना वाहण्याची पालखी' असें त्याला संबोधिलें. तो अंक इतका चित्ताकर्षक नि उपयुक्त ठरला कीं, त्याच्या ३५००० प्रतीहि अपुऱ्या पडल्या. केसरीच्या चाहत्यांनींहि, केसरीनें वाचकांकरितां पन्नास वर्षांत जें केलें त्याची परत भेट म्हणून 'केसरीप्रबोध' नांवाचा ८५० पानांचा ग्रंथ तयार करून तो विश्वस्तांना मोठ्या समारंभानें अर्पण केला. याच निमित्तानें मुंबईसहि मोठी सभा होऊन तींत 'केसरी'च्या गुणवर्णनपर अशीं डॉ. देशमुख, जमनादास मेहता, हॉर्निमन, मुनशी, काणे व खेर प्रभृतींचीं भाषणें झालीं.

पुढच्याच वर्षीं म्हणजे १९३२ सालीं ऑगस्टच्या २४ तारखेला केळकरांना ६१ वें वर्ष लागलें. या त्यांच्या ६१ व्या वर्षाची 'ज्युबिली' महाराष्ट्रानें, कायदेभंगाची चळवळ जोरांत चालू असतांहि, मोठ्या उत्सवानें साजरी केली. बृहन्महाराष्ट्रांत अनेक ठिकाणीं अनेक संस्थामार्फत केळकर यांचा जाहीर सत्कार करण्यांत आला. त्यांना ठिकठिकाणीं मानपत्रें व अहेरहि अर्पण करण्यांत आले. पण केळकर-वाढदिवस-मंडळातर्फे साजरा झालेला समारंभ पुण्याच्या इतिहासांत अजरामर ठरेल. मंडळानें या उत्सवासाठीं 'केळकर-ग्रंथ' तयार करविला. त्याची अद्‌भुतता अशी कीं, तो ७५० पानांचा ग्रंथ प्रसिद्धीपूर्वीच खलास झाला. तीन आवृत्त्या मिळून ५००० प्रती पंधरा दिवसांत खपणें हें अपूर्व भाग्य या ग्रंथाला म्हणजेच पर्यायानें केळकरांना लाभलें!

२४ ऑगस्ट रोजीं, टिळक-स्मारक-मंदिराच्या विस्तीर्ण पटांगणावर उभारलेल्या भव्य मंडपांत, लोकनायक अणे यांच्या अध्यक्षतेखालीं हा ग्रंथसमर्पण करण्याचा नि अभिनंदनाचा समारंभ मोठ्या उत्साहानें व थाटानें साजरा करण्यांत आला. समारंभास बृहन्महाराष्ट्रांतील प्रतिनिधी हजर होते. सर्व जातींच्या व पक्षांच्या सुसंस्कृत नि निवडक अशा ५००० लोकांचें तें एक अपूर्व असें संमेलनच होतें. हिंदुस्थानच्या कानाकोपऱ्यांतून ५०० च्या वर शुभ संदेश आले होते.

स्वागताध्यक्ष श्री. अण्णासाहेब भोपटकर आपल्या भाषणांत म्हणाले—"गेल्या शंभर वर्षांत बृहन्महाराष्ट्रांत जे दहा-पांच थोर पुरुष निर्माण झाले, त्यांमध्यें तात्यासाहेबांची गणना कोणालाहि करावी लागेल. इतकी सरस व बहुमोल सेवा त्यांनीं आपल्या राष्ट्राची, समाजाची, धर्माची व वाङ्मयाची केलेली आहे."

अध्यक्ष बापूजी अणे म्हणाले—"केळकरांनीं 'केसरी'ची इभ्रत व इज्जत वाढवून लो. टिळकांचें वैशिष्ट्य राखलें असें म्हणण्यास कांहींच प्रत्यवाय नाहीं......त्यांना साहित्याचार्य व राष्ट्रपुरोहित म्हटल्यास वावगें होणार नाहीं."

आभार-प्रदर्शनानंतर पुण्यांतील व पुण्याबाहेरील जवळजवळ १०० संस्थांतर्फें त्यांना अहेर व पुष्पहार अर्पण करण्यांत आले. अशाच पद्धतीचा अभिनंदनाचा समारंभ मुंबईसहि साजरा झाला.

सारांश ६१ व्या वाढदिवसाच्या निमित्तानें या विद्वान, व्यासंगी, प्रतिभासंपन्न, समतोल, त्यागी, निर्भय व निष्कलंक चारित्र्याच्या राष्ट्रभक्त संपादकाला नव्हे **संपादकांच्या राजाला** उभ्या महाराष्ट्रानें आपला करभार वाहून मानाचा मुजरा केला! मुजरा घेणारा जसा गुणी तसाच तो करणाराहि गुणीच म्हटला पाहिजे.

---

## प्रकरण ७ वें

# धुरंधर मुत्सद्दी

**"केळकर म्हणजे मानवी बुद्धीचा एक सर्वसंग्रहच होत...... राजकीय विषयांवरील लेखांबद्दल तर विचारावयासच नको. ते राजकीय लेखनाचे व्यासमुनि आहेत."**

—डॉ. मुकुंदराव जयकर

परतंत्र राष्ट्राचें राजकारण चालविणें ही मुत्सद्दयाची सगळ्यात मोठी कसोटी मानली पाहिजे. कारण...कारण उघडच आहे. परतंत्र राष्ट्र म्हणजे एक वठलेला वृक्षच. त्याच्या मुळ्या जीवनरसाच्या अभावी निर्जीव होतात. नुसतें

उभें राहणेंहि त्याला कठीण होतें. त्याचीं पानें झडून जातात, साली गळून जातात. मग अशा वृक्षाला फुलें नि फळें कुठलीं येणार ? अशा वठलेल्या राष्ट्राचें राजकारण करणें व वाळवंटें पेरीत सुटणें यांत कांहींच अंतर नाहीं. आणि तरीहि कांहीं महात्मे, कांहीं पुण्यात्मे हेंहि करण्यासाठीं पुढें सरसावतात. युगप्रवर्तक चिपळूणकर, लोकमान्य टिळक हे अशा पुण्यवंतांपैकींच होत. यांनीं सरकारची खरी ओळख भारताला पटवून दिली. इंग्रज देवदूत नाहींत तर ते स्वार्थ साधण्यासाठीं आलेले केवळ परकी लोक आहेत हें आम्हां लोकांना एके काळीं शिकवावें लागलें. आपण भोळा भाव सोडावा, शहाणे व्हावें, सरकारशी झगडण्यास उठावें, सरकारशीं दरडावूनहि बोलावें असें पुढारीपण करायला केसरीनेंच देशाला शिकविलें. हिंदी राजकारणाला नवीन दृष्टि, नवीन ध्येय व तें साधण्यासाठीं नवीन साधनें हीं देण्याची खडतर कामगिरी चालू असतांना केळकर टिळकांना येऊन मिळाले. अनेक नवीन नवीन चळवळी टिळकांनीं सुरू कराव्यात व केळकरांनीं त्या केसरीच्या साहाय्यानें रुजवाव्यात; म्हणजेच टिळकांनीं पेरावें व केळकरांनीं जोपासावें, वाढवावें, प्रसृत करावें असें चाललें होतें. लोकमान्यांच्या हयातींत टिळक-तत्त्वज्ञान खोलवर रुजविण्याची कामगिरी तर केळकरांनीं केलीच केली, पण लोकमान्यांच्या मृत्यूनंतर तर त्यांच्यावर दुहेरी जबाबदारी पडली. तें टिळकतत्त्व, ती प्रतियोगी सहकारिता, तो लोकसंग्रही बाणा हें सर्व टिकवून धरण्याचें व वाढविण्याचें कार्य त्यांच्या शिरावर पडलें. त्यांनींहि तें धुरंधर राजकारणाला शोभेल अशा लीलेनें कसें पेललें याचा थोडक्यांत इतिहास या प्रकरणांत पाहूं या.

'स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे' हा लोकमान्यांचा महामंत्र आणि 'तो मी मिळवीनच' हा त्यांचा निर्धार केळकरांना आपल्या निद्रित असलेल्या देशबांधवांना शिकवावयाचा होता. पण राजकीय दृष्ट्या मनचेतवणी करायला कांहीं एका खंबीर तत्त्वज्ञानाची बैठक चळवळीच्या मागें असावी लागते. टिळकपक्षाच्या व परंपरेच्या मागें ही तत्त्वज्ञानाची भरभक्कम बैठक आहे. ती फार पुरातन आहे. राम, कृष्ण व शिवाजी यांनीं पावन केलेली आहे व सामान्य जनांना समजणारी म्हणजे त्यांच्या बुद्धीच्या आवांक्यांतील आहे. गेलें आहे काय, मिळवावयाचें काय, तें मिळविण्याचे आजपर्यंतचे जगन्मान्य मार्ग कोणते व त्या मार्गांचा अवलंब कसा युक्तिप्रयुक्तीनें करावयाचा या सर्व गोष्टी टिळकपक्षाच्या कशा अगदीं निश्चित नि ठाम झालेल्या

आहेत. त्यांत भोळेपणा नाहीं, एखाद्या माणसाची लहर नाहीं, तर दूरदृष्टि आहे, इतिहासाच्या, अनुभवाच्या ज्ञानाची भरभक्कम साथ आहे आणि म्हणूनच त्या गोष्टी हटकून यशस्वी होणाऱ्या आहेत.

आपला देश जगदुद्धारक होण्याच्या योग्यतेचा आहे. आजच्या पारतंत्र्याची काजळी त्याचें मूळ तेज लोपूं शकणार नाहीं. ती काजळी आपण झाडली पाहिजे. त्यासाठीं अव्याहत परिश्रम केले पाहिजेत, आणि ते परिश्रम निष्काम-बुद्धीनें केले पाहिजेत. सरकारी रोष, देशबांधवांची उदासीनता व प्रसंगीं त्यांनीं केलेला विरोध या सर्वांना पचवून देह पडेपर्यंत अखंड लढा केला पाहिजे अशी या टिळकपीठाची शिकवण आहे. याच कंदांतून व्यावहारिक शिकवणुकीचे पुढे सांगितल्याप्रमाणें कांहीं अंकुर निर्माण झाले आहेत.

'रणावीण स्वातंत्र्य नाहीं' हा ठाम सिद्धांत. त्याची तयारी क्षणांत, दिवसांत किंवा वर्षांत होत नसते. पिढयान्‌पिढ्या खर्चीं घालाव्यात तेव्हां मनाची तयारी होते. मनें तयार झाल्यावर इतर गोष्टी खरोखरच किरकोळ आहेत. म्हणून मनें तयार करण्याची प्रचंड कामगिरी टिळकांनीं विविध अंगांनीं सुरू केली. जन्मभर ती चालविली नि 'हिंदी असंतोषाचे जनक' ही महनीय पदवी वैऱ्याकडून मिळविली! लोकमान्य उभा जन्म लढले नि लढतां लढतां मरून गेले! त्यांच्यामागें त्यांच्या कार्याची पताका केळकरांनीं उचलून धरिली. त्यांनीं 'केसरी' व 'मराठा' हातीं घेऊन लोकशिक्षणाचें टिळककार्य पुढें चालविलें. व्यवहार नि ध्येयवाद यांची सांगड घालून प्रति-योगी सहकारितेच्या तत्त्वाला अग्रस्थान दिलें. परिस्थितीप्रमाणें सह-कारिता किंवा अडवणूक हा प्रतियोगी सहकारितेचा अर्थ असल्यामुळें सर्व शक्तिकेंद्रें काबीज करणें व त्यांच्या साहाय्यानें आपण स्वराज्याची तयारी करणें ही शिकवण त्यांनीं चालू ठेविली. कोणत्याहि एकाच मार्गानें कार्यसिद्धि होणार नाहीं तर सर्व क्षेत्रातून, सर्वांगांनीं उठावणी करणें भाग असतें म्हणून अनेकांगी शिक्षण द्यावयास त्यांनीं सुरवात केली. 'साध-नानाम् अनेकता' या धोरणाला अनुसरून सर्व साधनांचा समावेश करणारी व्यापक शिकवण या पक्षाची असल्यामुळें हिंसा, अहिंसा, शक्ति, युक्ति, सत्य, असत्य इत्यादींच्या चक्रव्यूहांत हा पक्ष कधींच भांबावून गेला नाहीं. तर व्यवहारी राजकारणाचें अचूक होकायंत्र या पक्षानें हातीं राखल्यामुळें पाप्यांची हिंसा ही अहिंसाच होय व देशाकरितां कार्य करीत असतांना तें कार्य पुढें रेटण्या-

साठीं एखादे वेळेस असत्य वर्तन करावें लागलें तरी तें राजकीय सत्यच होय अशी निश्चयी वृत्ति याची स्थिर आहे. सुरतेची लूट, अफझलखानाचा वध, सिद्दी जोहाराला बोलतां बोलतां चकवणें व आग्र्याहून फसवून पळून येणें हीं या पक्ष्यानें कधींहि पापें मानिलीं नाहींत तर तीं बहादुरीचीं, शौर्याचीं व मुत्सद्दीपणाचीं पुण्यकृत्येंच मानिलीं ! प्रश्न पापपुण्याचा नाहीं; काळवेळाचा व देशहिताचा आहे कीं नाहीं एवढेंच मुख्य धोरण हा पक्ष पाळतो. या तत्त्वाप्रमाणें स्थानिक स्वराज्यसंस्था, कायदेमंडळें व मंत्रिमंडळें काबीज करणें, लष्करांतून घुसणें, सरकारी कमिट्यांतून काम करणें, व्यापारांत पडणें, आरमारांत व हवाईदलांत जाणें, देतील तें घ्यायचें व तें पचवून अधिकासाठीं भांडायचें; सहकार्यानें हित साधणार असेल तर सहकार्य करायचें, नाहीं तर विरोधाशिवाय अन्य मार्ग नसेल तर मात्र कडवट, वैऱ्याच्या मर्मीं घाव बसेल असा प्रतिकार करावयाचा, जनतेंत जशी जागृति, संघटण व प्रतिकारसामर्थ्य वाढवावयाचें तसें सरकारी यंत्रांतहि मोक्याच्या जागा धरून लोक बसवावयाचे असें अंतर्बाह्य चळवळीचें सूत्र यानें पाळलें आहे. या सूत्राच्या जोडीला परदेशीं प्रचार करणें, यंत्रविद्या हस्तगत करणें, मुसलमानांना अल्पसंख्याकांचे न्याय्य हक्कच तेवढे देणें, अस्पृश्यता घालविणें व हिंदुत्वाचा अभिमान बाळगणें याहि गोष्टी ध्यानीं धरल्या म्हणजे टिळकपक्षाचें राजकारण, त्याचें धोरण नि त्या पक्षाचा सावधपणा हीं कोणाच्याहि लक्षांत येतील.

लो. टिळकांनीं १९२० पर्यंत आपल्या खडतर तपस्येनें हिंदी राजकारणाला हें भरभक्कम स्वरूप प्राप्त करून दिलें. पण त्यांच्या मृत्यूनंतर या राजकीय पीठाचा वारसा केळकरांच्याकडे येतो न येतो तोंच हें टिळकतत्त्वाचें राजकीय तारूं गांधीजींनीं सुरू केलेल्या असहकारितेच्या प्रचंड वावटळींत सांपडलें ! त्या भव्य, विस्तृत नि चित्ताकर्षक पण अव्यवहार्य चळवळीनें देश अगदीं भारून गेला. एक वर्षांत स्वराज्य, खादीनें स्वराज्य, शाळा–कॉलेजें–कायदेमंडळें यांवर बहिष्कार, कोर्टांवर व वकिलीवर बहिष्कार, सरकारशीं संपूर्ण असहकार इत्यादि घोषणांनीं देश दणाणून गेला ! याविरुद्ध जो वागेल तो देशद्रोही असा पुकारा सर्वत्र होत असतांना व सहकारी भराभर दिपून व वाहवून जात असतांना " हें अशक्य आहे. एक वर्षांत स्वराज्य शक्य नाहीं, आणि तें सत्य, अहिंसा, खादी व असहकारिता यांच्या साहाय्यानें तर नाहींच

नाहीं." असा एकमेव विरोधी आवाज एकट्या महाराष्ट्रांतून, 'केसरी'तून व केळकरांच्या मुखानें प्रथम बाहेर पडला !

पण केळकर म्हणजे नुसते बोलके पुढारी कधींच नव्हते. त्यांना नुसता विरोधासाठीं विरोध करावयाचा नव्हता. तत्त्वासाठीं, सत्यप्रस्थापनेसाठीं त्यांचें झगडणें होतें. म. गांधी यांच्यावर व्यक्तिगत टीका न करतां त्यांच्या राजकीय तत्त्वप्रणालीचे मात्र त्यांनीं निर्दयपणें वाभाडे काढले! बुद्धिवादाची कास धरून सरसर कापीत जाणाऱ्या तीक्ष्ण युक्तिवादानें त्यांनीं गांधींच्या उक्तींतील व कृतींतील आभास आणि निरर्थकता पुरेपूर सिद्ध केली. गांधी-वादांतील अव्यवहार्य तत्त्वांना जरी त्यांचा विरोध होता तरी त्यांतील कांहीं योग्य गोष्टींना त्यांनीं नेहमीं पाठिंबा दिलेला असून सरकार–विरोधी लढ्याच्या प्रसंगीं त्यांनीं कॉंग्रेसच्याच बाजूनें सरकारशीं टकरा दिलेल्या आहेत. त्यांनीं कायदेभंग केला तो केवळ शिस्तीखातर. कॅांग्रेसमध्यें राहून, सामोपचारानें, जगापुढें दुहीचें प्रदर्शन टाळून, युक्तिवादानें व बुद्धिवादानें कॅांग्रेसमध्यें आपल्याला अनुकूल असें बहुमत तयार करतां आल्यास पाहावें यासाठीं त्यांनीं मनःपूर्वक प्रयत्न केले. गांधीजींनाहि या टिळकपक्षाचें फार महत्त्व वाटे. ते म्हणत, "वः महाराष्ट्र म्हणजे काय गोष्ट आहे! सगळ्या हिंदुस्थानचा पुढारी तो. उगीच का टिळकांनीं इतकी तपश्चर्या केली आणि पुण्याई संपादिली! महाराष्ट्र माझ्या बाजूला येण्याचाच अवकाश कीं मी असहकारितेची चळवळ यशस्वी केली म्हणून समजा." केळकरांना लिहिलेल्या कांहीं पत्रांतून त्यांनीं म्हटलें आहे कीं, "हल्लींच्या युद्धांत तुम्ही व तुमच्या पक्षांनीं अंतःकरण-पूर्वक उडी घ्यावी असें मला फार फार वाटतें. तुमच्या संदेशाला मी सर्वांत अधिक किंमत देतों. मी केलेल्या ठरावाचा मसुदा तुमच्या विचाराकरितां पाठवीत आहें. दुःख सोसण्यांत तुमच्या पक्षापुढें दुसरा कोणी मजल मारील असें मला वाटत नाहीं. मला केसरीची एक प्रत नियमित पाठवीत जावी." यावरून आरंभीं आरंभीं गांधीजींनीं महाराष्ट्रपक्षाला नि केळकरांना चुच-कारण्याचा व वश करण्याचा फार प्रयत्न केला असें दिसून येईल. त्यांनीं केळकरांना महाराष्ट्रातर्फें वर्किंग कमिटीवर घेतलें. पण गांधीजींचा आग्रह असा कीं, "बौद्धिक खात्री पटून, महाराष्ट्र मला मनःपूर्वक पाठिंबा देऊन माझे बाजूस येईल, तर तो मला हवा आहे. कॅांग्रेसची आज्ञा ती मँडेट मानली गेल्यामुळें तुम्ही औपचारिक रीतीनें तिचे ठराव अमलांत आणण्यास तयार होता,

पण हें मला नको आहे. महाराष्ट्रपक्षाची जर मला बौद्धिक खात्री पटवून देतां येत नसेल तर तुमचे व माझे प्रतिपक्षी या नात्यानें उघड उघड दोन हात झालेले चांगले ! महाराष्ट्रपक्षाच्या उत्कट देशाभिमानाबद्दल मला पूर्ण खात्री आहे."

यानंतर कॉंग्रेसमध्यें अर्थातच पक्ष पडले. शक्य तों कॉंग्रेसमध्येंच राहून मतांतर घडवून आणण्याचा केळकरांचा निर्धार असल्यामुळें त्यांनीं व दे. बं. दास, पं. मोतिलालजी नेहरू, अध्यक्ष विठ्ठलभाई पटेल, डॉ. जयकर इत्यादींनीं स्वराज्यपक्ष काढला व त्यामार्फत १९२३ सालीं कायदेमंडळाच्या निवडणुका लढवून त्या जिंकून दाखविल्या. त्या निवडणुकींत मध्य-विभागांतील सात जिल्ह्यांत केळकर हे सहा उमेदवारांत पहिले आले, एवढेंच नव्हे तर त्यांच्या नि त्यांच्या खालच्या उमेदवारांच्या मतांत ७८०९ मतांचें अंतर पडलें! या स्वराज्यपक्षांतील लोकांवर नाफेरवाले जेव्हां अद्वातद्वा तोंडसुख घेऊं लागले तेव्हां गांधीजींनींच परस्पर त्यांना बजावलें कीं, "कौन्सिलांत गेलेले लोक राष्ट्राच्या बुद्धीचे निवडक नमुनेच आहेत असें अखेर म्हणावेंच लागतें. ते कसलेले योद्धे आहेत. पंडित मालवीय व नेहरू, तसेंच दास व केळकर, यांचा स्वार्थ-त्याग स्वयंप्रकाशी आहे हें कोण नाकबूल करील ? मतभेद हे जगाच्या अखेरी-पर्यंत चालतच राहतील. स्वराज्यपक्षाच्या लोकांना चरख्याच्या बाजूस वळवतां आलें म्हणजेच नाफेरवाल्यांचा खरा जय झाला असें म्हणतां येईल. लोक चरख्याच्या पक्षाला मिळत नसतील तर त्याचें कारण इतकेंच कीं, लोकांना त्याची उपयुक्तता पटलेली नाहीं. ती दाखविली पाहिजे."

स्वराज्यपक्ष काढून कॉंग्रेसला कौन्सिलवादी तर बनविलें. पण त्यापुढील तर्कशुद्ध पायरी म्हणजे मंत्रिमंडळें तयार करून मंत्रिपदें स्वीकारणें ही होय. त्यासाठीं पुनः कॉंग्रेसनें खळखळ चालविली. तेव्हां केळकर-जयकरांनीं कॉंग्रेस-विरुद्ध या तत्त्वसिद्धीसाठीं पुनः बंडाचें निशाण उभारलें! शाळा, कॉलेजें, कोर्टे इत्यादींवरील बहिष्कार तर केव्हांच बारगळले. कौंसिलेंहि मान्य झालीं, पण त्यांच्या गाभाऱ्यांत जाण्यास मात्र बंदी ! देऊळ बांधायचें ठरलें, शिख-रहि बांधलें, पण त्यावर कळस न चढवितां तें भुंडेंच ठेवण्याविषयीं विचित्र लहर लागली ! त्यासाठीं या महाराष्ट्रीय पुढाऱ्यांनीं प्रतिसहकारपक्ष काढिला. त्यातर्फे उभे राहिले व कॉंग्रेसविरोधाला न जुमानतां आपल्या पुण्याईनें

निवडून आले. १९२६ सालीं झालेल्या या निवडणुकींत केळकर पुनः पहिल्या क्रमांकालाच निवडले गेले.

केळकर जरी काँग्रेसमधील बंडखोर होते तरी ते टाकाऊ ठरले नव्हते. याचें प्रत्यंतर म्हणजे १९२५ सालीं काँग्रेसच्या अध्यक्षपदासाठीं झालेल्या निवडणुकींत त्यांना दुसऱ्या नंबरचीं मतें मिळालीं. पहिल्या नंबरचीं मतें सौ. सरोजिनीबाई नायडूंना मिळालीं. याचें कारण त्यांच्यासाठीं नेहरूप्रभृतींनीं व गांधींच्या अनुयायांनीं विशेष खटपट केली!

१९२८ सालीं कौन्सिलप्रवेश निर्वेध झाल्यानें स्वराज्यपक्षानें 'नेहरू–घटना' या नांवाची एक स्वराज्ययोजना तयार केली व तिचा देशभर प्रचार चालविला. पण बापाची ही योजना पुत्रानें १९२९ सालच्या राष्ट्रीय सभेंत नामंजूर केली व संपूर्ण स्वातंत्र्य उद्घोषिलें. १९३० सालीं गोलमेज परिषदेचें निमंत्रण झिडकारून, कौन्सिलप्रवेश रद्द ठरवून राष्ट्रीय सभेनें कायदेभंग पुकारला!

या कायदेभंगाच्या चळवळींत केळकरांनींहि भाग घेतला. त्यासंबंधीं श्री. अण्णासाहेब भोपटकर लिहितात कीं, "तात्यासाहेबांनीं पेण येथें अतिशय मोठ्या प्रमाणावर मिठाचा सत्याग्रह केला; एवढेंच नव्हे तर त्यापुढें अनेक ठिकाणीं अनेक प्रकारचे सत्याग्रह केले. तरी त्यांच्यावर खटला करण्यांत आला नाहीं, हा कांहीं त्यांचा दोष नव्हे. परंतु तात्यासाहेबांवर खटला करण्यांत आला नाहीं हें एकार्थी बरेंच झालें. नाहीं तर मराठी प्रांतांतून जंगल-सत्याग्रहाला जो एवढा जोर चढला कीं, ज्यामुळें सर्व प्रांतांच्या अगोदर महाराष्ट्रांतील राजकीय संस्था बेकायदेशीर ठरविणें सरकारला भाग पडलें, तो खात्रीनें चढला नसता. अंदरकी बात ही होती. ती सर्वांना माहीत नाहीं, याला तात्यासाहेब काय किंवा दुसरा तरी काय करणार?" अर्थात् आपलीं मतें कायम असूनहि त्यांनीं केवळ कर्तव्य म्हणूनच या गोष्टी केल्या. सरकारशीं लढतांना ते सदैव काँग्रेसच्या बाजूनेंच उभे असत हें ध्यानांत ठेवण्यासारखें आहे.

१९३० च्या या मोहिमेंतून गांधी–आर्विन तह निर्माण होऊन गांधीजी १९३१ सालीं गोलमेजपरिषदेस गेले. तेथें कांहींच निष्पन्न न झाल्याकारणानें गांधींनीं १९३२ सालीं परतल्याबरोबर कायदेभंगाची दुसरी मोहीम सुरू केली. याहि मोहिमेंत केळकरपक्ष सामील झाला, पण त्यांनीं आपला कौन्सिल-प्रवेशाचा हक्क मात्र सोडला नाहीं. या चळवळींत गांधीजींना हें दिसून आलें

की, जनता आपल्या तीक्ष्ण ध्येयाच्या कसोटीला उतरणारी नाहीं. म्हणून १९३३-३४ सालीं त्यांनीं 'आंतल्या आवाजाच्या' सल्ल्याप्रमाणें "शुद्ध प्रतिसहकारितेचा अवलंब करून लोकांना विधायक राजकारणाच्या मार्गावर" घालण्याचें ठरविलें व १९३५ सालीं कौन्सिलप्रवेशाला पुनः परवानगी दिली! जनता व त्यांतल्या त्यांत नाफेरवाले हे या कौन्सिलप्रवेशासाठीं आतुरच होते. गांधीजींच्या या पडत्या फळाची आज्ञा मान्य करून काँग्रेसनें निवडणुकी लढविल्या व त्या जिंकून प्रांताप्रांतांतून प्रधानमंडळेंहि स्थापन केलीं! (१९३७)

या स्थित्यंतराला अनुलक्षून केळकर गतगोष्टींत म्हणतात कीं, "हें घडून येत असतां स्वातंत्र्यप्रेम, साम्राज्यविरोध, स्वयंनिर्णय, घटनाभंग इत्यादि मोठमोठ्या तत्त्वांची आठवण राष्ट्रीय सभेला क्षणभर बाजूला ठेवावी लागली. दक्षिणेचा सूर्य उत्तरेला जावा त्याप्रमाणें घडून राजकीय धोरणाचें ऋतुमान बदललें. पूर्वीं ज्यांना कौन्सिल हा नरक वाटत होता त्यांनाच तो आतां मोक्ष किंवा निदान स्वर्गलोक तरी वाटूं लागला! ज्यांना कौन्सिलें हीं मायागृहें वाटत होतीं त्यांनाच तीं आतां त्रिवार सत्यसृष्टि वाटूं लागलीं! कौन्सिलाचें स्मशान-चितेचें स्वरूप जाऊन त्याला मंगलदायक होमकुंडाचें स्वरूप आलें! सर्व प्रकारचा अविधि हा विधि ठरला! असूक्त सूक्त ठरलें! अधोगति ही उन्नति वाटूं लागली! आणि संन्याशाचा कर्मयोगी बनला!"

अशा रीतीनें राष्ट्रीय सभेनें स्वतःच प्रतिसहकारवादी बनून अधिकारग्रहणहि केलें व असहकारिता ही कबुलीनें व कृतीनेंहि संपविली! केळकर आनंदानें लिहितात, "विचारी विवेकशील मनुष्याला राजकारणांत आपलें धोरण यशस्वी ठरणें हा लौकिक-ऐहिक मोक्षच होय; व त्याचा आनंद महात्माजींनींच महाराष्ट्राला अखेर मिळवून दिला हा केवढा योगायोग म्हणावयाचा." १९३७ च्या एप्रिलांत ज्या दिवशीं काँग्रेसचा कौन्सिलप्रवेश व मंत्रिमंडळप्रवेश सिद्ध झाला म्हणजेच जेव्हां केळकरांना राजकीय मोक्षसाधन लाभलें, तेव्हांच अगदीं त्याच दिवशीं कार्यनिवृत्तीला सुमुहूर्त समजून त्यांनीं केसरीसंस्थेकडील नोकरी कायमची सोडल्याचें जाहीर केलें!

गांधीवादाशीं सोळा वर्षे झगडतांना त्यांनीं लोकमतापेक्षां लोकहिताकडे अधिक लक्ष पुरवून अत्यंत निर्भयपणा दाखविला. सरकारशीं भांडतांनाहि

त्यांनीं अशीच निर्भयता दाखविली. सरकारशीं करावयाच्या राजकारणासंबंधींची त्याची दृष्टि किती दूरगामी, सडेतोड नि बेडर आहे हें त्यांच्या पुढील उताऱ्यावरून चांगलें ध्यानांत येण्यासारखें आहे. ते लिहितात, "इंग्रजांचें हिंदुस्थानावरील राज्य लष्करी सत्तेच्या जोरावर चाललें आहे. लष्करी सामर्थ्य हा इंग्रजी राजसत्तेचा पाया आहे. या पायावर आघात झाल्याशिवाय या सत्तेला धक्का लागावयाचा नाहीं. आणि असा आघात करण्यास राज्य-क्रांतीशिवाय दुसरा उपाय नाहीं. ही सरळ आणि साधी गोष्ट कोणत्याहि व्यावहारिक विचारसरणीच्या मनुष्यास पटणारी आहे. ती सिद्ध करण्यास मोठमोठे इतिहासाचे आधार उद्धृत करण्याची कांहीं जरूरी नाहीं. सर्व नद्या ज्याप्रमाणें अखेर समुद्रास मिळतात, त्याप्रमाणें परतंत्र देशांत सर्व प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष राजकीय चळवळींचें पर्यवसान अखेर या राज्यक्रांतींत व्हावयाचें असतें. मग ती राज्यक्रांति अत्याचारी असो वा अनत्याचारी असो; ती आज होवो वा कालांतरानें होवो...ज्या जातीचे, धर्माचे व संस्कृतीचे लोक त्याच जातीचा, धर्माचा व संस्कृतीचा राजा अशी परिस्थिति असतांना देखील लोकांना अत्याचारी राज्यक्रांतीनें आपल्या हातीं सत्ता घ्यावी लागली आहे. मग हिंदुस्थानांत जेथें जातीनें, धर्मानें व संस्कृतीनें सर्वस्वीं भिन्न असे राज्यकर्ते आहेत, तेथें ते राज्यकर्ते राज्यक्रांतीशिवाय सुखासुखी राज्य हातचें सोडतील हें असंभवनीय आहे."

किती स्पष्ट, व्यवहार्य नि सुबोध विचारसरणी ही! यांत ना अध्यात्म ना गूढगुंजन! अशीच रोखठोख वृत्ति क्रांतिकारकांच्याहि बाबतींत त्यांनीं दाखविली आहे. ते 'गतगोष्टींत' लिहितात, "यःकश्चित् किड्यावर पाऊल पडलें तर तोहि उलटून चावतो म्हणतात. त्याप्रमाणें हिंदी प्रजेंतील निरनिराळ्या वर्गांत जे तेजस्वी, स्वार्थत्यागी व धैर्यशील लोक होते, त्यांनीं निर्वाणपदावर उभें राहून आपला राष्ट्रीय स्वाभिमान जगाला दाखविला, एवढी तरी गोष्ट कोणासहि नाकबूल करतां येणार नाहीं....अशी चळवळ करणाराविषयीं मीं केव्हांहि अनादर दर्शविला नाहीं. इतर कार्यांत त्यांच्याशीं संबंध, सहवास, सहकारिता उपस्थित झाली तर ती टाळली नाहीं. उलट त्यांच्याशीं स्नेह-भावानें वागलों व शक्य ती मदतच केली." हिलाच माणुसकीची वृत्ति असें म्हणतात!

देशी संस्थानांसंबंधींचा त्यांचा दृष्टिकोण असाच व्यापक नि मार्गदर्शक

आहे. १९२१ पासून त्यांनीं संस्थानी राजकारणाकडे विशेष लक्ष पुरविलें होतें. संस्थानी प्रजेच्या कार्याला जोराची चालना देण्यासाठीं त्यांनीं 'दक्षिण-संस्थान हितवर्धक सभा' व 'दक्षिणसंस्थान प्रजापरिषद' सुरू केली. प्रजेवर होणाऱ्या अन्यायांविरुद्ध त्यांनीं जसे संस्थानिकांना खडसावलें तसेंच त्यांनीं संस्थानिकांसंबंधीं स्वत्वाची जाणीवहि निर्माण केली. ते नेहमींच म्हणतात कीं, "संस्थानें हीं स्वराज्याचीं जुनीं चिन्हें आहेत. पुढेंमागें त्यांचा स्वराज्याच्या लढ्यासाठींहि उपयोग होऊं शकेल. म्हणूनच हीं संस्थानें आदरणीय व्हावींत अशी इच्छा आहे." पण याबरोबरच ते संस्थानिकांनाहि स्वच्छपणें बजावतात कीं, "संस्थानिक लोक यापुढचें धोरण काळवेळ पाहून योग्य असें न ठेवतील तर त्या संस्थानांची धडगत राहणार नाहीं." त्यांच्या या समतोल व न्याय्य विचारसरणीमुळें ते जसे संस्थानिकांना मित्र व वाली वाटतात तसेच ते संस्थानी प्रजेलाहि आपले मार्गदर्शक नि विश्वासू पुढारी वाटतात. आणि म्हणूनच त्यांना अखिल भारतीय संस्थान–प्रजापरिषदेचें अध्यक्षस्थानहि लाभलें होतें.

सारांश, राजकारणी म्हणून केळकरांनीं जनतेंतील वैचारिक भोळसरपणा घालवून त्या ठिकाणीं हिशेबीपणा आणला. चिकित्सेची आवड निर्माण करून लोकांत जनसेवेची जिवंत आवड निर्माण केली. त्यांच्या राजकीय बुद्धिसामर्थ्याविषयींचें बापूजी अणे यांचे पुढील उद्गार उद्बोधक वाटतील. ते लिहितात, "कॉंग्रेस वर्किन्ग कमिटींत तीव्र बुद्धिमत्ता व राजकारणांतील व्यावहारिक धोरण जाणणारीं माणसें तुमच्याखेरीज कोणी नाहींत. निदान तुम्ही तरी तेथें असल्यानें ही उणीव भरून निघाली आहे, हें महाराष्ट्रांत व बाहेर हिंदुस्थानांत आतां सर्वांना माहीत आहे. अनेक प्रसंगीं जर वर्किन्ग कमिटींत तुम्ही नसतां तर सुधारलेल्या सर्व जगाकडून छीःथू होऊन कॉंग्रेस खालीनें हास्यास्पद झाली असती. तुम्हीं बऱ्याच कुशलतेनें व यशस्वी रीतीनें आपला मार्ग काढला." ( १७ फे. १९२२ )

'केळकर व राजकारण' या लेखाच्या शेवटीं श्री. अण्णासाहेब भोपटकरांनीं केलेलें केळकर–गुणगानहि असेंच मार्मिक आहे. ते म्हणतात, "हिंदी राजकारणाच्या भिन्नभिन्न अवस्थांतून गेलेले, व प्रत्येक अवस्थेमध्यें खिनीवर लढत असलेले, असले केळकरांच्यासारखे राजकारणी पुरुष साऱ्या हिंदुस्थानांत हाताच्या बोटांवर मोजण्याइतके सांपडतील कीं नाहीं, याची

वानवाच आहे. त्यांच्या अंगचे विशिष्ट गुण कीं, जे त्यांच्या सान्निध्यांत असलेल्या त्यांच्या स्नेही-सोबत्यांचीं मनें व अंतःकरणें काबीज करून टाकल्याशिवाय राहात नाहींत, तेच राजकारणांत त्यांना अनेकदां मारक झालेले आहेत. त्यांपैकीं एक गुण म्हणजे त्यांचा जाज्वल्य स्वाभिमान होय! हाच त्यांचा स्वाभिमान कितीदां तरी त्यांच्या कीर्तीच्या आड आलेला आहे! १९२० च्या पुढील काळांत जर त्यांनीं आपला स्वाभिमान थोड्या अंशानें एका बाजूस ठेविला असता, तर ते केव्हांच राष्ट्रीय सभेचे अध्यक्ष झाले असते! त्यांच्यापेक्षां किती तरी कमी दर्जाच्या परंतु धोरणी स्वभावाच्या इसमांनीं घटकाभर आपली बुद्धि व सदसद्विवेक दुसऱ्याकडे गहाण टाकून तो मान उपटला आहे! व त्यानंतर सांधीकोपऱ्यांत जाऊन पडलेले आहेत! तात्यासाहेबाच्या राजकारणांत मेघांचा गडगडाट व विजांचा चमचमाट कदाचित् नसेल; परंतु त्यांत गंगौघाचा गंभीर घोष व शुक्राच्या चांदणीचा तेजस्वीपणा निःसंशय होता व आहे! सारांश, सर्व दृष्टींनीं विचार करतां, गेल्या शंभर वर्षांत महाराष्ट्रांत जे थोर पुरुष जन्मास आले, त्यांमध्यें तात्यासाहेबांची गणना अवश्य केली जाईल!...परंतु तात्यासाहेब मात्र असे एक थोर पुरुष आहेत कीं, ज्यांच्या कीर्तीला कधीं ओहोटी म्हणून लागणार नाहीं, आणि ज्याचें चारित्र्य भावी पिढ्यांना अत्यंत बोधप्रद व स्फूर्तिदायक असें बनेल!"

आणि म्हणूनच या राजकारणी महापुरुषाला या प्रकरणाच्या आरंभीं आम्हीं 'धुरंधर मुत्सद्दी' असें संबोधिलें आहे तें योग्यच नव्हे काय?

## प्रकरण ८ वें

# विवेकशील नि कृतिसंपन्न समाजसेवक

**"...आजतागायत त्यांनीं स्वतांस करतां येत नाहीं अशी कोणतीहि गोष्ट करण्यास दुसऱ्यास उपदेशिलें नाहीं....तात्यासाहेब हे खरेखुरे प्रथमपुरुषी देशभक्त समाजसेवक आहेत! त्यांनीं आतांपर्यंत तेंच प्रतिपादलें आहे कीं, जें ते स्वतः करूं शकले व शकतात!"**

—दे. भ. अण्णासाहेब भोपटकर

कोणताहि गांव सुधारावयाचा, स्वच्छ करावयाचा म्हणजे त्याचे भाग, त्याच्या पेठा, त्या गांवांतील घरें नि शेवटीं त्या ठिकाणचे रहिवाशी सुधारावयाचे व त्यांना स्वच्छतेचे नियम पाळावयास शिकवावयाचें हेंच होय ना? त्याचप्रमाणें बाग सुधारणें म्हणजे वाफे सुधारणें म्हणजेच त्या वाफ्यातील प्रत्येक रोपटें टवटवीत दिसेल असें करणेंच ना? मग देश सुधारणें म्हणजे तरी काय? त्या देशांतील समाज आणि त्या समाजांतील व्यक्ति सुधारणें म्हणजेच देश सुधारणें नव्हे काय? देश–समाज–व्यक्ति अशी ही अखंड उतरण असल्यामुळें देशभक्ताला समाज व व्यक्ति यांच्या उद्धाराची विवंचना करावीच लागते. या नियमाप्रमाणें केळकरांनी आपला हिंदु समाज व त्या समाजांतील व्यक्ति यांच्यासंबंधीं फार कळकळीनें विचार केला आहे. जुन्या–नव्याचा समन्वय कसा करावा यासंबंधीं कांहीं ठाम शिकवण त्यांनीं आपल्या अधिकारवाणीनें दिलेली आहे, व व्यक्ति म्हणून ती शक्य तों अमलांतहि आणून दाखविली आहे.

व्यक्ति या नात्यानें त्यांची धार्मिक व सामाजिक वागणूक मोठी अनुकरणीय आहे. एककल्लीपणा, हट्टीपणा किंवा विक्षिप्तपणा हा त्यांच्यांत एवढासुद्धां सांपडावयाचा नाहीं. माणूस जेव्हां दुसऱ्यांच्या भावना लक्षांत घेऊन बोलतो व वागतो तेव्हां आपण त्याला खरा सभ्य म्हणतो. अशा माणसाला गोडपणानें पुष्कळ अवघड गोष्टीहि सोप्या करतां येतात. केळकरांचें असेंच आहे. समजूतदारपणा, दोन्ही बाजूंचा मेळ घालण्याची प्रवृत्ति, न्यायीपणा यामुळें त्यांनीं घरच्या व बाहेरच्या आणि प्रतिपक्षीय लोकांचाहि विश्वास संपादन केलेला आहे. अप्रामाणिकपणा बिलकुल नसल्यामुळें व उलट देवाणघेवाण करूनच घरीं व दारीं सर्वत्र व्यवहार सुरळीत चालतात अशी त्यांची ठाम समजूत असल्यामुळें त्यांचे 'गतगोष्टींतील' पुढील उतारे मोठे उद्बोधक वाटतील. ते लिहितात कीं, "मी देखील लहानपणीं संध्या, देवपूजा वगैरे करीत होतों. घरचा वैश्वदेव करीत होतों. प्रीव्हियस परीक्षा होईपर्यंत गुरुचरित्र वाचीत होतों. आणि जानवीं मंतरण्याचा मंत्र, सौर, रुद्र हे मी आमच्या उपाध्यायाजवळ म्हटले होते. परंतु या सर्व गोष्टी जवळजवळ घरच्या वळणामुळेंच मी करीत होतों. त्यांपासून विशेष कांहीं पुण्य लागेल अशा कल्पनेनें त्या करीत नव्हतों. उलट आज पाहिलें तर मी संध्या-वैश्वदेव करीत नाहीं, पण घरीं असलों म्हणजे स्नान केल्यावर भोजनाच्या आधीं

चार-दोन मिनिटेंच का होईना परंतु देवापुढें बसून फुलें वाहतों व डोळे मिटून क्षणभर एकाग्र होण्याचा प्रयत्न करतों. माझी श्रावणी सहसा चुकत नाहीं. श्राद्धपक्ष मी नियमानें करतों. आणि घरीं रामनवमीच्या दिवशीं पूजा, वेदपठण, वसंतपूजा या गोष्टी वडिलांची आठवण ठेवून हौसेनें करतों. पण आज या गोष्टी मी करतों त्या त्यांपासून पुण्य लागेल म्हणजे पारलौकिक कांहीं लाभ होईल अशा श्रद्धेनें करीत नाहीं, तर ज्याला सकृद्दर्शनीं धार्मिक आचाराचीं कृत्यें म्हणतां येईल त्या या माझ्या गोष्टी सामान्यपणें सामाजिक व्यवहारांतल्या अशाच होऊन बसल्या आहेत."

"सामाजिक व्यवहारांत स्वच्छता, शुचिर्भूतता ठेवणें, तोंडांतून अपशब्द न काढणें, रीतीचा-चालीचा पोशाख-पेहेराव करणें व समाजांतील ज्या निरनिराळ्या लोकांशीं संबंध येतो त्यांच्याशीं सभ्यपणें दाक्षिण्यवृत्तीनें वागणें या गोष्टी करण्यांत 'पारलौकिक' दृष्टि जितकी असूं शकेल तितकीच माझ्या वरील धर्मकृत्यांत असूं शकेल ! हें समीकरणादाखल मी बोललों; पण खरा अर्थ यांत पारलौलिक कल्याणाची बाजू मुळींच नाहीं हाच......पण त्यांतल्या त्यांत समाजाला न दुखविण्यापेक्षांहि घरच्या मंडळींना म्हणजे पूर्वी वडीलमातोश्रींना व हल्लीं कुटुंबाला वाईट वाटूं देऊं नये हेंच माझें मुख्य धोरण असतें...पण धार्मिक स्वरूपाच्या कृत्यांतहि माझी पारलौकिक कल्पना नसून केवळ **सामाजिक कल्पनाच** आहे असें म्हटल्यावर अप्रामाणिकपणा उरतो असें मला वाटत नाहीं...आणि या गोष्टी एका बाजूनें जशा धार्मिक प्रवृत्ति नसणाऱ्या आम्हांला दुसऱ्याकरितां कराव्याशा वाटतात, तशाच धार्मिक प्रवृत्तींच्या माणसांनाहि त्याच विवेकामुळें नवीन लोकांना सोईच्या सवलती द्याव्या असेंहि वाटतें."

या उताऱ्यांवरून केळकरांची समजूतदार वृत्ति, मिळतें घेण्याची रीत आणि दुसऱ्यांच्या भावनांचा आदर करण्याची पद्धति दिसून येते. त्यांच्या बाबतींत तरी ही वागणूक यशस्वी ठरली आहे. यामुळें मातापित्यांना ते जसे समाधानी नि सुखी करूं शकले तसेंच कौटुंबिक स्वास्थ्य टिकवूनहि ते स्वतःची मुलगी देशस्थाच्या घरीं देण्याची सुधारणाहि करूं शकले. स्त्रीशिक्षणादि गोष्टींबरोबरच परदेशगमनावरील बहिष्कार उठविणें आणि पुनर्विवाहित स्त्री-पुरुषांबरोबर आदरानें व समानतेनें वागणें या गोष्टीहि ते घरांत आणूं

शकले. अभक्ष्य-भक्षण, अपेयपान किंवा कोणतेंहि अभद्र वर्तन आपण कधींहि करणार नाहीं असा विश्वास त्यांनीं स्वतःच्या पत्नीच्या मनांत उत्पन्न केला असल्यामुळें त्यांनींहि केळकरांच्या सुधारणावादी मतांना संपूर्ण वाव दिला आणि तोहि मोठ्या समाधानानें नि आनंदानें. अन्योन्य भावना जाणून आणि तसें वागून सुखी होणारें केळकर-कुटुंब महाराष्ट्राला आजहि आणि सदैवच आदर्शवत् राहील यांत शंकाच नाहीं.

जें वागण्याचें धोरण आणि जो वृत्तीचा दिलदारपणा घरांत दिसून येतो तोच दिलदारपणा नि तेंच धोरण समाजांत वागतांनाहि दिसून येतें. त्याच्या जोडीला निरलसता, व्यासंग, निर्भयता, सर्वस्पर्शी बुद्धिमत्ता, समतोलपणा, न्यायीवृत्ति, लोकसेवेचा प्रचंड हव्यास नि निष्कलंक चारित्र्य या गुणांची भर पडल्यामुळें केळकरांची समाजसेवा अनेकांगी, विस्तृत, कल्याणप्रद नि भरघोस झालेली आपण पाहातों.

समाजाच्या उद्धाराच्या किती तरी चळवळी त्यांनीं केल्या. त्यांनीं वृत्तपत्रें चालवून जशी मनचेतवणी केली, लोकांना कार्यप्रवृत्त केलें तसेंच त्यांना कार्य करण्याला विविध क्षेत्रेंहि त्यांनीं निर्माण करून दिलीं. निवृत्तीच्या वेळीं ५५ ते ६० संस्थांचा संबंध त्यांना सोडावा लागला. त्या संस्थांत ग्राम प्राथमिक शिक्षण-मंडळ, भोसले मिलिटरी स्कूल, डेक्कन एज्युकेशन सोसायटी, देवगड एज्यु. बोर्ड, महाराष्ट्र शिक्षण-प्रसारक-मंडळ इत्यादि शिक्षणसंस्था जशा आहेत तशाच कॉमनवेल्थ विमाकंपनी, मर्चंटस् को. बँक, सेंट्रल को. बँक, पैसाफंड मुख्य कमिटी, बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेट, मिरज विमाकंपनी, रे इंडस्ट्रियल म्युझियम् इत्यादि व्यापारविषयक नि औद्योगिक संस्थाहि आहेत. गीताधर्ममंडळ, शुद्ध पंचागमंडळ, भारत इतिहास सं.मंडळ, साहित्य-परिषद, मराठी ग्रंथसंग्रहालय, महाराष्ट्र शारदामंदिर, भांडारकर इंस्टिटयूट, नाट्य-संशोधन-मंडळ, हिंदु लॉ रिसर्च सोसायटी, वैदिक संशोधन-मंडळ इत्यादि बुद्धिकार्य करणाऱ्या संस्था जशा त्यांमध्यें आहेत तशाच महाराष्ट्र व्यायाम-मंडळ, डेक्कन जिमखाना इत्यादि व्यायामसंस्थाहि आहेत. या-शिवाय पुढील मालिका पाहा. महाराष्ट्र चित्रकार-मंडळ, गोपाळ गायनसमाज किंग एडवर्ड मेमोरियल हॉल, तळेगांव धर्मार्थ हॉस्पिटल, ताराचंद रामनाथ हॉस्पिटल, पुणें सार्वजनिक सभा, वक्तृत्वोत्तेजक सभा, रायगड शिवाजी-स्मारक वृत्तव्यवसाय-मंडळ, लोकमान्य पुण्यतिथी-मंडळ, महाराष्ट्र-निवास, कलकत्ता,

टिळक-स्मारक-ट्रस्ट, शिवाजी-मंदिर-ट्रस्ट, हिराबाग टाऊनहॉल कमिटी, गोवर्धन-मंडळ, श्रद्धानंद स्मारक-मंडळ, दिल्ली, अनाथ बालिकाश्रम, संस्थान-प्रजा-परिषद व. अ भा. हिंदु महासभा इ. इ.

ही यादी पाहिल्यानंतर दीर्घोद्योग, सार्वजनिक कार्याची जिवंत हौस, अष्टावधानी बुद्धि आणि कार्यक्षमता हे केळकरांचे गुण जसे उत्कटत्वानें दिसतात तशी त्यांची लोकप्रियताहि लक्षांत येते. या विविध संस्थांतून त्यांनीं अध्यक्ष, उपाध्यक्ष, सल्लागार व विश्वस्त या अनेकविधं नात्यांनीं भरीव कामगिरी केलेली आहे. मध्यवर्ती विधिमंडळ असो, पुणें नगरपालिका असो किंवा वरीलप्रमाणें कोणतीहि संस्था असो केळकरांची काम करण्याची रीत ठरलेली आहे. त्या रीतीसंबंधीं पुणें-नगरपालिकेचे माजी मुख्याधिकारी प्रा. भागवत यांनीं 'केळकर-ग्रंथां'त जें लिहिलें आहे तें सर्वच वाचनीय असलें तरी त्यांतील पुढील सार त्यांच्या कार्यपद्धतीची कल्पना देण्यास पुरेंसें आहे प्रा. भागवत लिहितात, "म्यु० पा० तील केळकरांच्या कामासंबंधानें दोन-तीन गोष्टी मुख्य आहेत : (१) सर्व सभांस हजर (२) म्यु० पा० तील एकहि बारीक मोठें अंग सांपडणार नाहीं, कीं ज्यांत केळकरांचें तज्ज्ञत्व दिसून येत नाहीं आणि ( ३ ) म्यु० पा० विषयींचा अभिमान." याचप्रमाणें 'गतगोष्टी' तील 'कायदे कौन्सिलांतील कामकाज' या प्रकरणांतील रा. शं. न. आगाशे यांनीं केळकरांच्या तेथील कामकाजासंबंधीं दिलेली माहितीहि अवश्य बघण्यासारखी आहे.

सारांश, "खचतें कार्य रचतें व चालतें करून द्यावें हा केळकरांचा स्वभाव, देशहिताच्या कोणत्याहि गुणविशेषाचें आपल्या हातून पोषण व्हावें ही त्यांची वृत्ति व त्यांच्या ठिकाणीं कामाचा उरक फार, यामुळें अनेक संस्थांत ते असावेत असें ज्याला त्याला वाटतें." आणि म्हणूनच त्यांना इतक्या भरगच्चपणें समाजसेवा करतां आली नि देशाचे पांग फेडतां आले.

वर वर्णन केल्याप्रमाणें समाजाच्या उन्नतीचा सर्वांगीण प्रयत्न चालू असतांनाच केळकरांनीं हिंदुमहासभेच्या द्वारें हिन्दूंची जी अमोल सेवा केली आहे ती तर केवळ अपूर्वच होय. या हिन्दूंच्या देशात हिन्दूच स्वतःस हिन्दू म्हणवून घ्यावयास लाजत होते! आपण हिन्दू आहोंत नि तेहि बहुसंख्य आहोंत हा जणूं काय गुन्हाच आहे असें दाखविण्यासाठीं सुतकी चेहेरे करून हिन्दूच

मुसलमानांच्या हितासाठीं झगडत होते. सर्वत्र हिंदूंनीं पड खावी, दंग्यांत मार खावा, वाद्यें बंद ठेवावींत, समोर जरी गाई मारल्या तरी विरोधाचा शब्दहि उच्चारूं नये, कारण त्यामुळें मुसलमान 'बंधू' रागावतील, आयाबहिणी पळविल्या तरी वर्तमानपत्रांतून त्याचा गवगवा करूं नये,तक्रारी करूं नयेत.कारण त्या बिचाऱ्या पळविणारांना तरी बायका कोठून मिळणार? तेव्हां ही दया आपण नको का दाखवावयाला? असें सगळें चाललें असतांना म्हणजेच सर्वत्र अपमान, दंगे, आक्रमणें, जबरदस्तीनें बाटविणें इत्यादि चालू असतांना, आपल्याच घरांत मानानें जगणें अशक्य झालें असतांना ज्या कांहीं चार सहा लोकांनीं ताठरपणें नि स्वाभिमानानें हिंदूंना जागृत राखण्याचा विश्वप्रयत्न केला त्यांमध्यें केळकर हें नांव फार मोठें आहे. श्रद्धानंदजींचा भरदिल्लींत–भारताच्या राजधानींत दिवसा ढवळ्या खून! हो! खून झाला असतांना आणि त्या खुनी इसमाला 'भाई रशीद' म्हणून अग्रलेख लिहून वांचविण्याचे हिन्दूच प्रयत्न करीत असतांना स्वामी श्रद्धानंदांच्या पवित्र कार्याला वाहून घेणें नि त्या कार्याचा प्रचार करणें सोपें नव्हतें! तें केळकरांनीं केलें, डॉ. मुंजे यांनीं नि भाई परमानंदजींनीं केलें! सर्व भारत अशा अनिष्ट नि दुष्ट मेघांनी व्यापला असतांनाहि हिंदुत्वाची चंद्रकोर प्राणपणानें जर कोणीं जगविली असेल, लोपूं दिली नसेल तर ती या पुण्यपुरुषांनींच होय यांत शंकाच नाहीं.

एकसष्टीच्या महोत्सवप्रसंगीं मुंबईस भाषण करतांना डॉ. जयकर म्हणाले कीं, " केळकरांनीं हिंदुमहासभेची मोठी सेवा केली आहे. कित्येक हिंदु पुढाऱ्यांना हिंदु म्हणवून घेण्यात कमीपणा वाटतो तसा तो मला अगर केळकरांना वाटत नाही. आम्हांला ज्ञातिनिष्ठ म्हणतात. जो हिन्दु असून स्वतःला हिन्दु म्हणवितो तो ज्ञातिनिष्ठ अशी विपरीत व्याख्या सध्यां रूढ झाली आहे. मुसलमानांनीं सवता सुभा स्थापिला व कांहीं मागण्या केल्या तरीं तें मात्र ज्ञातिनिष्ठ ठरत नाहींत. आम्ही मुसलमानांच्या अराष्ट्रीय मागण्यांना विरोध करतों. असें असतां आम्हालाच ज्ञातिनिष्ठ म्हणतात. वास्तविक जे ब्रिटिशांच्या मैत्रीमुळे आपला अधिक फायदा होईल असें मानतात तेच खरे ज्ञातिनिष्ठ होत. तुम्ही तेलाचा दिवा घ्या नाहीं तर विजेचा दिवा घेऊन शोधा, तुम्हांला केळकरांच्या एका शब्दांतहि असली हिणकस ज्ञातिनिष्ठा सांपडणार नाहीं केळकरांची राष्ट्रीय वृत्ति खणखणीत आहे."

केळकरांची ही खणखणीत राष्ट्रीय वृत्ति गांधींचें राजकारण सुरू होण्या-

पूर्वींपासूनची आहे. १९१२ सालींच 'हिंदुराष्ट्राचें एकीकरण' हा लेख लिहून त्यांनी हिंदु हितासाठीं राष्ट्रीय सभेवर अवलंबून न राहतां स्वतंत्र संघटना करण्यासंबंधीं कळकळीने सुचविलें आहे. हिंदुत्वाचा त्यांचा अभिमान जाज्वल्य आहे. हिंदुत्व टिकवूनच म्हणजे हिंदूंना हिंदू राहूनच स्वराज्य पाहिजे आहे. हिंदुत्व कीं स्वराज्य या दोहोंमध्यें तें हिंदुत्वच आनंदानें स्वीकारतात. त्यांचा इतिहासाचा अभ्यास व पूर्वसंस्कृतीचा अभिमान इतका चोख आहे कीं, ते हिंदुत्वासाठी वाटेल त्याचें मोल देऊन तें टिकवण्याचाच सल्ला नेहमीं देत आले आहेत. महासभेच्या अध्यक्षपदावरून भाषण करतांना त्यांनी वेळोवेळीं व्यक्त केलेले खालील विचार या दृष्टीनें मनन करण्यासारखे आहेत. एका अधिवेशनांत ते म्हणाले की, "मनुष्य जोंपर्यंत आपणांस हिंदु असें म्हणवितो तोंपर्यंत त्याला हिंदु समाजाच्या कल्याणाची काळजी वाहिली पाहिजे व त्याकरितां खटपट केली पाहिजे. जेव्हां खरें सत्ययुग अवतरेल तेव्हां अर्थातच हीं धर्मांचीं व जातींचीं लेबलें आणि पट्टया नष्ट होतील. परंतु भविष्यकाळीं काय होणार त्यावर नजर ठेवून प्रस्तुत काय कर्तव्य आहे याचा विचार न करणें शहाणपणाचें होणार नाहीं." १९३२ सालीं त्यांनीं बजावलें की, "हिंदूंना केवळ राजकीय स्वराज्य मिळवावयाचें आहे असें नसून, त्या स्वराज्यांत हिंदू राहून त्यांना त्यांचा योग्य हिस्सा मिळवावयाचा आहे. यास्तव हिंदूंनीं आपल्या मान्याच्या सर्व जागा अधिक मजबूत करून कोणत्याहि संकटाला तोंड देण्यासाठीं सुसंघटित व तत्पर राहिलें पाहिजे." अल्पसंख्याकाचे योग्य हक्क ते केव्हांहि मान्य करतातच, पण त्यांचे फाजिलपणाचे लाड एकक्षणहि चालूं देण्याची त्यांची तयारी नाहीं. ते म्हणतात, "अल्पसंख्याकांना योग्य त्या सवलती द्यावयास पाहिजेत; शक्य झाल्यास स्वराज्याची लढाई मुसलमान बंधूंच्या मदतीनें लढावी; पण तें शक्य न झाल्यास एकाकी व कदाचित् इतराच्या जुटीविरुद्धहि स्वराज्याची लढाई तडीस नेण्यास सज्ज झालें पाहिजे."

हिंदुमहासभेच्या कार्याला तत्त्वज्ञानाची खंबीर बैठक निर्मून देणें नि इतरांच्या कुत्सित व दुष्ट आक्षेपाला सडेतोड नि योग्य उत्तरें देऊन त्या बैठकीचें रक्षण करणें हें कार्य केळकरांनीं मोठ्या हिरिरीनें पार पाडलें आहे. त्याच्याच जोडीला अस्पृश्यतानिवारण, शुद्धि व संघटण या चळवळींचा पुरस्कार करून त्यांनीं हिंदूंना मार्गदर्शनहि केलेलें आहे.

शुद्धीच्या चळवळीचा तर त्यांनीं चांगलाच पाठपुरावा केलेला आहे. मसूर आश्रमानें गोवें प्रातांत शुद्धीची चळवळ चालविली असतांना तेंथील पोर्तुगीज सरकारनें तीव्र विरोध करून आश्रमवासियांचा छळ चालविला आहे हें कळल्याबरोबर त्यांच्या मदतीला प्रथम केळकरच धांवले नि त्यांनीं असेंब्लीतील सभासदांचे वतीनें एक जाहीर पत्रक पोर्तुगीज गव्हर्नरकडे पाठविलें व अत्याचाराबद्दल निषेध करून दाद मागितली. या शुद्धीच्या बाबतींत त्यांचें म्हणणें असें कीं, हिंदुत्व हा जसा हिंदूंचा आत्मा तसेंच संख्याबल हें त्यांचें शरीर आहे. या शरिराचें त्यांनीं रक्षण केलेंच पाहिजे. म्हणजे त्यांनीं आपलें संख्याबल टिकाविलें पाहिजे. एवढेंच नव्हे तर शुद्धीच्या साहाय्यानें म्हणजेच बाटलेल्यांना पुनः स्वधर्मात घेऊन तें वाढविलेंच पाहिजे. कारण तें लोकशाहीच्या दृष्टीनें एक जबर शस्त्रच आहे.

अस्पृश्यतानिवारणासंबंधीं त्यांचीं मतें नि त्यांची कळकळ प्रसिद्धच आहे. त्यांचा या विषयाचा अभ्यास व या बाबतींतील त्यांचें कार्य लक्षांत घेऊन त्यांच्या अनुभवाचा फायदा मिळावा अशी गांधीजींनींहि त्यांना १९३३ सालीं येरवडा तुरुंगांतून विनंति केलेली होती. गांधीजी त्या पत्रांत लिहितात, "मला माझ्या अस्पृश्यतेविरुद्ध काढलेल्या मोहिमेंत तुमची सक्रिय मदत अवश्य हवी. ती किती व कोणत्या तऱ्हेनें देतां येईल तें तुमचें तुम्ही ठरवा. ही भिक्षा मी पदर पसरून मागत आहे. ती घालाच. तुम्हास सवड सांपडेल तेव्हां मला आगाऊ कळवून भेटावयास या...' हरिजन ' साठी तुमचा संदेश पाठविलांत तर फार बरें होईल."

या विनंतीप्रमाणें केळकरांनीं गांधीजींची भेट घेऊन त्यांच्यांशीं दीड तासपर्यंत मंदिरप्रवेशाच्या बिलासंबंधीं सर्व बाजूंनीं मनमोकळेपणानें चर्चा केली. मंदिरप्रवेशासंबंधीं केळकरांनीं खालील तडजोडीची योजना मांडली. गांधीजींनीं सदरहू योजना आपणांस मान्य असल्याचें सांगितलें. योजना अशी होती. (१) देवळांचें जें गर्भागार म्हणजे अंतर्गृह म्हणून असतें त्यांत अस्पृश्यच काय पण स्पृश्यांनाहि प्रवेश करूं देऊं नये. (२) या अंतर्गृहांतील सर्व व्यवस्था व प्रत्यक्ष देवपूजा ही फक्त नियोजित पुजाऱ्यानेंच करावी, व इतरांना फलपुष्प नैवेद्यादि भोग मूर्तीला वाहावयाचे असतील तर ते पुजाऱ्याच्या हातीं देऊन त्याजकडून ते वाहवावे. (३) अंतर्गृहाबाहेर सोईच्या अशा ठिकाणीं

एक मर्यादेची खूण उभारण्यांत यावी, आणि स्पृश्य किंवा अस्पृश्य यांनीं येथूनच देवदर्शन घ्यावें.

अस्पृश्य समाजाचे एक पुढारी रा. गणपत नारायण कांबळे यांचा केळकरांच्या अस्पृश्यतानिवारणाच्या कार्यासंबंधींचा 'दलितबंधू' तील पुढील अभिप्राय मननीय वाटेल. ते लिहितात, "अस्पृश्यतानिवारण्याचें कार्य महाराष्ट्रांत दे. भ. भोपटकर व श्री. माटे मास्तरांच्या सहाय्यानें दे. भ. केळकरांनीं जितकें परिणामकारकपणें केलें आहे तितकें 'डिप्रेस्ड क्लॉसेस मिशन' समाजसमतासंघ किंवा बहिष्कृत हितकारिणी सभेनेंहि केलेलें नाहीं. मग सुधारकांनीं केलेलें नाहीं हें सांगावयास नकोच."

आतांपर्यंत या प्रकरणांत केळकरांचे व्यक्ति या नात्यानें असलेले आचार नि विचार आपण पाहिले. त्यांची बहुरूपी भरगच्च नि अनेक संस्थांच्यामार्फत झालेली उन्नतिकारक समाजसेवाहि अवलोकिली. आणि हिंदुमहासभेच्याद्वारा त्यांनीं केलेला हिंदुराष्ट्राचा उद्धारहि आपण बघितला. या सर्वांवरून केळकरांसारखे कृतिशूर पुढारी किती दुर्मिळ असतात हें सहज लक्षांत येईल. आणि म्हणूनच या विवेकशील नि कृतिसंपन्न महापुरुषाची योग्यता जाणून महाराष्ट्रानें त्यांना थोर समाजसेवक म्हणून जर गौरविलें असेल तर तें यथार्थच नव्हे काय?

---

## प्रकरण ९ वें

# साहित्यसम्राट् केळकर

**"केळकर हे साहित्य क्षेत्रांतील कर्मयोगी व ज्ञानयोगी आहेत... वाङ्मयक्षेत्रांत ते खरे 'भक्तियोगीहि' आहेत."—प्रा. वा. म. जोशी.**

**"आपणांवर आम्हां साहित्यसेवकांचा जितका हक्क आहे तितका दुसऱ्या कोणाचाहि नाहीं, ही गोष्ट आपणांसहि मान्य होईल. कारण आपण प्रथम साहित्यप्रणेते व नंतर इतर सर्व कांहीं आहां."**

**—'साहित्यसंस्थे'तर्फेचें मानपत्र.**

मंदिर—अन् तें अति सुंदर असावें, वरती चारहि बाजूंना लहान लहान शिखरें असून मध्यें एक भले मोठें उंचच उंच असें शिखर असावें. तें मंदिर जवळून पाहतांना रम्य दिसेल. त्याची दालनें, त्याच्या भिंती, त्यावरील कलाकुसरीचीं कामें, जवळून दिसणारी ती शिखरांची मोहक शोभा यांमुळें तें मंदिर सगळ्यांना आवडेल. सगळे त्याची स्तुतिहि करतील. पण जसें अंतरा॰ वर दूर दूर जावें तसें तसें मनांत ती जवळून पाहिलेली मनोरम शोभा नि तें सौंदर्य, पण डोळ्यांना फक्त तें उंचच उंच शिखर तेवढें दिसावें असें होतें. अगदीं नेमकें असेंच केळकर–चरित्र–मंदिराचें आहे. तें जवळून भव्य शोभा-यमान नि तेजस्वी दिसतें. त्याच्या अनेक भागांची दीप्ति आपण पाहतों. पण...पण भावी पिढ्यांना, दूर दूर अंतरावरून पाहणाऱ्या पिढ्यांना, केळकर –चरित्र–मंदिराचा जर कोणता एकच एक भाग प्रामुख्यानें दिसणार असेल तर तो म्हणजे त्याचें आकाशापर्यंत गेलेलें नि उंचच उंच असलेलें असें साहित्य–शिखर हा होय! हें गगनभेदी, भव्य नि चमचम चमकणारें साहित्य–शिखर पाहून 'चला रे चला! आपण तें जवळून एकदां बघूं या तरी' अशा लोभाविष्टपणें त्या दूरच्या भावी पिढ्या या केळकर–चरित्र–मंदिराकडे ओढल्या जातील, आकर्षिल्या जातील यांत शंकाच नाही.

केळकरांना साहित्य–सम्राट् म्हणतात हें सर्वश्रुतच आहे. सम्राट् आपण कोणास म्हणतो? तर ज्याचें स्वतःचें देशावर राज्य तर असतेंच असतें, पण शिवाय जगातील इतर कांहीं देशावरहि तें असतें अशा राजाला आपण सम्राट् म्हणतों. अनेक ठिकाणीं अनेक दिशांना राज्यविस्तार असणें, अधिकार चालणें म्हणजे साम्राज्य. वाङ्मयजगांत असा एकहि देश, प्रांत वा भाग नाहीं कीं, जेथें केळकरांचें अधिराज्य नाहीं. केळकरांच्या या साम्राज्यावर प्रतिभा –सूर्य केव्हांहि मावळत नाही! तो या नाहीं त्या क्षेत्रांत कोठें ना कोठें तरी तळपत असतोच! आणि म्हणूनच केळकर सम्राट् आहेत. त्यांचें साम्राज्य साहित्यक्षेत्रांवर पसरलेलें आहे म्हणून ते साहित्यसम्राट् आहेत. सर्वांमुखीं मान्य झालेले असे एकमेव सम्राट् ते आहेत!

वाङ्मयाच्या कोणत्याहि शाखेंत निर्भयपणें संचार करणें हा त्यांच्या कर्तृत्वाचा अनन्यसाधारण विशेष होय. ते कवि, नाटककार, लघुकथालेखक विविधांगी रसज्ञ टीकाकार, कादंबरीकार, संपादक, ग्रंथपरीक्षक, चरित्रकार, हास्यविनोद–मीमांसक, इतिहासकार, प्रस्तावनाकार व सर्वश्रेष्ठ निबंधकार

आहेत. या सर्व क्षेत्रांत त्यांची लेखणी लीलेनें विहार करते. या सर्व क्षेत्रांत लिहावयाचेंच म्हणून त्यांनीं लिहिलेलें नाहीं. तर जें लिहिलें तें स्वयंस्फूर्त, मौलिक नि चिरंतन टिकणारें आहे. त्यांचें हें विविध व विस्तृत वाङ्मय 'स्फूर्तिदायक, विचारप्रवर्तक, ज्ञानसंवर्धक, आनंददायक आणि म्हणूनच आदर्शभूत आहे.' अशा या त्यांच्या वाङ्मयाचा म्हणजेच साहित्यभांडाराचा आपण या प्रकरणांत अल्पसा परिचय करून घेऊं या.

**निबंधकारः**—केळकरांचें निबंधवाङ्मय इतकें विपुल नि श्रेष्ठ दर्जाचें आहे कीं, त्यामुळें त्यांना निबंधकार केळकर असेंच म्हणावेंसें वाटतें. जसे कादंबरीकार आपटे, नाटककार खाडिलकर, टीकाकार कोल्हटकर तसे निबंधकार केळकर. केळकरांच्या या वाङ्मयशाखेंत त्यांच्या विविध लेखनगुणांचें जणूं संमेलनच भरलें आहे असें दिसतें. वर्तमानपत्रकार असल्यामुळें त्यांना पृथ्वीच्या पाठीवरील बहुतेक सर्व विषय हाताळावे लागले आहेत! पण विषय कोणता का असेना तो, प्रा. वा. म. जोशी म्हणतात त्याप्रमाणें "या साहित्यभक्ताच्या व रसज्ञ ज्ञानयोग्याच्या आणि वाङ्मयकलापटु कर्मवीराच्या हातीं आला कीं त्यांत बहुश्रुतता, वैदग्ध्य, माधुर्य, सालंकारत्व, रसप्राचुर्य, रसलोलुपता इत्यादि गुणांची भर पडून तो खुलून दिसावयाचाच व फुलून जावयाचाच."

प्रा. देशपांडे यांचे 'निबंधकार' या प्रकरणांतील पुढील उतारेहि मोठे बहारीचे नि योग्य वर्णनपर असेच वाटतील. ते लिहितात, "विविध तऱ्हेची माहिती शास्त्रशुद्ध रीतीनें मांडण्यांत कुशल असलेली त्यांची लेखणी निबंध लिहितांना अधिकच आल्हाददायक व मनोरम अशी पद्धत स्वीकारते. रसदार उपमांची योजना करण्यांत त्याची चतुराई नेहमींचीच; पण या समर्पक उपमांची कोण बहारीची लयलूट निबंधांत आढळते! या निबंधांची सुरवात जशी चित्ताकर्षक, तसाच त्यांचा शेवटहि नाट्यपूर्ण असतो; त्यांतील विषयमांडणी जशी सुबोध व उत्कंठावर्धक, तशीच त्यांची भाषाहि प्रौढ, संथ व ओघवती अशी आढळते. त्यांत चमचमणारी सूक्ष्म कुशाग्रतेची, स्वयंभू रसिकतेची व हळुवार सहृदयतेची झांक जशी आदरणीय तसाच त्यांचा भारदारस्तपणाहि उद्बोधक असतो. या निबंधाचें एकंदर स्वरूप जसें कलासुंदर आहे. तसेंच त्यात व्यक्त होणारें लेखकाचें व्यक्तिमत्त्वहि रसिक मनावर छाप पाडणारें आहे.

" केळकरांच्या प्रतिभेचा विविधरंगी बहारीचा विलास त्यांच्या निबंधांत पाहावयास सांपडतो. या निबंधांचें सात्त्विक स्वरूप जितकें अंतःकरणाला सुखविणारें आहे, तितकाच त्यांतला बुद्धीचा उत्कर्ष मनावर छाप पाडणारा आहे....त्यांत प्रगट झालेला वृत्तीचा समतोलपणा जसा सुसंस्कृतपणाचा सुंदर आदर्श वाटतो; तसाच मतांतर प्रगट करतांना व्यक्त झालेला वृत्तीचा हलुवार सावधपणाहि विकासित मनाचें मनोहर दर्शन देतो. त्यांत जसें गांभीर्य आहे तसा खेळकरपणाहि कमी नाहीं. विद्वत्व असलें तरी जडत्व नाहीं; पांडित्य-प्रदर्शनाचा जसा सासुरवास नाहीं तसाच अस्पष्ट विचारसरणीचा गोंधळ नाहीं. त्यांत उज्ज्वल ज्ञानाचें जसें तेज फांकलेलें दिसतें; तसेंच नर्म विनोदाचे कोंवळे किरणहि आढळतात. त्यांत बुद्धीची आक्रमणशीलता जशी दिसते; तसे रसिकतेचे गार झिरपेहि आढळतात. गाढ विद्वत्तेनें कोमल सौंदर्यदृष्टीला बाध आल्याचें त्यांत आढळणार नाहीं...जीवनविषयक वाटणारी आस्था व आनंद साध्या सोज्ज्वल उपमा-दृष्टान्तांत निरखितां येईल; तर सुसंस्कृत, सज्जनमनाचें सुंदर दर्शन दोषदिग्दर्शनाच्या हलुवार पद्धतींत घडेल. त्यांत एकांगीपणा आढळणार नाहीं, तसाच अनुदारपणाहि दिसणार नाहीं. निर्दयता दिसणार नाहीं, तशीच आंधळी स्तुतिहि सांपडणार नाहीं. स्वतंत्र प्रज्ञेची त्यांत जशी चमक आहे, तसा प्रौढ गांभीर्याचा रुबाबदारपणाहि सांपडेल. विचार व भावना यांच्यांत तालबद्धता साभाळण्याचें कसब जसें ठळकपणें दिसतें, तसेंच या सर्व गुणसंभारांत प्रतिबिंबित झालेलें लेखकांचें महनीय व्यक्तित्त्वहि दरारा व आदर उत्पन्न करणारें आहे."

प्रासंगिक विषयांतील चिरकालीन बाजू हुडकून काढून ती मांडण्याची कला, उज्ज्वल कल्पकता, उपमा-दृष्टांतांचा पाऊस, सुंदर परिवेषांत मिरविण्याची त्यांच्या विद्वत्तेला असलेली हौस, बहुमोल विचारांच्या अमृतघटांचें वैपुल्य, रेखीव व सुभग रचना, आकर्षक मथळे इत्यादि गुणांनीं युक्त असे खालील कांहीं निबंध व लेख मोठे अभ्यसनीय वाटतील. १ ज्ञानाचीं सदावर्तें, २ दिल्लीचा बादशाही दरबार, ३ हिंदुस्थानची प्राचीन संस्कृति, ४ काव्यदृष्टि ५ स्वदेशीकडे व्यावहारिक दृष्टि द्या, ६ भविष्यकथन, ७ संस्कृत विद्येचें पुनरुज्जीवन, ८ क्रांतिकारकांचें विश्वरूपदर्शन, ९ आमचे स्वराज्यद्रोही छत्रपति १० माधवराव बोडसांचें बोडण, ११ युद्धमीमांसा, १२ रानडे, गोखले, नौरोजी, मोक्षमुल्लर व विवेकानंद वगैरेंचे मृत्युलेख, १३ ऐतिहासिक लेखसंग्रह,

कौटिलीय अर्थशास्त्र, वैद्यांचीं रामायण व महाभारतांवरील पुस्तकें व कोल्हट-करांचें मतिविकार या पुस्तकांचीं परीक्षणें व १४ अनेक पुस्तकांना लिहिलेल्या प्रस्तावना इत्यादि इत्यादि.

**नाटककार**—केळकरांनीं तोतयाचें बंड, चंद्रगुप्त, कृष्णार्जुनयुद्ध, अमात्य-माधव, वीरविडंबन, संत भानुदास, सरोजिनी व नवरदेवाची जोडगोळी अशीं एकंदर आठ नाटकें लिहिली. यांपैकीं शेवटचीं दोन केवळ भाषांतरात्मक आहेत. बाकीचीं नाटकें अभिजात वाङ्मयाच्या दृष्टीनें निःसंशय वरच्या दर्जाचीं आहेत. प्रा. वि. पां. दांडेकर लिहितात, " शंभर किंवा दोनशें वर्षांनीं केळकरांच्या नाटकांचें काय होईल हा मुद्दा काळावर सोपविला तरी सामान्य-पणें वाङ्मयाची जी अमरत्वाची तत्त्वें ठरली आहेत, तीं लावून आपणांला त्यांच्या नाटकाचें स्थान व योग्यता ठरवितां येईल. संत भानुदासाखेरीज केळकरांचीं सर्व नाटकें अभिजात वाङ्मयाच्या सदरांत घालायला कांहींच हरकत नाहीं. तोतयाचें बंड, चंद्रगुप्त व कृष्णार्जुनयुद्ध हीं तीन नाटकें वाङ्मयांत ध्रुवपद मिळविण्याच्या योग्यतेचीं आहेत. मराठी नाट्य-वाङ्मयांत तर या नाटकांना आपणांला पहिल्या वर्गांत निःशंकपणें घालतां येईल."

तोतयाचें बंड या नाटकासंबंधीं गु. प्रा. पोतदार म्हणतात, " तोतयाचें बंड हें ऐतिहासिक नाटकच त्यांच्या नाट्यापत्यांत अग्रमान मिळवील. येथें इति-हासाला साहित्याच्या कोंदणांत बसविल्यानें मोठा सुढाळपणा आलेला आहे. एक हात इतिहासाचा आणि दुसरा हात साहित्याचा अशा दोन्ही हातांनीं वाढल्यामुळें वाचकांस पोट भरून रसास्वाद या नाटकांत मिळतो."

" मराठी नाट्यवाङ्मयाला अभिमान वाटावा असाच 'तोतयाचें बंड' या प्रमाणसुंदर ललितकृतींतल्या नाट्यकलेचा प्रसन्न विलास आहे...केळ-करांचीं इतर सर्व नाटकें जरी नष्ट झालीं तरी एकटें तोतयाचें बंड त्यांच्या नाट्यकलेची थोरवी जाहीर करावयास पुरेसें आहे...हें नाटक महाराष्ट्र नाट्य-वाङ्मयाचा एक उज्ज्वल अलंकार आहे." असा अभिप्राय प्रा. देशपांडे यांनीं नमूद केलेला आहे.

विषयाची निवड, रचना-कौशल्य, मनोवेधक स्वभावलेखन, प्रवेशांची मार्मिक योजना, संवाद-कौशल्य, मार्मिक-सालंकृत-प्रासादिक-व्यावहारिक व पात्रानुरूप अशी रसदार भाषाशैली, परिस्थितिनिर्मित व सदभिरुचीच्या

अंकुशाखालीं वावरणारा सुसंस्कृत विनोद, उज्ज्वल व कर्तृत्वसंपन्न स्त्रीपात्रें आणि अप्रत्यक्ष उपदेश इत्यादि गुणांनीं केळकरांची नाट्यसृष्टि स्वतःसिद्ध, स्वयंपूर्ण नि अमर झालेली आहे यांत शंकाच नाहीं.

**चरित्रकार**—इटॅलियन देशभक्त गॅरिबॉल्डी, आयर्लंडच्या इतिहासांतील चरित्रमाला, लो. टिळकांचें चरित्र व फ्रान्सची झांशीवाली या चरित्रात्मक लिखाणांनीं केळकरांना चरित्रकार म्हणून बहुमानाचे स्थान प्राप्त करून दिलेलें आहे. देशोद्धारार्थच लेखणी आणि वाणी झिजविणाऱ्या या देशभक्त लेखकाला स्वबांधवांना स्फूर्ति देण्यासाठीं जगद्वंद्य नि तेजस्वी पुरुषाचीं चरित्रें लिहावींशी वाटलीं हें साहजिकच होय. त्यांच्या अपेक्षेप्रमाणें त्यांचें हें चरित्रलिखाण गोड, सात्त्विक, पुष्टिदायक नि स्फूर्तिप्रद असेंच झालेलें आहे.

"चरित्रग्रंथ कलेची खुलावट देऊन लिहिला पाहिजे. ललितकलाकृति वाचतांना वाचकांच्या अंतःकरणांत जसे आनंदाचे किरण प्रकाशूं लागतात, तसे चरित्र-वाचनानेंहि प्रकाशले पाहिजेत. चरित्रनायकाच्या छोटया छोटया आख्यायिका घालून त्याचें स्वभावचित्र जिवंत, चालतें-बोलतें व वास्तव केलें पाहिजे. त्यांत भडकपणामुळें निर्माण होणाऱ्या एकांगीपणालाहि मज्जाव केला पाहिजे. गुणांबरोबर अवगुणांचेंहि निःशंक दिग्दर्शन करून चरित्रनायक हा आपल्यासारखाच चुका करणारा मानव आहे अशी भावना वाचकांच्या मनात उत्पन्न झाली पाहिजे." इत्यादि कसोटीच्या दृष्टीनें पाहिल्यास केळकरांचें चरित्रात्मक लिखाण मोहक व गुणसंपन्नच म्हणावें लागेल.

प्रा. देशपांडे म्हणतात कीं, सत्यनिष्ठा व चिकित्सा या दृष्टीनें हीं चरित्रें सरस व निर्दोष आहेत. कुठेंहि अंधभक्तीला बळी पडून सत्यापलाप केलेला नाहीं...या चरित्रग्रंथांत प्रगट झालेली विद्वत्ता, ज्ञानलालसा, कुतूहलबुद्धि हीं सर्व आदरणीय आहेत. त्यासाठीं वापरलेली भाषा समर्पक, भारदस्त व तेजस्वी आहे.

**कादंबरीकार**–अमर्याद लेखनाची हौस असलेले केळकर नि त्यांनीं एकहि कादंबरी कशी लिहिली नाहीं असें केळकरांच्या चहात्यांना मोठें कोडें वाटे! तें नाहींसें करण्यासाठींच जणूं कांहीं केळकरांनीं वयाची साठी उलटून गेल्या-वर म्हणजे १९३४ सालीं आपली 'नवलपूरचा संस्थानिक' ही पहिली कादंबरी लिहिली. ही कादंबरी विधायक स्वरूपाची, राजकारणविषयक नि विचारप्रवर्तक

अशी आहे. डौलदार भाषा, मनमोहक कथासूत्र आणि विस्मयकारक घटना यांमुळें ही मोठी वाचनीय वाटते. त्यांची दुसरी कादंबरी बलिदान. वेधक व नाटयपूर्ण कथानक, नाविन्यपूर्ण उपमा व सुभाषितांची नवलाईची पखरण यांमुळें ही कादंबरी चित्तवेधक झालेली आहे. दर्यावर्दी जीवनावर व त्या जीवनांतील रोमांचकारी प्रसंगावर आधारलेली अशी त्यांची अपुरी नि अप्रसिद्ध असलेली तिसरी कादंबरी म्हणजे कोंकणचा पोर ही होय. कथानक, भाषा, अद्भुत घटना, विचारप्रवर्तन या दृष्टीनें या कादंबऱ्या जरी उत्कृष्ट असल्या तरी स्वभावलेखनाचा अभाव व संवादविषयक व्यंग यांमुळें या पहिल्या दर्जाच्या ललितकृति नाहींत असा टीकाकारांचा अभिप्राय आहे.

**इतिहासकार**—इतिहासाचे आस्थेवाईक व्यासंगी नि त्याची उपजत गोडी असलेले रसिक म्हणून केळकर महाराष्ट्रांत सुप्रसिद्ध आहेत. राजकारणाच्या धकाधकींत आपलें कार्यबाहुल्य सांभाळून हौसेखातर त्यांनीं मोठें गुणसंपन्न लिखाण याहि क्षेत्रांत करून आपली प्रचंड उरकशक्ति सिद्ध केलेली आहे. हें लिखाण लिहून आजच्या स्थितींतहि " इतिहासाच्या उच्च पर्वतावर मधून मधून चढून तेथील ताजी हवा पोटांत घेऊन " त्यांनीं आपलें मानसिक आरोग्य जसें राखलें तसेंच दुसऱ्यासहि तें राखण्याविषयीं प्रोत्साहन दिलें आहे. त्यांनीं आयर्लंडचा इतिहास, मराठे व इंग्रज, फ्रेंच राज्यक्रांतीचा इतिहास व इतिहासविहार हे ग्रंथ निर्माण करून महाराष्ट्राच्या ऐतिहासिक वाङ्मयांत बहुमोलाची भर घातलेली आहे यांत शंकाच नाहीं. याशिवाय अध्यक्ष म्हणून, वक्ते म्हणून, इतिहासमंडळाचे कार्यकर्ते म्हणून, शिवचरित्र कार्यालयाचे उत्पादक म्हणून ऐतिहासिक ग्रंथांचे परीक्षण-लेखक म्हणून त्यांनीं या क्षेत्रांत किती तरी कामगिरी केली आहे. चिकित्साबुद्धि, समतोलपणा, सत्यनिष्ठा, न्यायबुद्धि, आकर्षक भाषाशैली व विषयासंबंधीं भक्ति या गुणांमुळें केळकरांनीं महाराष्ट्राच्या इतिहासकारांमध्येंहि मानाचें नि मोठें उच्च दर्जाचें स्थान प्राप्त करून घेतलें आहे यांत शंकाच नाहीं.

**लघुकथा-लेखक**—इतिहासासारख्या गंभीर विषयाची मनोरंजकपणें चर्चा करणारे केळकर मनोरंजनासाठींच असलेल्या लघुकथा मोठ्या हौशीपणानें लिहितात यांत नवल वाटण्यासारखें असें कांहीं नाहीं. केळकरांच्या सुमारें २५ लघुकथा आहेत. त्यांपैकीं पुढील कथा विशेष उल्लेखनीय आहेत.

शेवटचें लढाऊ जहाज, वेताळाचा घाट, मुरलीधर कीं गारुडी, हिंस्र वाघांचा सरकारकडे अर्ज, सावकाराला सुट्टी, शारदेची आकाशवाणी, दुधाची धार अथवा गुप्तदान, शृगालसंमेलन, माझी आगगाडी कशी चुकली, इ. इ. केळकरांच्या लघुकथांमध्यें कलेच्या दृष्टीनें सैलपणा व वर्णनाचा पाल्हाळ असला तरी प्रसन्न भाषा, मनोरंजन, विषयवैचित्र्य, खोंचदारपणा नि विनोदलहरी या गुणांमुळें त्या मोठ्या संतोषदायक नि मनोरम वाटतात.

**कवि**--करमणूक म्हणून, हौस म्हणून केळकरांनीं कविताहि लिहिली आहे. नाहीं म्हटल्या तरी त्या कवितेच्या २००० ओळी सहज भरतील. त्यांत ओंव्या, आर्या, साक्या, पदें, भूपाळ्या, फटके, गज्जल व श्लोक वगैरे विविध प्रकार आहेत. त्यांच्या खालील कांहीं कवितांचीं नांवें प्रामुख्यानें उल्लेखिण्यासारखीं आहेत. 'रचिसि केशभूषा' दिव्यमोटार, सागर व नौका, वेषभूषा, आवडता फकीर, कांटेरी गुलाब व 'झिम् झिम् झिम् पर्जन्य पडे' इ. इ. केळकरांच्या कवितांमधून भावनांचा खळखळाट जरी नसला तरी सुविचार, सोज्ज्वळ आल्हाददायक-सोपी व प्रसन्न भाषा, गोडस व चतुर वर्णनें, विनोद, सुंदर व सरस कल्पनांचा मनोरम विलास आणि सदभिरुचीची धवलता यांमुळें त्या कविता रसिकांना आनंददायक नि आल्हादजनक खास वाटतात. प्रा. मायदेव म्हणतात, "तात्पर्य, हौस म्हणून, मनोविनोदन म्हणून तात्यांनीं कविता लिहिली; त्याचा त्यांस एवढा व्यासंग ठेवतां आला नाहीं. इतर कामांचे हिमालयाचे ढीग त्यांनीं उठवले आहेत...गद्यलेखनांत त्यांच्याइतका अष्टपैलु रसिक व सफाईदार लेखक नाहीं. वाङ्मयाच्या रणक्षेत्रावर शत्रूकडून सुद्धां ज्यांनीं 'साहित्यचंद्र' ही पदवी मिळविली त्यांना उत्तम कविता लिहितां आल्या नसत्या असें कोण म्हणेल ! या बाबतींत त्यांची कृति सर्वगुणसंपन्न निर्माण झाली नाहीं, तरी त्यांच्या सुकीर्तीला ती यत्किंचितही कमीपणा आणणारी नाहीं."

**आत्मचरित्रकार**-गतगोष्टी अर्थात्'माझी जीवन-यात्रा हा हजार पानांचा भरदार ग्रंथ लिहून मराठींतील आत्मचरित्रपर वाङ्मयांत केळकरांनीं फार मोलाची भर घातली आहे यांत शंकाच नाहीं. हा वाङ्मयप्रकार एकूण कठीण व अवघड तर खराच. कारण यांत आत्मस्तुतीचा जसा दोष माथीं येण्याची शक्यता तशीच गुणांचा उल्लेख टाळल्यास असत्य लिहिण्याचें पातकहि लागण्याची शक्यता ! तरीपण व्यक्तीच्या अंतर्यामावर झगझगीत प्रकाश पाडून

तिची पूर्ण योग्यता पटविणारा या प्रकाराशिवाय दुसरा वाङ्मयप्रकार सांपडणें कठीणच होय. केळकरांच्या आत्मचरित्रांत महाराष्ट्राचा गेल्या अर्धशतकाचा राजकीय, सामाजिक, शैक्षणिक, बौद्धिक व धार्मिक इतिहास मनोरम भाषेंत वाचावयास मिळतो. त्याचप्रमाणें त्यांच्या जीवनांतील भावमधुर रम्य आठवणी, नवलपूर्ण घडामोडी व त्यांची ती नितांतश्रेष्ठ नि हेवा वाटावयास लावणारी समाधानाची वृत्तिहि पहावयास मिळते. गतगोष्टी वाचून केळकरांचा कट्टा निंदकहि त्यांच्यासंबंधीं आदर बाळगूं लागेल असें निश्चित म्हणावेंसें वाटतें. पण तो निंदक धंदेवाईक नसून प्रामाणिक मात्र असला पाहिजे. !

संपादक म्हणून त्यांनीं केलेली प्रचंड कामगिरी आपण मागें 'संपादकांचा राजा' या प्रकरणांत पाहिलीच आहे. त्याशिवाय 'राज्यशास्त्र', 'भारतीय तत्त्वज्ञान' व 'हास्यविनोदमीमांसा' यांत दिसून येणारे तत्त्वमीमांसक, तरुणांना उत्तेजन देऊन त्यांच्या कृतींचें कौतुक करण्यासाठीं ५०-६० प्रस्तावना लिहिणारे प्रस्तावनाकार, आणि रसज्ञ, गुणग्राही नि निर्मळ टीकाकार व न्यायी आणि मार्गदर्शक ग्रंथपरीक्षक या केळकरांच्या विविध भूमिका इतक्या श्रेष्ठ आहेत कीं, या सर्व क्षेत्रांत ते आदर्शच गणले जातात.

**लेखनशैली**—" जसा मनुष्य, तशी त्याची लेखनशैली " असें एक सुभाषित रूढ आहे. त्यांतील मर्म एवढेंच कीं, भाषाशैलींत लेखकाचें व्यक्तित्व हुबेहूब प्रतिबिंबित होतें. हें जर खरें तर, केळकरांच्या लेखनशैलीवर त्यांच्या परिस्थितीचा, भावनांचा आणि स्वभावाचा निश्चित परिणाम झालेला दिसतो. केळकर हे पट्टीचे संपादक. तेव्हां संपादकीय जीवनांतील कांहीं अनुभवांच्या छटा व परिस्थितीचे पडसाद हे भाषाशैलीवर उमटायचेच. संपादकाला मजकुराचा ताजेपणा, मांडणीचा चमकदारपणा आणि विचारांची उकल या गोष्टींची फारच जरूरी. आणि वर्षानुवर्षें हें करीत राहिल्यास हा शैलीचाच एक भाग कां न व्हावा ? वृत्तपत्रांतून लोकानुनय करण्यासाठीं योग्य, सात्त्विक, औचित्यपूर्ण, शिष्ट नि सुसंस्कृत लिहावें लागतें. तें युक्तिवादावर, बुद्धिवादावर आधारल्याशिवाय बुद्धीची पकड घेऊं शकणार नाहीं. योग्य शब्दांची निवड, वाक्यांची भरदार रचना नि प्रसादपूर्ण भाषा याशिवाय कोणताहि मुद्दा वाचकांपुढें मांडून त्यांच्या मनाला योग्य वळण लावतां येणार नाहीं; आणि लोकमत

बनवणें हें केसरीकारांचें ब्रीद असल्यामुळें वरील सर्व गुणांबरोबर बुद्धिरंजना-साठीं उपमा, दृष्टांत, उपरोध, उपहास, इत्यादींचा जसा त्यांच्या शैलीला आश्रय करावा लागला, तसाच चौरसपणा, प्रौढपणा, शांतपणा, समतोलपणा इत्यादि गुणसंभारहि तिला अंगीं आणावा लागला. याच्याच जोडीला केळकरां-च्या स्वभावांतील न्यायीपणा, सौंदर्यासक्ति, आनंदीवृत्ति, प्रांजलपणा, भाविकता निर्भयता, औचित्य, विचारसंपन्नता आणि कल्पकता इत्यादि गुणांचा जिवंत नि दुथडी वाहणारा प्रवाह जेव्हा वरील संपन्न शैलींत मिसळला तेव्हां त्याच्या एकूण शैलीचें रूप केवळ गंगौघाप्रमाणें शांत, विस्तृत, भव्य, उपकारक, निर्मळ, उत्साहवर्धक नि पावन व्हावें यात नवल। तें काय ? भावनांची उत्कटता नसतांहि केवळ शैलीच्या तेजावर लोकप्रियता संपादन करणारे महान् कर्तृत्वाचे लेखक म्हणूनच केळकरांचा गौरव होत राहील यात कांहीच शंका नाही.

वेधक वर्णनशैली असलेल्या केळकरांच्या या खानदानी भाषाशैलीसंबंधीं श्री. माडखोलकर लिहितात कीं, " कोणतीहि कल्पना सूचित किंवा विशद करतांना उपमा, दृष्टांत, विशेषणें, उपवाक्यें किंवा अर्थान्तरन्यास यांचा उप-योग केळकर इतक्या कुशलतेनें करितात कीं, त्यांचें वाक्य वाचल्याबरोबर त्या कल्पनेचीं सारीं अंगें-प्रत्यंगें डोळयांपुढें उभी राहतात; इतकी बहुर्थ भाषा लिहिणारा लेखक महाराष्ट्रांत दुसरा क्वचितच सांपडेल...विचारांच्या काय किंवा भाषेच्या काय, दृष्टीनें त्यांच्या इतकें समृद्ध वाङ्मय महाराष्ट्रांत दुसऱ्या कोणत्याहि लेखकानें निर्माण केलेलें नाहीं."

'सदाभिरुचि, औचित्य व बुद्धिस्वातंत्र्य' हे तीन गुण शिरोधार्य मानणाऱ्या केळकरांच्या शैलीबद्दल प्रा. मा. का. देशपांडे म्हणतात कीं, " केळकराप्रमाणें बर्क, कार्लाईल, मेकॉले यांनीं राजकीय विषयावर लेखणी चालविली...पण केळकरांच्या भाषेत जो आदरणीय संयम दिसतो तो या तिन्ही लेखकांच्या लेखणींत आढळत नाहीं.......( केळकरांची तुलना पाश्चात्य ग्रंथकारांबरोबर केल्यामुळें टीका करणाऱ्या ) विचित्र टीकाकारांची समजूत घालण्याच्या भरीस न पडता मी अभिमानानें असें म्हणतों कीं, केळकरांच्या इतके बहुश्रुत, परिणतप्रज्ञ अष्टपैलू बुद्धीचे ग्रंथकार कोणत्याहि स्वतंत्र राष्ट्रांत हाताच्या बोटावर मोजण्याइतकेच असणार !"

**कीर्ति आणि संपत्तिः**—अशा प्रकारचें गुणसंपन्न नि उच्च दर्जाचें वाङ्मय केळकरांनीं लिहिलें तरी किती पाहा! त्यांच्या या वाङ्मय-भांडाराची मोजदाद

१९३८ सालीं करण्यांत आली तेव्हां तें १२०५० पृष्ठें भरलें! त्याचे १२ खंड करून तें 'समग्र केळकर-वाङ्मय' या नांवानें प्रसिद्ध करण्यांत आलें. केळकर मिरजेचे म्हणून केळकरांसंबंधींचा आदर नि लोभ दाखविण्यासाठीं मिरजेच्या हल्लींच्या श्रीमंतांनीं तें छापण्यासाठीं भांडवल पुरविलें. या त्यांच्या उदार कृतीमुळें एवढें समृद्ध वाङ्मय महाराष्ट्राला एकत्रित वाचण्याची दुर्मिळ संधि लाभली नि कोणत्याहि लेखकाला लाभला नाहीं असा अपूर्व मान केळकरांना मिळून त्यांचें सम्राट्पद सिद्ध झालें!

कीर्तीबरोबर पैसाहि त्यांना बरा मिळाला. निदान त्यांना कृतज्ञता वाटण्या इतकी तरी मिळाल्याचें तेच सांगतात. ते लिहितात, "...पुढील १९-२० वर्षांत वाङ्मयानें मला सुमारें ३० हजार रुपयांची प्राप्ति करून दिली. अद्यापि महाराष्ट्रांत केवळ वाङ्मयावर उपजीविका करणें अशक्य किंवा निदान फार कठीण आहे, म्हणून अशा स्थितींत झालेल्या या द्रव्यलाभाबद्दल मला कृतज्ञताच वाटली पाहिजे." आणि या वाटणाऱ्या कृतज्ञतेची म्हणजेच उपकाराची फेड करण्याची केळकरी उदात्त रीत तितकीच अपूर्व आहे. त्यांनीं यांतील ८००० रु. भावी महाराष्ट्र युनिव्हर्सिटीच्या नांवानें १९३२ सालींच भारत इतिहास संशोधक मंडळाच्या पांच दराच्या कर्जरोख्यांत गुंतविले असून येणाऱ्या व्याजांतून मराठी वाङ्मयाच्या अभिवृद्धीकरितां शिष्यवृत्ति, पारितोषिक, सुवर्णपदक वा ग्रंथप्रसिद्धीला मदत यांपैकीं कोणत्या तरी एखाद्या बाबीवर दरसाल खर्च केला जातो. आपल्या वडील-मातोश्रींच्या नांवानें म्हणजे 'यशोदा-चिंतामणी विश्वस्त निधी' या नांवानें ही रक्कम बाजूला काढून ठेवून त्यांनीं त्यावरील स्वत्वनिवृत्ति केली आहे. याशिवाय कुटुंबाच्या नांवानें १००० रु. गोरक्षण संस्थेला व १००० रु. महिला विद्यापीठाला दिले ते निराळेच!

या शांत, गंभीर, अफाट नि विस्तीर्ण वाङ्मयसागरानें केळकरांना कीर्तीचीं नि धनाचीं तेजाळ मोत्यें दिलीं हें जसें त्यांना अभिमानाचें नि भूषणभूत आहे त्यापेक्षांहि या सागरावर पर्यटण करणाऱ्या हौशी, रसिक व ज्ञानी वाङ्मय-सेवकांनीं या सागराचें गांभीर्य, सौंदर्य नि विशालत्व प्रत्यक्ष अनुभवून जे धन्यवाद दिले आहेत त्यांचें मोल कांहीं विशेषच मानावें लागेल. महाराष्ट्रांतील सर्व पक्षांच्या व मतांच्या मान्यवर अशा ४० प्रमुख साहित्य-संस्थांनीं आणि नामवंत अशा ८० वाङ्मयप्रभूंनीं एकसष्टीच्या महोत्सवप्रसंगीं केळकरांना जें मानपत्र अर्पण केलें, या साहित्यसम्राटाला जो मानाचा मुजरा

केला त्याची किंमत नि महत्त्व शब्दातीत आहे! तें सर्व मानपत्र अभ्यासण्यासारखेंच आहे. पण त्यांतील फक्त कांहीं परिच्छेद आपण पाहूं या.

**मानपत्रः**—"...इ. स. १८९४ पासून तों आजपर्यंतची आपली वाङ्मयात्मक कामगिरी सर्वश्रुत व सर्वसंमत आहे. या दीर्घकालांतील आपला वाङ्मयप्रपंच विस्तृत, विविध व बहुरंग आहे. यांत आपली विद्वत्ता, व्यासंग, लेखनकौशल्य, बुद्धिस्वातंत्र्य व विचारवैशिष्टय हीं दिसून येतात. सात्त्विकपणा, उदात्तपणा, रंजकता, बोधपरता व ज्ञानसंग्रहता हे अभिजात वाङ्मयाचे प्रधानगुण आपण निर्मिलेल्या वाङ्मयांत चहूंकडे दृष्टीस पडतात. हें वाङ्मय स्फूर्तिदायक, विचारप्रवर्तक, ज्ञानसंवर्धक, आनंददायक आणि म्हणूनच आदर्शभूत आहे. तें निरंतर टिकणारें व उपकारक आहे.

"आपण वाङ्मयाच्या कोणत्याहि शाखेंत निर्भयपणें संचार करतां हा आपल्या कर्तृत्वाचा अनन्यसाधारण विशेष आहे....तशीच आपली रसनाहि अनेक वाङ्मयविषयांचा परामर्श घेण्यास समर्थ आहे. लेखणी व रसना हीं आयुधें कुशलतेनें योजणारे आपल्यासारखे सव्यसाची वाङ्मयवीर फार विरळे

"सुंदर कल्पना, प्रतिभेची चमक, चमत्कृतिजनकता, व सभ्य विनोद हे वाङ्मयाचा उत्कर्ष करणारे गुण आपल्यांत सहजात आहेत. सदभिरुचि व औचित्य हा आपल्या वाङ्मयाचा एक विशेष आहे....अभिनव कल्पनांनीं, मनोहर अलंकारांनीं व सुभाषित विनोदानें नटलेल्या आपल्या वाणीमुळें आपला कोणताहि लेख सरस, रमणीय व उद्‌बोधक वाटतो.

"मराठी वाङ्मयांतील टीकेचें दालन पूर्वीं फार संकुचित व एकदेशीय होतें. तें विशेषतः आपण विस्तृत व सर्वांगपरामर्शी केलें. आपले टीकालेख भारदस्त, समतोल, माहितीनें भरलेले व ग्रंथकारास व लेखकास प्रोत्साहक असतात....

"...एवढेंच आपलें लिखाण कोणीं वाचलें तरी त्यावरून सुद्धां आपल्या बहुश्रुतपणाची, विद्वत्तेची, लेखनकुशलतेची, रसिकतेची व सहृदयत्वाची एकदम ओळख पटल्याशिवाय राहणार नाहीं. अर्थशास्त्र, हुंडणावळ, सुवर्णचलन, शुद्धलेखन, छन्दोरचना अशांसारखे स्वभावतः रुक्ष व दुर्बोध विषयसुद्धां आपल्या सरस लेखणीनें सुगम व मनोरम करून सोडले आहेत."

"श्रीसरस्वतीची दिव्य उपासना आपण जातीनें केली इतकेंच नव्हे, तर महाराष्ट्र-भाषाभिवृद्धीसाठीं जे जे प्रयत्न झाले आणि ज्या ज्या संस्था स्थापण्यांत आल्या त्यांना आपण 'केसरी'द्वारा व इतर रीतीनें अनेक प्रकारचें बहुमोल सहाय्य दिलेलें आहे, हेंहि कृतज्ञतापूर्वक येथें नमूद करणें आमचें कर्तव्य होय. सारांश, आपली वाङ्मयसेवा सर्वांगीण व सर्वमान्य आहे..."

असें हें रसरसलेलें मानपत्र आहे. यावर अनेक थोर साहित्यिकांबरोबर ३५ अशा लोकमान्य संपादकांच्याहि स्वाक्षऱ्या आहेत. सह्या करणाऱ्यांपैकीं पुढील नांवें केवढीं मोठीं व वंदनीय आहेत पाहा. चिंतामणराव वैद्य, वा. म. जोशी, श्री. कृ. कोल्हटकर, कृ. प्र. खाडिलकर, काणे, सरदेसाई, पोतदार, नानासाहेब शिंदे, खांडेकर, यशवंत, वै. का. राजवाडे, य. रा. दाते, चिं. ग. कर्वे, द. वि. आपटे, पांगारकर इ. इ. या नांवांवरून जवाहिऱ्यांनीं जवाहिराची पारख केलेली आहे व वाङ्मयवीरांनीं हें वीरपूजन केलेलें आहे हें ध्यानांत येतें व त्यामुळें या मानपत्राचें मोल अधिकच वाढते, नाहीं !

खुद्द केळकरांनी म्हटलें आहे कीं," माझ्या जीवनांत साहित्यप्रेमी लोकांचा संबंध राजकारणप्रेमी लोकांपेक्षां अधिक आला आहे. यामुळें त्यांनीं दिलेल्या (वरील) मानपत्राचा खरोखरच मला फार अभिमान वाटतो." आपण एवढेंच म्हणूं या कीं, या थोर भाग्याचा अवघा महाराष्ट्र अभिमानी आहे. एवढेंच काय पण भावी महाराष्ट्रसुद्धां या यशोगानांत सामील होऊन या साहित्यसम्राटाचा जयजयकार करील यांत कोणालाच शंका नाहीं.

---

## प्रकरण १० वें

# ज्ञानशील कर्मयोगी

**"...पण 'केसरी' चें क्षेत्र अपुरें पडल्यासारखें वाटूनच जणूं कांहीं केळकरांनीं आपल्या कर्तृत्वाचा प्रवाह इतरहि अनेक कार्यक्षेत्रांतून खेळवून, महाराष्ट्राचें राष्ट्रीय जीवन सर्व बाजूंनीं समृद्ध केलें....महाराष्ट्रांतील प्रायः सर्व चळवळींचे ते आधार आणि समाजाचे जवळजवळ सर्व कामांतील ते सल्लागार आहेत."**

—श्री. ग. त्र्यं. माडखोलकर

व-हाडचे प्रसिद्ध पुढारी श्री. बाबासाहेब खापर्डे यांचें टिळक-स्मारक-मंदिरांत लोकमान्यांसंबंधीं एकदां व्याख्यान होतें. त्यांनीं श्रोत्यांना एक मोठा गमतीचा प्रश्न विचारला. तो प्रश्न असा कीं, लो. टिळकाच्या चरित्राचें सार एका शब्दांत सांगा. अर्थात् या प्रश्नाचें उत्तर त्यांनींच दिलें. तें उत्तर म्हणजे 'लढा.' प्रतिकूल परिस्थितीशीं अखंडपणें लढण्यांत सर्व जीवन खर्च करणाऱ्या लोकमान्यांचें हें चरित्रसार अचूकच म्हणावें लागेल. तसेंच केळकर-चरित्राचें सारहि असेंच एका शब्दांत सांगतां येईल. आणि तें म्हणजे 'उद्योग.' सततोद्योग, अखंड उद्योग, उद्यमशीलता हेंच त्यांच्या यशाचें मर्म कोणालाहि मान्य करावें लागेल. सदैव कर्म करीत राहणें आणि तें कर्म, तो उद्योग ज्ञानाधिष्ठित असणें व तसाच लोकोपकारी असणें हेंच जीवनसार आपण केळकर-चरित्रांत जर पाहतों तर त्यांना ज्ञानशील कर्मयोगी कां न म्हणावें ?

ते जसे जबरे व्यासंगी व उद्योगी आहेत तसेच ते श्रेष्ठप्रतीचे ज्ञानीहि आहेत. स्वतःच्या उद्योगासंबंधीं ते काय लिहितात पाहा. ते म्हणतात कीं, " मी जर आळशी असतों तर माझ्या हातून इतकें वाङ्मय लिहून झालेंच नसतें. आणि बहुतेक वाङ्मय केसरी-मराठा पत्राचें व संस्थेचें काम आणि इतर दगदगीचे व्यवसाय साभाळून उरल्या-फावल्या वेळेंतच लिहिलेलें आहे. माझ्या बरोबरीच्या लोकांपेक्षां माझ्यामध्यें कामाचा उरक हा गुण तरी अधिक आहे असें मी विनयानें पण अभिमानानें म्हणूं शकेन. इतक्या निरनिराळ्या संस्थांचे उद्योग व कार्यें मीं केलीं तीं मी खरोखरच स्वास्थ्यप्रिय असतों तर माझ्या हातून पार पडली नसतीं."

बहुशाखी, अनंत नि हजार व्यवसाय उरकणाऱ्या केळकरांचें मन मोठें ज्ञानलोभी आहे. सतत नवीन नवीन वाचावें, मनन करावें व लिहून ज्ञान पेरीत जावें हें तर आज ५० वर्षें चाललें आहे. श्री. दिवेकर 'स्वभाव-चित्रांत' लिहितात कीं, " अजूनहि केव्हां मुंबईस गेले कीं, अनेक कामांपैकीं 'रॉयल एशियाटिक' मध्यें जावयाचें व 'तारापूरवाल्या' कडे जावयाचें हीं दोन खास कामें असावयाचींच. फार काय, कोठेंहि चांगलें पुस्तक वा मासिक दिसलें म्हणजे त्यांनीं आपल्या हँडबॅगमध्यें घालून, घरीं नेऊन वाचलेंच म्हणून खुशाल समजावें." तीन वर्षांपूर्वीं म्हणजे केळकर जेव्हां ७० वर्षांचे होते तेव्हां प्रा. देशपांडे त्यांच्याकडे गेले असतांना केळकर त्यांना म्हणाले, "खरंच! तुम्हांला विचारणार होतों ! शेक्सपियरच्या नाटकांची ठळक मोठ्या टाइपांत

छापलेली एखादी कॉपी मला पाठवाल का ? शेवटीं अवघड शब्दांच्या टीपा असल्यास जास्त बरें ! " उतारवयांत केळकराची केवढी ही ज्ञानलालसा !

आणि हें ज्ञान विविधशाखी आहे. वाङ्मय, राजकारण, समाजकारण, अर्थकारण, इतिहास व मनुष्यस्वभाव या सर्व क्षेत्रांत ते जसे ज्ञाते नि तज्ज्ञ आहेत तसेच ते कलाप्रेमीहि आहेत. संगीतकला नि नाट्यकला या तर त्यांच्या फार आवडत्या कला. उद्यमशीलता, ज्ञानलोभ व कलाप्रेम यांच्याच जोडीला त्यांचे उपजत स्वभावगुण हेहि फार थोर नि उमदे आहेत. सौजन्य, सदभिरुचि, उपकारतत्परता, निरभिमान, मनमोकळेपणा, खेळकर व विनोदी वृत्ति, प्रेमळपणा, चौरसपणा, उरकशक्ति, एकनिष्ठा व बुद्धिस्वातंत्र्य इ. इ. त्यांचे गुण इतके विपुल नि कार्यकारी आहेत की, या वैयक्तिक गुणांमुळेंच ते वैऱ्यांमध्येंहि आदरिले जातात ! त्यागामुळें, आनंदी वृत्तीमुळें, स्तुतिनिंदेला न भाळतां स्वतःची पात्रता ठरविणाऱ्या आत्मविश्वासामुळें व सुवर्णमध्याच्या सामोपचारपद्धतीमुळें त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची छाप ही चिरंतन स्वरूपाचीच राहते.

केळकरांची राहणी तर अगदीं साधी आहे. त्यांचा तो लांब कोट नि ती महाराष्ट्रीय ब्राह्मणी पगडी तर सर्वांच्याच परिचयाची आहे. खांद्यावर छत्री टाकून रस्त्यानें डुलत डुलत चालणारे केळकर अजूनहि पुणेकरांच्या कुतूहलाचा विषय आहेत. उन्हाळ्यांत सदऱ्याशिवाय नुसताच कोट ( अर्थातच बंद गळ्याचा ) घालणें, खिशांत किल्ली न दिल्यामुळें घड्याळ बंद असणें, न भरल्यामुळें अनेक वेळां पेन रिकामें राहणें, एकाच वेळेस दीड कप चहा घेणें व वडिलांच्या श्राद्धतिथीला श्राद्धाच्या ऐवजीं कीर्तन करणें इत्यादि गमतीच्या गोष्टी श्री. दिवेकरांनीं नमूद केलेल्या वाचण्यासारख्या आहेत. लॉईड जॉर्ज आपल्या गांवीं बटाटे लावतात व चर्चिल गवंड्याचें काम करतात असें म्हणतात, त्याचप्रमाणें केळकरांना घरदुरुस्तीचा व बसावयाची जागा इकडून तिकडे वारंवार बदलण्याचा भारी हव्यास ! बरें, हें साधें राहणें सदा सर्वकाळ. बडा पाहुणा आला तरी स्वभावांतील व घरगुती राहणींतील साधेपणा बदलावयाचा नाहीं. आपण होऊन कामाशिवाय दुसऱ्याच्या घरीं जाणार नाहीत. उलट यांची 'पुष्करणी' म्हणजे जणूं काय मुक्तमंदिरच ! कोणींहि यावें पण काम संपल्याबरोबर लगेच निघून जावें हें त्यांना फार आवडतें. कारण वेळ वायां जाऊं देणें किंवा वायफळ गप्पा मारणें हें त्यांना मान्य

नाहीं. एक काम संपलें कीं लगेच दुसरें. या त्यांच्या कार्यमग्नतेचें वर्णन करतांना श्री. बेळवी चेष्टेनें एकदां म्हणाले सुद्धां कीं, “काय तात्यासाहेब, रात्रंदिवस गणपतिबोवासारखे समोर उंदीर (मजकूर टिपण्यासाठीं असलेला चिटणीस) घेऊन बसतां बोवा!”

अखंड आरोग्य ही एक दुर्मिळ देणगीच होय. परमेश्वरानें केळकरांना मात्र ही देणगी अगदीं उदारपणें नि सढळ हातानें दिलेली आहे. दणगट शरीर-प्रकृति त्यांच्या बहुविध कार्यास कशी साहाय्यभूत झाली असेल याची सहज कल्पना करतां येईल. आज ७३ व्या वर्षींहि त्यांची प्रकृति वृद्धांना हेवा वाटण्यासारखीच आहे. सर्व इंद्रियांचीं कार्यें जेथल्या तेथें आणि समाधान-कारक रीतीनें आजहि चाललेलीं पाहून किती म्हणून संतोष वाटतो! त्यांची शरीरकांति, भव्य शरीरयष्टि नि मुद्रेवर व नेत्रांत विलसणारें तें कर्तृत्वाचें तेज अभिमान वाटण्यासारखे आहे. निसर्गदत्त आरोग्याचें केळकरांनीं पहिल्या-पासून किती दक्षतेनें संरक्षण केलें आहे. सदाचारानें वागणें, अभक्ष्य-भक्षण किंवा अपेयपान न करणे, निर्व्यसनी राहणें व सर्व बाबतींत नियमितपणाचें वर्तन ठेवणें या गोष्टींमुळेंच ते सुदृढपणे आरोग्य टिकवूं शकले व आजहि कार्यक्षम राहूं शकले!

निष्कलंक, निर्मळ व पावन चारित्र्य याबाबतींत ते लो० टिळकांचे महान् शिष्य शोभतात. त्या वीरपरंपरेचे ते मोठे भूषणभूत वारस वाटतात यांत शंकाच नाहीं. चारित्र्यानें माणूस आत्मविश्वासू, बेडर व कार्यप्रवण होतो. लोकांचें तो विश्वासस्थान बनतो. असें हें निर्मळ चारित्र्य, गाढ विद्वत्ता, उद्यमशीलता, व्यवहारकुशलता, समतोलपणा, राष्ट्रप्रेम व देशबांधवांविषयी सहानुभूति या गुणसमुच्चयामुळें केळकर हे अखिल भारतीय कीर्तीचे कृति-संपन्न पुढारी व अव्वल दर्जाचे साहित्यसेवक कसे होऊं शकले हें आपण आतांपर्यंत या चरित्रांत पाहिलें आहे.

या पुस्तकांतील चार ते नऊ प्रकरणें पुनः एकदां लक्षांत घ्यावींत. 'लोक-मान्यांचे मातबर सहकारी' 'अधिकाराचा कांटेरी मुगुट' 'संपादकांचा राजा' 'धुरंधर मुत्सद्दी' 'कृतिसंपन्न समाजसेवक' व 'साहित्यसम्राट् केळकर' या प्रकरणांतून केळकरचरित्रमूर्ति साकार करण्याचा प्रयत्न केला आहे. त्या-वरून केळकर कसे दिसतात? त्यांचे या भारताच्या देशसेवक-मालिकेत स्थान कोणतें? याचें उत्तर कांहीं सांपडतें का पाहूं या.

पण केळकरांची थोरवी मला या प्रश्नाच्या बाबतींतच अधिक पटते. कारण त्यांची प्रांजलबुद्धि इतकी न्यायप्रिय आहे की, त्यांचें त्यांनींच या प्रश्नाचें मोठें सुंदर, स्पष्ट नि रोखठोक उत्तर दिलें आहे. तें उत्तर बघण्यापूर्वी त्यांचे कांहीं तात्त्विक विचार लक्षांत घेतले पाहिजेत. ते लिहितात कीं, "अप्रामाणिक मतांनीं कीर्ति मिळविण्याची हांव धरण्यापेक्षां प्रामाणिक कृतीनें कीर्ति मिळेल ती स्वीकारण्याची व तिजवर संतुष्ट राहण्याची मनुष्याची तयारी असेल तर तें त्यांतल्या त्यांत अधिक बरें. एकांतिक मतें बनविणें व वेळीं अवेळीं त्यांचा बेगुमानपणें प्रसार करणें या उपद्व्यापानें मनुष्याला प्रासिद्धि मिळते खरी; **पण नुसतें नांव लोकांच्या तोंडीं राहणें ही खरी कीर्ति नव्हे**; व मनुष्य सात्त्विक व प्रामाणिक असेल तर निव्वळ प्रसिद्धीची म्हणजे कुकीर्तीची चाड त्याला असणार नाहीं." केळकरांची राजकीय विचारसरणी सांगतांना प्रा. देशपांडे म्हणतात कीं, "प्रत्यक्ष कार्याच्या उपक्रमाचे प्रसंगीं कदाचित् स्थल व जाति यांची मर्यादा केव्हां केव्हां अपरिहार्य असेल; परंतु निदान मनानें तरी मनुष्य नेहमी विश्वकुटुंबी असावा, व त्याच्या मनःप्रवृत्तीची अथवा सदिच्छेची लाट या विश्वकुटुंबाच्या अंतिम सीमेपर्यंत पोंचण्याइतकी प्रबळ असावी म्हणजे बहुंशीं क्षुद्र प्रकारचीं कृत्यें करण्यांत माणसाला धन्यता वाटणार नाही, अशी त्यांची राजकीय विचारसरणी आहे."

आतां आत्मनिरीक्षण करून केळकरांनीं स्वमापन जें केलें आहे तें आपण बघूं या. एकदां एक स्नेही केळकरांना म्हणाला, "केळकर, शेंकडों लोक तुमची स्तुति करतात तर शेंकडों लोक तुमची निंदा करतात. मग तुम्ही स्वतः तुमची योग्यता काय समजतां?" केळकर म्हणाले, "प्रथम स्थूलमानानें हें सांगतो कीं, माझ्या कोणत्याहि निंदकापेक्षां मी श्रेष्ठ आहें. कारण माझ्याहून जे श्रेष्ठ आहेत असें मी समजतों ते माझी निंदा करतांना सहसा आढळत नाहींत. जे माझ्याहून हीन आहेत तेच माझी निंदा करतात." या उत्तरांत कौशल्यच अधिक आहे. पुढील अवतरणांत वृत्तीचा स्पष्टपणा चांगलाच दिसून येतो. ते लिहितात, "मी केव्हांहि स्वतःकडे पाहतों तो इतरांच्या तुलनेनें नाहीं, तर स्वतः माझ्या तुलनेनें! लौकिक काय किंवा यश काय, जें मला मिळालें तें खरोखर माझ्या आत्मगुणांपेक्षां अधिक मिळालें असें मला वाटतें. अर्थात् मी पूर्णपणें आत्मसंतुष्ट आहें. याहून अधिक योग्यता मला लाभली नसेल तर तो लोकांचा दोष नाहीं, माझा आहे असें मी

मानतों. कारण मी एक सामान्य बुद्धीचा सामान्य कर्तृत्वाचा मनुष्य आहें. दहा सहस्रांत एक अशी माझी योग्यता लोकोत्तर नाहीं. कदाचित् सहस्रांत एक इतकी असेल."

स्वतःच्या संपादकीय यशासंबंधींचा व पुढारीपणासंबंधीं त्यांचा पुढील अभिप्रायही असाच उद्‌बोधक वाटेल. ते म्हणतात, "संपादक या नात्यानें मी बराच यशस्वी झालों...कोणत्याहि सत्कार्याला निर्विकारबुद्धीनें शक्य तितकें प्रोत्साहन देणें हा एक मोठा गुण मजमध्यें होता. धादान्त व जाणून-बुजून अन्याय असा मी क्वचितच करीं. जातिद्वेष मीं सहसा केला नाहीं. यामुळें संपादक या नात्यानें मला शत्रूंपेक्षां मित्रच अधिक मिळाले... आपण जें करणार नाहीं तें लोकांना करावयास सांगणें माझ्या जिवावर येतें. त्यामुळें ध्येयवादित्वांत मी कमी पडतों. जे आपल्या स्वार्थत्यागाला किंवा दुःख-पालतेला मर्यादा ठेवीत नाहींत ते सहजच पुढारी बनतात, आणि अशांच्या विषयीं मला अत्यंत आदर वाटतो. देशाचें पाऊल पुढे पडेल तें अशाच पुढाऱ्यांच्या हातून...पण स्वतःला पचेल व पश्चात्ताप न होईल तितकेंच करावें, आणि प्रामाणिकपणें वाटेल तेंच बोलावें, असा माझा स्वभाव असल्यामुळें मी शर्यतींतल्या घोड्याप्रमाणें राजकारणाच्या रंगणांत धांवलों नाहीं."

'लोकशिक्षण' मासिकानें प्रसिद्ध केलेल्या टीकात्मक लेखांत केळकरांची तुलना रानडे, टिळक, गांधी, गोखले यांचीं नांवें घेऊन त्यांच्याशीं केली आहे व केळकर हे त्यांच्यासारखे नाहींत असें म्हटलें आहे. त्या टीकेला उद्देशून केळकर लिहितात, "मी तरी कुठें कधीं म्हटलें आहे कीं, मी या श्रेष्ठ लोकां-सारखा आहें म्हणून ? पण माझ्या निंदकाला माझी तुलना करण्याला हीं पहिल्या प्रतीचीं नावें पणाला लावावीं लागलीं यातच मी माझा मोठेपणा समजतों. शिवाय या लेखकाच्या नकारार्थी वर्णनपद्धतींत गुप्त हेत्वाभास असून त्याची बाजू या पद्धतीनें त्याच्यावर सहज उलटवितां येण्यालायखी आहे. कसें तें पाहा. रानड्यांनीं गोखल्यासारखा स्वार्थत्याग केला नाहीं. गोखल्यांनीं राजवाड्यांसारखे इतिहास लिहिले नाहींत आणि हे म्हणे इतिहासाचे प्रोफेसर ! गोखल्यांनीं टिळकांप्रमाणें धडाडी कोठें दाखविली ? टिळकांना गोखल्यां-प्रमाणें इंग्रजी वक्तृत्व नव्हतें ! तात्पर्य, कोणांत काय होतें हें न पाहतां दुसऱ्या एखाद्यासारखें काय नव्हतें हेंच पाहत गेल्यास कोणालाहि श्रेष्ठपदा-वरून खालीं ओढतां येईल ! हरिभाऊ आपटे तरी रवींद्रनाथ टागोरांप्रमाणें

तत्त्वज्ञानी कोठें होते ? राजवाड्यांना खाडिलकरांसारखीं नाटकें कोठें लिहितां येत होतीं ? चिंतामणराव वैद्यांना खाडिलकरांसारखें ललितवाङ्मय कोठें लिहितां येत होतें ? ठरले कीं नाही हे सगळे त्या त्या दृष्टीने नादान ! एवढेंच काय ? मीहि थट्टेनें म्हणूं शकेन कीं, वरचे हे सगळे माझ्याहिपेक्षां एका दृष्टीनें कनिष्ठ ठरतात. त्यांच्या बुद्धीला माझ्या बुद्धीप्रमाणे चौरसपणा कोठें होता ? ते एखाद्या सुट्या विषयांत फर्स्टक्लासांत आले असतील. पण सर्व विषयांत दुसऱ्या वर्गाचे मार्क मिळवून एकंदर बेरजेच्या दृष्टीनें त्यांच्याइतकीच माझी बेरीज भरली असें कां म्हणूं नये ? वट (टोटल) बेरीज हा एक स्वतंत्र विषय मानला तर तेवढ्यापुरता मलाहि वरचा क्लासच मिळेल."

अवतरणें थोडींशीं लांबलचक वाटतील पण तीं मुद्दाम घेतलीं आहेत. केळकरानीं आत्मसंतुष्टपणें, न्यायी बुद्धीनें व प्रांजलपणें स्वतःबद्दल केलेलें हें मोजमाप मला अतीव सुंदर वाटलें. स्वतःसंबंधीं इतक्या कांटेकोर पद्धतीनें, विनयानें नि खरेंपणानें कोण बोलतो हो या दिवसांत ? केळकरांचा हा 'स्वयंनिर्णय' मान्य करतांना त्याना नम्रपणें सुचवावेंसें वाटतें कीं, "मी एक सामान्य बुद्धीचा सामान्य कर्तृत्वाचा मनुष्य आहें" असें म्हणत म्हणत आपण होऊन तुम्हीं 'वट बेरजेंत' का होईना पण रानडे, टिळक, गांधी, गोखले इत्यादींच्या वरच्या वर्गात येऊन बसलांत हें चांगलें केलेंत. कारण कोणाहि न्यायी माणसाला हेंच मत, आपण विनोदी युक्तिवादानें मांडलें असलें तरी, शेवटीं ग्राह्यच मानावें लागेल !

आणि कोणीहि झाला तरी त्यानें केळकरांना खालचा वर्ग तरी कां म्हणून द्यावा ? केळकर काय परसापरसांतून उगवतात, वाढतात ? सर्वपक्षीय साहित्य-भक्तांनीं शिरोधार्य मानलेले हे साहित्यसम्राट्, हॉर्निमनसारख्या वृत्तपत्र-योग्यानें पहिल्या वर्गात (कदाचित्) पाहिले म्हणून ठरविलेले हे संपादक, कायदेपंडिताचे केवळ मुकुटमणी असलेल्या डॉ. बाबासाहेब जयकरांनीं 'राजकीय लेखनाचे व्यासमुनि' म्हणून वंदिलेले हे धुरंधर मुत्सद्दी, व वीर सावरकरानींहि "राजसूययज्ञाच्या वेळीं अग्रपूजेचा मान मिळविणारे" म्हणून गौरविलेले हे पराक्रमी पुरुष. यांना का महाराष्ट्र 'सामान्य बुद्धीचा नि सामान्य कर्तृत्वाचा मनुष्य' समजणार ? इतका महाराष्ट्र अरसिक का आहे ?

महाराष्ट्र अरसिक नाहीं. गुणग्राही आहे. तो केळकरांकडे अभिमानानें, कौतुकानें, आदरानें नि आपले एकमेव पुढारी म्हणूनच बघत आला आहे

ना ! आणि जोंपर्यंत केळकरचरित्रांत टिळकांच्या राजद्रोहात्मक खटल्यांच्या वेळीं प्रगट झालेलें धैर्य आहे, टिळकपुत्रांशीं झगडण्याची निर्मळ कर्तव्यबुद्धि आहे, गांधीवादाच्या वादळांत ताठ उभें राहण्याचा दीपगृही ठामपणा आहे, तीन लक्षांचा 'कर्ज'बोजा निवारण्याची अद्भुत गुरुभक्ति आहे, लोकमान्यांचा निष्काम कर्मयोग आहे, देशबांधवांसंबंधींचा जिव्हाळा आहे, अतृप्त अशी ज्ञान-लालसा आहे, अखंड उद्यमशीलता व सत्तात्यागाचा निर्लोभीपणा आहे नि सर्वांत श्रेष्ठ म्हणजे " आज मी अत्यंत समाधानाच्या मनःस्थितींत आहें, मन शांत आहे—हात जोडले आहेत—'हांके' ची वाट पाहत आहे ! " असें विरागी संतांना लाजविणारें नि महायोग्यांना साजणारें कळिकाळाला आव्हान आहे तोंपर्यंत केळकरचरित्र अवमानिलें जाणार नाहीं. कारण वरील हे सर्व गुण दिव्य आहेत. आणि

'तेथें कर माझे जुळती
दिव्यत्वाची जेथ प्रतीती ॥'

या कविवचनाप्रमाणें ही पिढीच काय पण भावी पिढ्यादेखील 'नरसिंह' केळकरांपुढे 'कर माझे जुळती' असेंच म्हणत राहतील यांत शंकाच नाहीं.

**वंदे मातरम्**

# کتب خانہ جامعہ عثمانیہ

جامعہ، مجلس انتظامی

۱- اراکین مجلس اعلیٰ، مجلس ... کتابیں ایک ایک ... انگریزی ... مع

... صدر شعبہ جات، نصاب ... پانچ کتابیں ... ایک ... لے سکیں گے۔

۲- اساتذہ جامعہ عثمانیہ، کلیات ایک وقت میں ایک ... لے سکیں گے ... اور ...

۳- اراکین دارالترجمہ ... کتابیں ایک ... دو کتابیں ... ماہ تک ... سے

۴- طلبائے ایم اے، ایل ایل بی ایک ایک ... لے سکیں گے۔

کے طلبہ تین کتابیں دو ہفتہ کے لیے ایک ... واپس نہ ہوں تو طالب علم ...

طلباء پانچ کتابیں ... واپس لیا جائیگا۔ ... کا ... ادا کرنی ...

۴- مدت مقررہ پر کتابیں ... کتاب ... دیا جاری ... لازم ہے۔

ایک آنہ یومیہ فی کتاب ... کتابیں کالا لازم ...

۵- ہر طرح کی کتابیں ... کتب خانہ میں کتاب ... ہو جائیں تو ... وصول ...

سے کتب خانہ میں کتابیں گم یا خراب ہو جائیں تو ... کی ...

۶- کتابیں گم یا خراب ... ادا ہوگی۔

۷- کتابوں پر کسی قسم کا نشان نہ لگایا جائے۔

۸- ہر ... کا ...